सहामाही ,, १ ,, ८९
साळअखेर ,, २ ,, १।८
किरकोळ अंकास ............................ १

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ........०।१

Six monthly............3 ,, 8 as
Single copy................................1as

Advertisement
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII — AKOLA MONDAY 3 JULY 1893 — NO. 26

वर्ष २७ — आकोला सोमवार तारीख ३ माहे जुलै सन १८९३ इ० — अंक २६

## CLEMENTS TONIC

## दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उबड्या हवेंत राहणे, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तात्काळ नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंटले, विचारांचा घोटाळा झाला, ज्या च्या त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूळ झाला, कंबरेत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अगर तिडका झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतर्लो कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळाली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्या विषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते म्हणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचा जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅानिक असून हें शरीरांतील सर्व अवयवाना व स्नायूंना ज्ञानतंतू योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंव्हा ज्ञानतंतूची अशक्तता साधरण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावाचून रहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हीच रोगाचीं कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरात तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ' क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बाळंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## नोटीस

रा. रा. लक्ष्मण वल्द रोडाजी याकोडे मौजे सोमठाणें तालुके आकोलें व जिल्हे आकोलें शेत करणार व यास जामीनदार बापुजी वल्द देवाजी पाटील दुतोंड्या व गणपती वल्द मारुती दुतोंड्या पाटील रहाणार मौजे सोमठाणें या त्रिवर्गास:—

नोटीस देणार लक्ष्मी बाई मर्द राघोजी दुतोंड्या सोमठाणेंकर हल्लीं रहाणार सोनाळे ता० बाळापूर इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे सोमठाणें येथील शेत सरवे नंबर ४९ एकर २४ गुंठे १० आकार रु. ( ४३ ) चे यांतील शेत निमे माझे मालकीचे लक्ष्मण वल्द रोडाजी यांस पांच वर्षें पर्यांनीं रु. ( ६३ ) दरसाल साऱ्यासह घेऊन दिलें आहे. व या शेताच्या रुपये बद्दल तुह्मी उभयतां जामीन आहा तर तुह्मा उभयतां सुद्धां या नोटीशीनें कळवितें, कीं, आज तीन पिकां पैकीं माझे रुपये येणें राहिलें तें ( ९१।०।१२ ) व्याजा सुद्धां ही नोटीस पावले पासून आठ दिवसांत आणून निकाल करावा असें झालें नाहीं तर रिती प्रमाणे फिर्याद करून ह्या नोटीशीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान व खर्च होईल तो व रु. ( ९१।०।१२ ) राहिलेले व याचें व्याज असें मिळून सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस. तारीख २९।६।९३ इ०

( सही )

निशाणी बांगडी लक्ष्मी बाई
मर्द राघोजी राहाणार
सोनाळे इच्या हातची असे

## नोटीस

रा. रा. शामजी माढण या दुकानचे नावानें व्यापार करणार मालसी भाई साहु दुकान मोर्तिजापूर यांस खाली सही [illegible]र यजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे गुमास्ते नामे देवजीभाई याणी मारोती विठाजी पाटील यांचे मारफतीनें गहू पोते ४१ एकेच्यालिस कुडव खंडीचे तेरा खंडी (१३) चवदा ( १४ )कुडवाचे माप घेऊन पाते भरून तुमचे दुकानी नेले. त्याज बद्दल दाम रुपये दर खंडीस बीस रुपये पांच आणे ( २०।५ ) प्रमाणें हिशोबानें जे होतात ते न देतां तुमचे गुमस्ते याणे आपलें सहीचा आकडा दिला व मी रुपये एक दोन दिवसात पाठवून देतो ह्मणून सांगितलें त्या प्रमाणें रकम आली नाहीं नंतर आह्मी आमचे दुकानचा शोपाई रकम मागणे करितां पाठविला. त्याचेही समागमे तुह्मी रकम न देता मागुन पाठऊन देतो ह्मणून पत्र दिलें ती रकम आज पावेतो आदा न होता तुमचे नांवे आमचे दुकानचे खात्यात नांवे पडली आहे. करिता तुह्मास या नोटीसीने कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून आठ (८) दिवसांचे आंत गहू नेल्या तारखे पासून रुपयेचा निकाल होई पावेतो सराफी रिती प्रमाणें एक रुपया शेकड्याचें व्याज व या नोटीशीचा खर्च असे सर्व आदा करून द्यावे. या प्रमाणें न झाल्यास आह्मी दीवाणी कोर्टांत तुमचेवर दावा करून व्याज मुद्दल नोटीसीचा खर्च, व कोर्ट खर्च असे मिळून सर्व भरून घेऊ ह्मणून दिल्ही नोटीस सही ता० २८।६।९३ इसवी.

सही

बाबूरावजी सखारामजी देशमुख दुकान कजवे हेसाग एजंट
गोविंद अंताजी चितळे
दस्तूर खुद.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताप्रमाणेंच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

वि. वि. पाऊस चांगला झाला व नंतर उघाडीही मिळाली ह्मणून खरीपाचे पेरे पुरे झाले. पाणी चारा मुबलक आहे पण धान्य महाग होत आहे. अमांश पडसें खोकला वगैरे आजार अधीक आढळतात.

मि. डेव्हिस साहेब शरीर प्रकृतीनें निरोगी व सदृढ आहेत ह्मणून त्यांचा विचार ५५ वर्षें वयास झालीं तरी आणखी कांहीं वर्षें नोकरी करण्याचा होता. त्यांनीं हिंदुस्थान सरकाराकडे अर्जही धाडला होता परंतु तो नामंजूर होऊन त्यांना पेनशन घेणें भाग झाले. हे मोठे दयाळु साहेब आहेत. यांनीं डपुटी कमिशनर व्हावें असा लोकांचा मनोरथ होता. नुकतांच त्यांचा वीस वर्षांचा एकुलता मुलगा बी. ए. परीक्षा पास झालेला आत्महत्या करून मेला त्यामुळें त्यांना पेनशनदारींतली विश्रांती, एकलकोंडेपणा व दुःखशून्यता नको होती! मुलाच्या मरणानें एका मिहांतले ३००० रुपये साहेबांचे बुडाले. शिवाय त्याच्या जीवास गृहसुख कांहीं नाहीं.

वाशीमच्या इंग्लिश आफिसांतील मि. टामसन हे अकोल्यास गेल्या कारणानें झालेल्या बदलींत एक तीस ३० रुपयांची जागा रिकामी झाली तिजवर येथील डेपुटी इनस्पेक्टरचे क्लार्क रा. रा. गोपाळ नारायण देशपांडे यांची नेमणुक झाली.

ही बदली बहुतेक कायमची होणार असल्यामुळें डेपुटी इनस्पेक्टरचे हेड क्लार्कच्या जाग्यावर मि ऋषि यांनीं एका निराळ्याच मनुष्याची शिफारशीनें योजना केली होती. पण अखेर ती जागा शाळाखाते याचे डायरेक्टरीवरून हक्काच्या योग्यतेप्रमाणें रा. रा. वाडेकर उमरावती यांस दिली. शाळाखातें लहान असून त्यांत बढती मिळणें दुर्मिळ! एखादा तसा योग आला तर शिफारशीवाले इसम हक्कदारांच्या डोक्यावर पाय देण्यास उभे असतातच! फार नामी नेमणूक झाली व तिचा किता इतरांनीं गिरवावा.

वाशीम २६।६।९३ आपला

' क्ष '

+वरील शाळाखात्याच्या नेमणुकीच्या प्रकरणांत आक्टींग डायरेक्टर मि० एटकिन साहेब यानीं कोणतीही शिफारस करितें वेळीं चारी बाजूंचा विचार करून नंतर ती करण्याविषयीं डेपुटी इन्स्पेक्टरांस चांगला धडा घालून दिला. शिफारशींची योग्य सीमा उल्लंघिली ह्मणजे तिचा अव्हेर होऊन पाठविणाराचा अपमान होतो हें त्यांनीं स्पष्ट कळविलें. शाळाखात्याची डायरेक्टरी निरुपयोगी न होईल अशा विषयीं खबरदारी घ्यावयास सांगितलें. शिवाय दंडाची शिक्षा केव्हां,

किती, व कोणी करावी या विषयीं हा मि० एटकीन यांनीं जोरदारपणानें एका मोठ्या अ- धिकाऱ्यांस नोट समन दिली असें आह्मी ऐकितों.

एडि० व० स०

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक आषाढ वद्य ४ शके १८१५

## सोन्यारुप्याच्या नाण्या विषयीं ठराव.

सोनें व रुपें या दोन धातू मुख्यत्वेंकरून सर्वत्र मूल्यदर्शक आहेत. तांब्याचीं व पितळे- चीं नाणीं असतात तीं एका सोन्याच्या अगर रुप्याच्या नाण्याचा विसांश षोडशांश द्वाद- शांश वगैरे भाग दाखविणारीं असतात ह्मणून तांबें व पितळ या दोन धातू किरकोळ व मोडीच्या व्यवहारांतून खुर्द्याच्या रूपानें चालतात. मुख्य व मोठमोठ्या देववेवी सो- न्यारुप्यांत चालतात. सोन्यारुप्याचा भाव अलीकडे फार चंचळ, अस्थीर, व अनियमित होत चालला होता त्यामुळें हिंदुस्थानांत बरे- च वर्षां पासून मोठी ओरड होती. सोन्यारुप्याचा भाव वाढला किंवा उतरला ह्मणजे सोन्याची रुप्यामध्यें किंमत अनुक्रमें वाढणें किंवा उतरणें होय. ज्या मानानें सो- न्याचा भाव चढतो तितकी रुप्याची किंमत उतरली असे होते.

हिंदुस्थानांत रुप्याचें नाणें चालतें आ- णि या देशचा राज्यकारभारा संबंधानें व व्यापारी संबंधानें ज्या देशांशीं संबंध पडतो तेथें सोन्याचें नाणें चालतें. या नाण्यांतील फरकामुळें जसा जसा सोन्याचा भाव वाढे तसतसा हिंदुस्थान सरकाराला इंग्लंडच्या रा- ज्यकारभारा निमित्त अमूक पौंड खर्च द्या- वा लागे तो उत्तरोत्तर हुंडणावळीच्या भा- वानें वाढूं लागला आणि तो इतका वाढला कीं नवीन कर बसवावा लागेल अशी भिती पडली विलायतचा माल सोन्याचा भाव चढ- त चालल्यामुळें या देशास फार महाग पडूं लागला ह्मणजे पूर्वीं एक पौंड किंमतीच्या मालास १० रुपये पडत तेथें १८।१९ रुपये पडूं लागले त्याच्या उलट स्थिती हिं- दुस्थानांतून विलायतेस जाणाऱ्या माला संबं- धानें होऊं लागली या हुंडणावळीचा भाव हिंदुस्थान सरकारास जसा भारी वाटूं लाग- ला तसा आंग्लो इंडियन लोकांस हिंदुस्था- नांत रुपये मिळवून इंग्लंडांत पौं- डाच्या रूपानें खर्च करणे ह्मणजे मोठा खर्च पडत असे आणि त्यामुळें त्यांचे सोन्या रुप्याच्या नाण्याच्या हुंडणावळी संबंधानें नेहमी ओरड चालत असे.

हा हुंडणावळीचा भाव स्थीर व नेमस्त कसा करितां येईल याचा विचार करण्या साठीं स्टेट सेक्रेटरी कडून लार्ड हर्शेल यांच्या अध्यक्षते खालीं एक कमिशन बस- विण्यांत आलें. या मंडळीनें जो रिपोर्ट लिहिला तो हिंदुस्थान सरकारनें स्टेट सेक्रेटरीच्या मंजुरातीनें गेल्या सोमवारीं सिमल्यास तडाक्यानें व फारच घाईघाईनें सोन्या रुप्याच्या नाण्याविषयीं तूर्त एक कायदा करून अंमलांत आणिला. या ठरावा मुळें चालूं व्यवस्थेंत खालील फेरफार करण्यांत आले: —

(१) या पुढें टांकसाळेंतून रुपें देऊन रुपये पाडून मागण्याची लोकांस मनाई आहे. मुंबई व कलकत्ता येथील दोन्ही टांकसाळेंत जो कोणी सोनें किंवा सोन्याचीं विला- यती नाणीं साव्हरीन व अर्धा सावरीन हीं देऊन त्या ऐवजीं रुपये मागील त्यास १ साव्हरीनला १५ रुपये अथवा ७. ५३- ३४४ ग्रेन (ट्राय) शुद्ध सोन्यास १ रुपया या भावानें रुपये मिळतील. फक्त असें सोनें टांकसाळेंत ५० तोळ्यापासून कमी प्रत्येक खे- पेस असतां उपयोगी नाहीं.

(२) ज्या कोणास सरकारांत पैसा भरणें असेल त्यानें रुपयाच्या ऐवजी वरील दरा प्रमाणें सोन्याचीं विलायती नाणीं दिलीं तरी चालेल. आणि हा असा भरणा प्रत्येक ख- जिन्यांत घेतला जाईल.

(३) आणि हल्लीं जशी दहा, वीस, पन्नास, शंभर, वगैरे रुपयांच्या नोटा चालूं आहेत तशा नोटा कांहीं तोळे सोनें अगर कांहीं साव्हरीन नाणीं यांच्या ऐवजी कान्ट्रोलर जनरल यांस जरूर वाटल्या ते काढू शक- तील आणि या नोटा वरील हुंडणावळीच्या भावानें रुपयांतही मोडल्या जातील.

वरील कायद्यानें काय काय गोष्टी घडती- ल हें पक्केपणीं सध्यां कांहीं सांगतां येत नाहीं तरी ठोकळ अनुमानें अर्थशास्त्रज्ञ काढतात त्यांचा गोषवारा असा:—

१ रुप्याचा भाव सोन्यामध्यें उतरत उतरत इतकी उतरण्याची भिती पडली होती कीं, पूर्वीं एक पौंड नाण्याला १० रुपये पडत तेथें हल्लीं २० पयसे पडतील कीं काय! या नव्या कायद्यानें रुप्याचा भाव वाढणार नाहीं तरी सध्यांपेक्षां खालीं नाहीं उतरणार नाहीं. आणि कांहीं दिव- सांनीं सरकारीच्या हुंडणावळीच्या भावा पर्यंत रुप्याचा भाव चढेल. रुपें घेऊन रु- पये पाडण्याचे बंद केल्यामुळें अमेरिकेंत रुप्याच्या खाणी कित्येक बंद होण्याच्या रंगांत आहेत. रुप्याचा पुरवठा कमी होऊं लागला ह्मणजे अर्थांत रुप्यास तेजी येईल. नवीन रुपये पाडण्याचे सरकारानें आपल्या खुषीवर ठेविलें आहे ह्मणजे त्याचा अर्थ असा कीं रुप्याच्या नाण्याची चंचण होऊन लोक रुपया साठीं सोनें किंवा सोनेरी नाणीं टांकसाळेंत आणी पर्यंत सरकार नवीन रुपये पाडणार नाहीं ह्मणजे अर्थातच रुप्याचा भाव एका पौं- डाला १५ रुपये या भावा पर्यंत चढेल

२ हल्लीं सोन्याचा जो भाव आहे तो उ- तरला तरी तो ७.५३३४४ ग्रेन (ट्राय) शुद्ध सोन्यास एक रुपया या भावा खालीं उतरणार नाहीं. एक तोळा १७१ ग्रेन पा- सून १८० ग्रेन पर्यंत वजनाचा ठिकठिका- णीं निरनिराळा मानला जातो तर त्या मा- नानें सोन्याची किंमत दर तोळ्यास (तो- ळा जसा असेल तसा) २२ रुपये पासून २४ रुपये पर्यंत पडेल सोन्याची किंमत या हून बाजारांत उतरली तरी सरकार वरील भावानें सोन्या रुप्याची अदलाबदल कर- ण्यास तयार आहे त्या अर्थीं लोकांनीं सर कारांत सोनें भरलें ह्मणजे त्याना वरीलच भाव मिळेल.

३ सोन्याचीं नाणीं व्यवहारांत चालूं केलीं नाहींत ह्मणजे कोणीं कोणा पाशीं रुपयाच्या ऐवजी भारी मूल्यदर्शक नाणीं हक्कानें मागणार नाहीं. शिवाय सरकार सो- नें व सोन्याची नाणीं स्वीकारून त्याच्या मोबदल्यांत रुपये देईल ह्मणून रुपये घेऊन सोन्याचीं नाणीं मात्र देणार नाहीं. रुपयांची चंचण झाली आणि रुपयाच्या नाण्या साठीं लोक सोनें सरकारांत नेऊं लागले व सोनें व रुपें यांच्या नाण्यामधील हुंडणावळीचा भाव स्थीर व ठराविक दरावर येऊन बसला ह्मणजे हिंदुस्थान सरकारही जरूर वटल्यास सोन्याचा नाणी व्यवहारांत चालू करील. सध्याची व्यवस्था तूर्त कांहीं वेळा पर्यंतची आहे तेव्हां पुढील अनुभवा- प्रमाणें निराळी व कायमची व्यवस्था कायद्यानें करण्यांत येईल.

---

आह्मी गेल्या अंकीं ध्वनित केल्याप्रमाणें सिव्हील सरव्हीस परीक्षा हिंदुस्थानांत होऊं नये असा हिंदुस्थान सरकारनें आपला मनो- गत स्टेट सेक्रेटरीस कळविला आणि स्टेट सेक्रेटरीनीं मि. पाल यांच्या सूचनेवरील हाऊस आफ कामन्सचा ठराव विचारांत घेतां येत नाहीं अशा अर्थाची वाटण्याची अक्षता अखेर लावली. गोष्ट घडली ही मो- ठी सुमार झाली तरी ती कांहीं नवलाची ना- हीं आह्मास त्यांत कांहींच आश्चर्य वाटत नाहीं पण त्या पासून आपणास एक गोष्ट शिकली पाहिजे ती अशी कीं आपला राज- कीय पक्ष ह्मणजे राष्ट्रीय सभा अधीक जोर- दार व सामर्थ्यवान केली पाहिजे. आपणास नें कांहीं लाभण्या सारखें आहे तें पाच रा- ष्ट्रीय संस्थेद्वारें मिळावयाचें आहे तर सर्व लोकांनीं एक दिलानें या संस्थेची उठावणी उत्तम प्रकारें कायम ठेविली पाहिजे.

---

The Berar Samachar

MONDAY JULY, 3, 1893

## THE PRESENT SITUATION OF EUROPE.

We often summarise the relative positions of different European powers for our readers and we intend devoting this article to an exposition of the mutual relations of those powers. France and Germany—An extreme sensitiveness of public feeling in both countries continues quite unabated. A few days ago a veterinary Surgeon after travelling in England and there studying the various breeds of horses had gone to Normandy for a similar purpose. He was arrested at Rouen on a suspicion of being a spy, confined in an abominable cell for a week and then set at liberty without a word of apology, and expelled from France thogh he had written to the German Ambassador at Paris for heip. His letters were illegally kept and not delivered till after his expulsion. This breach of international law evoked a very emphatic complaint and remonstrance from the German Government in Paris. Fortunately this affair has been amicably settled. Nevertheless no proof is wanting to show that an idea of revenge is still fostered on all sides in France. The number of recruits in France in 1892 was one fifth larger than in 1891, especially in those Districts which formed the chief theatre of war in 1890 and 91.

Russia and Austria—There have of late not been wanting signs to show that the Russian Government intends adopting a more friendly attitude towards the powers constituting the Triple Alliance Evidently it is beginning to be realised that Russia can not afford to throw herself into the hands of a power which is daily becoming more unstable and radical. The proposed meeting between the Czar and the Emperor Francis Joseph amply bears this.

Austria and the Vatican—The relations between the Austrian and the Vatican empires have now an important bearing on the general situation in Europe. The Archduke would not visit the vatican and there had been no negotiations between the two. While the denial of all negotiations on the subject on the part of the Austrian Government may be accepted as conclusive, we are sure the Vatican intended to interfere and to go as far as possible without incurring the danger of a more damaging repulse. If formal negotiations were not entered into it was certainly not from want of inclination on the part of the Vatican. The Pope is not led by any one but takes his own course; he is resolute in his adherence to the European policy, submitting neither to influence nor to contradiction.

Servia—The situation in Servia is very serious. The Liberals now in power are determined to maintain it at any cost inspite of their failure to secure a majority at the recent elections. If they can do this they must do it with the support of the army which owes its existence to them and to king Milan while the Radicals violently advocate the abolition of the Standing Army and the Militia. The Regency must either come to terms with the Radicals or set up an open and declared dictatorship which would inevitably lead to most dangerous developments. Though the condition of the country is bordering on anarchy there is no probability of foreign intervention and therefore it is not likely that the domestic troubles of Servia will bring about complications between any of the Great Powers.

## AND AKOLA LASTLY

Passing from a brief and rapid survey round the interior of the whole of Europe with speed even greater than that of electric telegraphs we come back to Akola. Last Tuesday was a day of universal satisfaction and rejoicing The most revered but popular, honest but amiable and penetrating but reserved, unostentatious but deeply interested in every thing around him, the scholar and philosopher was to come back that day from Poona by the down day-passenger train. Reports were anxiously sought about his health by every one with childlike simplicity during his three months' stay which was not so heavily felt as it would have been had his place not been filled up by an equally able gentleman whom long residence now makes all our own though a foreigner. Such is awe inspired by the gentleman expected to arrive that though every one anxiously wanted to gratify his eyes by seeing him more bloomy than when he left us three months ago no one except the officials could do it so openly. To the disappointment of every one the learned RaoBahadur the darling of the

public and the father of his subordinates was seen in fever and rather weakened. Prayers of enthusiasm for a speedy relief even from such a trival and ordinary complaint is his natural tribute. The next day Mr. Aitken was to come back to his familiar school building of which he is conspicuously a worthy master. Unprejudiced persons or decisive persons not base enough to conceal their opinions to please some prospective mischief have but one opinion about Mr. Aitken's late and probably last "*temporary*" administration. It was one of unmixed vigour, equal justness, like kindness and greater boldness. For the advantage of our Marathi readers we shall soon summarise it in our vernacular columns. We have not forgotten our answer to the challange of a "citizen" in the Vaidarbha. But things are not yet ripe for such an exposition.

By the by we must assure our readers that one of the warmest but one of the most impartial and enlightened admirers of the learned Rao Bahadur Jatar will shortly favour his friends and admirers with his life which has not been done the least justice to by one of the Poona Vernacular papers. We wish it were never written. It has been so recklessly written. The charm of such men is their character and disposition, both of which have been miserably judged! "But fools rush where angles fear to tread."

---

The *Journal* of the East India Association contains an important paper by Brigade-Surgeon R. Pringle, on "Indian Hemp ('Ganja') from a public Health Point of View." It is, he alleges, a most dangerous and injurious drug—infinitely more harmful in its effects than opium. Its immediate effect, intemperately taken, is to produce that curious mental frenzy which causes Orientals to "run amok." The ultimate consequence of the habit is insanity. In three years 16 per cent of admissions to the Bombay and 29 per cent of the admissions to the Lower Bengal Lunatic Asylums have been attributed to the use of Ganja. The extent to which the Ganja habit prevails may be gauged from the fact that, though it is a dangerously poisonous drug, the amount annually produced is about 600,000 lbs., of which nearly 500,000 lbs. is consumed in Bengal alone; while the revenue derived from the licensed sale of it amounts to from £150,000 to £200,000 per annum. The moral which Brigade-Surgeon Pringle draws is that the sale of the drug ought to be restricted, as it is by the Turkish, Egyptain, and other Western Governments.

B. G.

## वऱ्हाड.

हवामान— गेले दहाबारा दिवस चांगली उघाडी होती पेरे खरीपाचे पुरे झाले. शुक्रवारीं थोडा पाऊस पडला व आकाशांत ढगही पुष्कळ येतात. तेव्हां पुन्हा लवकरच चांगला पाऊस पडेल. रोगराई विशेष ह्मणण्यासारखी विशेष नाहीं.

मलकापुरा नजिक रा. रा. गणोबा पाटील चिरणकर नांवाचा एक श्रीमान व बहादूर गृहस्थ होता. तो शेतांतून घरीं परत येत असतांना त्यास व त्याच्या गाडीवाल्यास कांहीं इसमांनीं भयंकर व बेमालूम रितीनें ठार मारलें. ही मोठी वाईट गोष्ट झाली. आद्याप खुनी मनुष्यांचा तपास नाहीं!

रावसाहेब वामन अनंत भोळे असि.-इंजिनिअर, वाशिम हे वाशिमाहून अर्वाग वायूची विकृति जडल्यामुळें परत उमरावतीस आपल्या घरीं गेले.

येत्या रविवारीं 'वऱ्हाड सार्वजनिक सभे'ची जनरल सभा भरून तेथें नवीन सारा वाढविण्याच्या प्रश्ना संबंधानें विचार होणार आहे.

रा. रा. माधवराव आण्णाराव हाचोळी जहागीरदार यांस जळगांवास तहशीलदार नेमल्या अन्वयें हे नवे गृहस्थ आपल्या जागीं रुजू होण्यासाठीं जळगांवास गेले.

रावबहादूर जठार हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवरून परत येऊन गेल्या बुधवारीं आपल्या स्थानीं विराजमान झाले.

---

नमुना नंबर १४३

सन १८८१ चा आक्ट ५ प्रमाणें.

दि. कि. मो. नंबर १

वर्ग १९ १८९३

प्रोबेट सरटीफिकिट मिळणें विषयीं अर्ज केल्याबद्दल जाहीरनामा

डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव आसाराम

बापाचें नांव शेरसिंग आसवळ

राहणार—इलिचपूर तालुके इलिचपूर जिल्हे—इलिचपूर यांस मयत.

राजाई मर्द हनवंतराव रहाणार इलिचपूर तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर इचे जितगीचे मृत्युपत्रा प्रमाणें प्रोबेटअक्टा अन्वयें सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे काहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यात येत आहे कीं त्यानीं ता. २६ माहे जुलई सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाचा चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. १६ माहे ६ सन १८९३ इ.

( Signed) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District

शिक्का उपडज्य.

---

नादारी मोकद्दमा नंबर ३ सन १८९३

नमुना ( जी )

विद्यमान सिम्पसन साहेब असिस्टंट कमिशनर नादरी कोर्टचे उपडज्य जिल्हे वाशीम.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, शिवाजी वल्लद संभाजी राहणार घामणी ता० मंगरूळपीर हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे जुन सन १८९३ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ३१ माहे जुलई सन १८९३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे. करितां शिवाजी वल्लद संभाजी चांभार नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें व त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदाराची नावें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतीज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफीसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरांत दाखल होतील. ता० १९ माहे जून सन १८९३इ.

R. A. Simpson.
Assistant Commissioner.
नादारी कोर्टाचे जडूज. जि० वाशीम.

---

नादारी मुकद्दमा नंबर ४ सन १८९३

नमुना ( जी )

विद्यमान सिम्पसन साहेब असिस्टंट कमिशनर नादारी कोर्टाचे जपडूज्य जिल्हे वाशिम.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, हयातखा वा। फरीतखा मुसलमान राहणार मंगरूळपीर ता। मंगरूळपीर हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे जुन सन १८९३ इ॥. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ३१ माहे जुलई सन १८९३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपलें तर्फेचा असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकेविषयी दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमला आहे.

करितां हयातखा वा। फरीदखा नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यासर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणे असेल ते व त्याजबद्दलच्या साक्षीस समन्से करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदाराची नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

या कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदावेणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावीं. ह्मणजे ते दावे रजिस्टरीं दाखल होतील. ता० २१ माहे जून सन १८९३ इ.

R. A. Simpson.
Assistant Commissioner.
नादारी कोर्टाचे जपडज्य जि. वाशीम.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, म्युनिसिपल कमिटीचे हद्दींतील जळाऊ लांकडें कमेटीनें टौनहालवर जमवून ठेविलीं आहेत. सदरहू लांकडाचा हरास तारीख १२।७।९३ रोजीं होणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत येण्याची तजवीज करावी कळावें. तारीख २९।७।९२ इ०

Gopal Hari
Secretary—A. M. C.

---

नोटीस

रा. रा. खंडु वल्लद धरमाजी तिडके राहणार मौजे सोनाळे ता० जळगांव जिं० अकोलें यांसः—

नोटीस देणार गजी मर्द खंडु तिडके रहाणार सोनाळें तालुके जळगांव जिल्हे अकोलें. नोटीशानें असें कळवितें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहा व तुह्मापासून मजला चार मुलें झालीं व तीं चारी ही देवाच्या अवकृपेनें मेलीं. याज करितां तुम्हास व मजलाही फार दुःख झालेंच. व मुलें जगत नाहींत व संतती तर पाहिजे याजकरितां तुह्मी मजला विचारलें कीं, दुसरा घरठाव करितों, ह्मणजे दुसऱ्या बायको पासून मुलें लेकरें होतील. व आपला वंश राहील वगैरे त्यास मी तुमचे ह्मणण्या प्रमाणें तुह्मी दुसरी गंधर्वाची बायको करावी ह्मणून सांगितलें. व त्या प्रमाणें तुह्मी केली. व दुसरी बायको करण्याच्या अगोदर मजला तुह्मी घरा बाहेर घालवेलें आणि सांगितलें कीं, निराळी रहा. तुजला अन्नवस्त्र देत जाईन असें सांगितलें त्यांस आज सुमारें तेरा १३ महिने झाले. मजला अन्नवस्त्र वगैरे तुह्मी कांहीं देत नाहीं. मी चार वेळां मागितलें तर त्यास तुह्मी सांगितलें कीं, चार दोन महिन्यानीं देईन असें मजला तीन चार वेळां सांगून थापा दिल्या परवा मी विचारले तेव्हां सांगितलें कीं, देत नाहीं. कोर्ट खुलें आहे वगैरे. त्यास तुह्मास ह्या नोटीशीनें असें कळवितें कीं, नोटीस पावल्या पासून मजला आज १३ तेरा महिने सावकारी कर्ज काढून अन्नवस्त्रास जो खर्च लागला ते रुपये ( १०० ) शंभर व दर महिना पुढें पोटगी वस्त्र वगैरे खर्चास रुपये ( ८ ) आठ प्रमाणें द्यावे. असें झालें नाहीं तर झालेले ( १०० ) शंभर बद्दल व नेहमीं अन्नवस्त्रा बद्दल दरमहा रुपये ८ आठ प्रमाणें याज करितां सरकारांत फिर्याद करून ह्या नोटीशीचे खर्चा सह सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस ता० ३० माहे जून सन १८९३ इ०

( सही. )

सहीची निशाणी बांगडी गजी मर्द खंडू तिडके इच्या हातची असे.

---

## वर्तमानसार.

मारुती रामाजवळ दास्यत्व करीत होता व त्यास ज्या ज्या समयीं ज्या ज्या आज्ञा होत असत त्याप्रमाणें तो त्या बजाऊन विनंतीद्वारा श्रुत करीत असल्याची अनेक स्थळे रामायणात मिळतात. यावर नास्तिक लोक तर्क चालवितात कीं, वानेर येऊन बोलत व ती आज्ञाधारक रहात हें केवळ लेखन कलेचा गौरव आहे परंतु हल्लीच्या काळीं त्या संशयाची आपोआप निवृत्ति होत चालल्यानें पूर्वींच्या काळीं घडून येणाऱ्या सर्व गोष्टी खऱ्या भासू लागल्या ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. अ‍ॅडव्होकेट पत्रांत परवां एक गोष्ट वाचण्यात आली कीं एक वानर फ्रेंच व इंग्लिश भाषा बोलून आपलें सुखदुःख कळवीत असतो.

रशियन आपल्या इलाख्यांत आगगाडीचा रस्ता अत्यंत घाईने बांधीत आहे. समर्कंद लाईन पुरी होत आली पुढें स्वीकंद पर्यंत लाईन वाढविण्याचा विचार आहे.

सरहद्दीवर निरनिराळ्या प्रकारचे देखावे दिसूं लागले आहेत. एका अंगानें चायना एका अंगानें रशिया, व एका अंगानें फ्रेंच हिंदुस्थानांत पायपाची इच्छा दर्शवीत असून पांवडा पांवडानें ते पुढे येत आहेत. आमचे सरकार त्यांच्या पराजया साठीं योग्य व्यवस्था करीत आहेत पण त्या कामांत खर्चिन्यांची उधळपटी किती होईल याचा आदमास आज करवत नाहीं.

१८५७ साल्यांत शिपाई लोक बेदिल होऊन त्यांनीं तात्याटोप्यास हातीं घेऊन रणकंदन माजविलें तसा प्रकार पुनः घडून येऊ नये ह्मणून युरोपियनलोक फार देखरेख ठेवीत आहेत. मि. केन व लार्ड किंबर्ले या उभयता मध्यें पत्री काशीमध्यें पाण्याचा पुरवठा करताना नळांना "कोटिंग" करायचें केलें आहे या बाबदींत बराच वादविवाद झाला, अखेर त्यांची माहिती पाठविण्यासाटीं ते प्रकर्ण स्टेट सेक्रेटरी कडून हिंदुस्थानसरकाराकडे आल्याचें ऐकतो.

म० मि०

प्रसिद्धीस आलेले हैदराबादचे मेथीहुचन यांणीं हैदराबाद रासिडन्सी बाजाराचे सुपरिन्टेन्हेन्ट याच्यावर जी फीर्याद केली आहे त्याची चवकशी तेथील रेसिडेन्सी कोर्टांत न होतां वऱ्हाडांतल्या जुडिशियल कमिशनरापुढें होण्याचें ठरलें आहे.

काळ्याची बाधा होऊं नये ह्मणून देवी टोचण्यासारखाच एक टोचण्याचा प्रयोग करण्याचें जें अलिकडे निघालें आहे त्याचा अनुभव पाहण्य.करतां त्या कामांतल्या एका डाक्टरानें गेल्या ६ व्या तारखेस पतियाळा संस्थानांत जाऊन तेथें ६ दिवसांत ११०० माणसें टोचलीं असें सांगतात. यांत ६०० कैदी, पोलिस, १५०० लष्करी लोक व बाकी इतर आहेत. हें सर्व लोक आपण होऊन तो प्रयोग करून घेण्यास आले असेंही सांगतात. या टोचण्याचा पुढें कसा अनुभव येतो हें मागाहून समजावयाचें आहे.

आसाम प्रांताच्या पोलिसाचा जो इन्सपेक्टर जनरल आहे तोच अपकारी सुपरिटेंन्ट तोच स्टांप सुपरिंडेन्ट, तोच जेल सुपरिटेंन्हेट असून शिवाय तोच मिलीटरी पोलिसाचा ब्रिगेडियर आहे. याशिवाय सगळें सिविल पोलिस तर त्याच्या ताब्यांत आहेच आहे.

इंग्लंडांत हल्ली फारच कडक उन्हाळा होत होता या उन्हाळ्यानें शेतामातांचें तर नुकसान झालेंच, व लोकांस आपल्या उपजीविकेची काळजी पडल्यामुळें गुरें व बकरी मेंढें यांचाही संव्हार होत होता. उन्हाळा इतका कडक झाला होता कीं, त्या उन्हाच्या कडाक्यानें माणसेंही मरूं लागलीं. परंतु नुकताच पाऊस सर्वत्र थंडावा होऊन काळजी दूर झाली.

मेडा येथील यात्रेकऱ्यांत पटकीचा वाखा सुरू झाला आहे.

मक्केस पटकीचा वाखा फारच झपाट्यानें सुरू आहे. ता. १६ मिन्हुपासून बार दिवसांत ८३० माणसें मेलीं! टा० अ०

बंगाल्यांतील ब्याकरगंज जिल्ह्याच्या पोलिस सुपिरिटेंडेंटानें आपल्या ताब्यांतील लोकांस एक सरक्युलर काढून अशी सक्त ताकीद दिली आहे कीं, तुह्मीं कोर्टांपुढें जितके आरोपी पाठवाल त्यांपैकीं शेंकडा ७५ आरोपीस शिक्षा झालीच पाहिजे. या संबंधानें ब्याकरगंज जिल्ह्याचे डि. जज्ज मि. स्टेली यांणीं आपल्या एका मिनिटांत असें लिहिलें आहे हें मिनिट तारीख २७ मे १८९३ रोजीं लिहिलें आहे.

" बाशीरपूर येथील औट पोस्टचा सब-इन्स्पेक्टर आपल्या उघट तपासणींत (क्रास) असें सांगतो कीं, १८९२ च्या पोलीस सुपिरिटेंडेंटच्या हुकुमांत अशी सक्त ताकीद आहे कीं पोलीस जितके आरोपी कोर्टांपुढें पाठवितील त्यांपैकीं शेंकडा ७५ लोकांस शिक्षा झालीच पाहिजे, न झाली तर त्या पोलिसास बढती मिळणार नाहीं इतकेंच नव्हे पण त्यास बर्तर्फही केलें जाईल. हा हुकूम फार गैरशिस्त आहे कारण खटला पुढें पाठविणाऱ्या पोलीस कामगारांस आरोपीस अनुकूल पुरावा दाबण्यास हा हुकूम हें प्रत्यक्ष उत्तेजन आहे. "

पाचोरें तालुक्याची पहिली जमाबंदी १८६१-६१ सालांत झाली. या तालुक्यांत सरकारी गांव २१८ आहेत. त्यावेळीं ह्या तालुक्यांतील जमिनीच्या मगदुराप्रमाणें आठ वर्ग करून त्यावर वेगवेगळी आकारणी केली होती. पहिला ११ गांवांचा वर्ग त्याची दर एकरीं ३ रुपये आकारणी, दुसरा ६९ गांवांचा वर्ग त्याची दर एकरीं ३ रुपये तिसरा ५० गांवांचा वर्ग त्याची दर एकरीं २ रुपये; चौथा ७२ गांवाचा वर्ग त्याची दर एकरी २ रुपये, आणि बाकीच्या पन्नास गांवांचे चार वर्ग करून त्यांची आकारणी कमी कमी करीत करीत शेवटचा दर १ रुपये ठरविला होता. आतां नवी मोजणी केली तेव्हां जास्त आकारणी करण्यासाठीं या तालुक्यांतील लोकांची घरें दारें, गाड्या घोडीं, विहिरी हीं इतकीं उत्तम झालीं आहेत व वाढलीं आहेत कीं, त्यामुळें त्यांची ऐपत पुष्कळ वाढली आहे व त्यामुळें सरकार धाऱ्याचें त्यांच्यावर जास्त ओझें बसवण्यास कांहींएक हरकत नाहीं अशी सर्व्हे सुपिंटेंडेंट मि० पिट यांणीं शिफारस केली. जमिनींचे निरनिराळे वर्ग आहेत ते मोडून टाकून सगळ्या तालुक्याला एकच दर लागू करावा अशी शिफारस मि० पिट यांणीं केली, ती सर्व्हे कमिशनर व मध्य भागचे कमिशनर मि० रीड यांणीं मान्य केल्यावरून २१८ गावांस सर सकट तीन रुपये तीन आणे दर एकरास आकार घ्यावा असें ठरवून सरकारानें नवी धारेबंदी मंजूर केली.

दिवाणी कोर्टांत पक्षकारांचे जे पैसे जमा होतात ते त्यांनीं जमा झाल्या पासून सहा महिन्यांच्या आंत न्यावे, ते त्यांणीं नेले नाहींत तर सहा महिन्या नंतर ते पैसे सरकार जमा केले जातील, ह्मणजे मालकांस मिळणार नाहींत असा दिवाणी खात्यांत एक नवा ठराव झाला आहे. उगीच पैसा जमा ठेवून तो संभाळण्याची जोखीम व किरकिर आपल्यावर राहू नये अशा हेतूनें दिवाणी खात्यांतून हा ठराव झाला असेल. दिवाणी खातें जर पक्षकारांच्या जीवावर अवलंबून आहे. व न्यायाबद्दल ते खाते जी किंम्मत घेते तो इतकी भारी आहे कीं तींतून खर्च वेंच वजा जातां शिलक राहते तर त्या खात्यानें आपल्या यजमानाशीं असें वर्तन करणें वाजवी नाहीं. अस्तु हा पैसा कोर्टांत आला कीं नाहीं. पक्षकारांस कळविल्या शिवाय कोर्टास असा नियमच करितां येत नाहीं असें आमचें मत आहे. पैसा कोर्टांत जमा झाल्याची वर्दी पैसा जमा झाल्या बरोबर कोर्टांनीं बिन खर्चानें पक्षकारास नोटिशीनें कळवावें, व तसें त्यास कळविल्याबद्दल त्याचा जाब आणवावा. सहा महिन्यांच्या आंत पैसा बुडेल हे ही त्या नोटिशींत त्यास कळवावें. ह्मणजे गरीब लोक व्यर्थ बुडणार नाहींत. व सरकारावर निष्ठुरपणाचा आरोप येणार नाहीं अशी आमची सूचना आहे शिवाय पक्षकार हजर झाल्याबरोबर त्यास पैसा देण्याची सक्त तजवीज ठेवावी.

शु० सू०

इंग्लंडांत दुष्काळ पडण्याची भीति वाटूं लागली आहे. चोहोंकडे पिकें बुडालीं, गुरांना पुरेसें गवतही होण्याची आशा नाही!

फ्रान्स देशांतही दुष्काळ पडण्याची भीति पडली असून लोकांना मदत करण्यासाठीं फ्रेंच सरकारजवळ ५० लाख फ्रांक्स मागण्यांत आले आहेत.

हिंदुस्थानांतल्या टांकसाळी बंद होण्याचें चिन्ह दिसत आहे. व तशा बंद करण्यापूर्वीं हिंदुस्थान सरकार त्याबद्दल एक स्वतंत्र कायदा करणार आहे.

नवीन ठरावाप्रमाणें नव्या एलूएल् बी.' च्या परीक्षेची फी ५० रुपये केली असून जुन्या पद्धतीच्या एलएल् बी.' परीक्षेची फी ३० रुपये होती तीही ५० रुपये करण्यांत आली आहे.

बायकांची शक्ती व बुद्धिमता.—सुप्रसिद्ध विद्युच्छास्त्रवेत्ता एडिसन याचें असें ह्मणणे आहे कीं, विद्युद्यंत्रें चालविण्यास व विजेचा शक्ति जाणण्यास बायका जशा कुशल असतात तसे पुरुष नसतात. विद्युच्छक्तीचे ज्ञान बायकोला एका मिनिटांत जें होईल तें पुरुषाला त्याच्या सर्व आयुष्यांत होणार नाहीं! एडिसनच्या कारखान्यांत २०० नायका आहेत.

इराणांत रेल्वे—इराणच्या शहाने एका रशियन कंत्राटदाराला आपल्या राज्यांत रेल्वे बांधण्याची ९९ वर्षांच्या करारानें परवानगी दिली. हा रेल्वे काझवीन पासून रेशतपर्यंत बांधली जाणार आहे. हा. च.

## नोटीस

तीर्थ स्वरूप रा. रा. सखाराम हरबाजी सईतवाळ माहूरकर राहणार विहिगांव ता० खामगांव जि० आकोला यांस:—

साष्टांग नमस्कार विज्ञापना कीं तुह्मी माझें रहातें घर व शेतें मिळून सर्व जमीनजुमला माझ्या सावकाराचें कर्ज फेडण्या साठीं आपल्याला गहाण लिहून घेण्याचें कबूल केलें मला कर्ज देणें सरासरीनें निघत होतें त्याच्या मानानें दोन हजारास गहाण देण्याचें ठरलें व त्या प्रमाणें तुह्मी माझ्या नांवचे एक कर्ज खामगांवचे दुकान मोतीजीच्या खात्यावरील व दुसरे देवीदास जमनादास याच्या कडील गहाण दस्तऐवज सोडवून घेतला त्यासाठीं दिलेले रुपये मिळून सुमारें ७८० दोन हजारांपैकीं आदा केले. बाकी १३०० रुपये देणें उरलें होते. मला लिहितांवाचतां येतें तरी तुम्ही माझे चुलते व संभाळकर्ते म्हणून स्वतांस जाणवीत होता म्हणून मी तुम्ही सांगितलेल्या वरून मन समोर ठेविलेल्या दस्तऐवजावर तो गहाणाचा आहे असे पूर्वी संकेता प्रमाणें समजून निखूटपणें मी आपली सही व दस्तूर केला. पुढें तो दस्तऐवज नोंदण्यास गेल्या दिवशीं खामगांवच्या सब रजिस्ट्रारनें 'खरेदीखत' लिहून दिलें काय असें विचारतांच मी घाबरलों व आपलें कृष्णकर्म लक्षांत आलें. गहाणाचा दस्तऐवज ह्मणून फसवून तुह्मी माझ्या कडून खरेदीखत लिहून घेण्याचा संकल्प केला उघडकीस आला. या खोटेपणामुळें खरेदीखत नोंदले गेलें नाहीं. व बाकीचे भरपाईचे १३०० रुपये ही मी घेतले नाहींत. तुम्ही आपल्या गोडबोल्या स्वभावानें माझ्या मातोश्रीलाही आपल्या सारखे भुळथापीनीं व माझ्या विरुद्ध कांहीं तरी सांगून करून घेतलें आहे. परंतु तुमचा आंतला पेंच माझी इस्टेट बळकावण्याचा व मला फसविण्याचा आहे.

या नोटिशीनें तुह्मास विनंती करण्यात येते कीं तुह्मी तो खोटेपणानें लिहिलेला दस्तऐवज फाडून परत द्यावा आणि तसें न कराल तर मी दिवाणीत फिर्याद करून तो रद्द करीन. शिवाय मी असें ही ऐकतों कीं तुम्ही त्या दस्तऐवजाच्या आधारें फिर्याद अर्जीद वगैरे करीत आहा तर तसें कांहीं केल्यास त्याबद्दलची जबाबदारी व खर्च तुमच्या शिरावर राहील इतकें नाही तर विश्वासानें मला तुम्हीं फसविलें व माझी स्थावर जिनगी घेण्याचा खोटेपणानें घाट घातला या बद्दल प्रसंग पडल्यास पुराव्यानें शाबीत होईल तशी मी तुह्मावर फौजदारीतही फिर्याद चालवीन आणि तसें करण्यास तुमच्याकृत्यानें मला भाग होईल. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत या नोटिसीच्या खर्चा सुद्धां वरील पोकळ दस्तऐवज परत करावा आणि या उपर माझ्या इस्टेटीवर तुह्मी कोणत्या ही प्रकारें हक्क सांगतां कामा नये व त्याजबद्दल कांहीं व्यवस्थाही करूं नये. कळावें तारीख २७ माहे जून सन १८९३ इसवी

सही

अंतोवास बळवंत रावजी सईतवाळ राहणार विहिगांव ता० खामगांव दस्तुर खुद्द.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

NO. 27

Six monthly..........3 " 8 as
Single copy.........................1 as

Advertisemen
Below 10 lines... 2 Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

SUPPLEMENT OF THE BERAR SAMACHAR MONDAY 11 DECEMBER 1893.

TIME TABLE FOR THE BERAR HOSPITAL ASSITANT CLASS ENTRANCE EXAMINATION 1893.

| Branch. | Day | Date | Time | Subject | Maximum Marks | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Monday | December 18 th. | 10 — 10·30 | Dictation — English. | 10 | |
| | | | 10-35 — 11-5 | Dictation — Vernaculars | 10 | |
| | | | 11-30 — 1 | Translation A. From English to Vernaculars | 20 | |
| | | | | B. From Vernacular to English | 20 | |
| | | | 2 —— 5 or at the discretion of the Superintendent. | Viva- Voce Exmination in Urdu and the other Venaculars. | | All candidates must satisfy the Examiner that they can read their own Vernaculars correctly and fluently, and can speak Urdu fairly well if it is not their Vernacular. |
| II | Tuesday | December 19 th. | 10 — 1 | Arithmetic | 40 | The first four rules, Vulgar and decimal fractions |
| III | " | " | 2 — 3-30 | History | 30 | The leading facts |
| IV | " | " | 3 30——5 | Georgraphy | 30 | India |

N. B. Twenty mistakes in spelling will exclude from further Examination. Candidates must obtain 33 per cent in Branch I, and 25 per cent in Branches II, III and IV.

( Sd., ) H. P. Hodson M. A.
Commissioner
for H. H. the Nizam's U. E. S. Examinations

## विजया दशमीचें सोनें

Ethereal minstrel; pilgrim of the sky!
Dost thou despise the earth where cares abound?
Or while the wings aspire, are heart and eye
Both with thy nest upon the dewy ground?
Thy nest which thou canst drop into at will,
Those quivering wings composed, that music still!
To the the last point of vision, and beyond
Mount, daring warbler!—that love-promoted strain
—'Twixt thee and thine a never-failing bond—
Thrills not the less the bosom of the plain:
Yet might'st thou seem, proud privilege! to sing
All independent of the leafy Spring
Leave to the nightingale her shady wood;
A privacy of glorious light is thine,
Whence thou dost pour upon the world a flood
Of haamony, with instinct more divine?
Type of the wise, who soar, but never roam
True to the kindred points of Heaven and Home.

W. Wordsworth.

या मायळ्या खालीं ज्या कविता येत असतात त्यांचें मूळ इंग्रजींत दिलेलें असतें तरी ही कवितांची पुर्ण खुबी लक्षांत येत नाहीं असें बऱ्याच वाचकांचें म्हणणें असून आम्हीं त्याच काव्यांचा मराठींत भावार्थ द्यावा अशी त्यांनी सूचना केल्या-वरून आजपासून भावार्थ देण्याचें योजलें आहे. ज्या मित्रांनीं ह्या सूचना केल्या त्यांचे आम्ही फार फार आभारी आहों हें वेगेळ लिहावयास नकोच-

भावार्थ—भारद्वाजाचा— भारद्वाज पक्षी पाहून व त्याचें उड्डाण पाहून कवीस हा पक्षी भूमीचा तिरस्कारच करतो आहे असें वाटून तो पक्ष्यास बोलत आहे. पक्ष्यास आपलें गायन बंद करून व हलणोरे पंख शांत करून वाटेल तेव्हां घरट्यांत जातां येतें या वरून या आकाशांतील गवयाचें मन व दृष्टि दंवाच्छादित भुवरील घरट्यावर असतें अशीही कवीची कल्पना होते.

पक्षी वसंत ऋतूतच काय पण वाटेल तेव्हां गायन करीत असतो. या वरून हें सतत चालणारें गायन प्रेमगीत आहे अशी कवीची कल्पना होते व तें तो त्यांच्या व त्याच्या स्वकीयांतील शृंखलाच आहे अशी कल्पना करितो.

बुलबुलपक्षी च्छायाच्छादित झाडींत असतो परंतु भारद्वाजास दगापार असणाऱ्या प्रकाशाचा उपभोग घेतां येतो. तेयून तो गानवृष्टि करतो.

या वरून कवीस उपयुक्त सार दिसतें ते हे कीं शहाणे प्रपंच साधून परमार्थ साधन करतात व मन भटकूं देत नाहींत.

भारद्वाज ( आर्या )

॥स्तुति पाठक वैहायस ! यात्रिक वृत्तींत कां सदा गगनीं?॥
वा चिंता बाहुल्यें किंवा अवमानिशी खणा! धरणी॥ १॥
पक्षद्वय तुज नेती गगनीं, परि चित्त भूवरि वाटे॥
असकृत् पाहे लोचन दव बिंदु क्लिन्न तव सदा घरटें, ॥ २ ॥
मंजुळ विरुता सोडुनि, कंपित पक्षा करोनि पिहित, कसा॥
इच्छा मात्रें घरटीं येतासी अन्यथा खगा! सहसा ॥ ३ ॥
घे उंच धाव गगनीं, नयन पथातीत गगन देश फिरे; ॥
प्रणय प्रेरित रव हा दयिता चिरकाळ रागसूचक रे ! ॥ ४ ॥
हे धृष्ट गायका! तव आकाशांतूनि मधुर रव येत॥
श्रवणीं, भारद्वाजा! करितो चंचळ अतीव नर चित्त ॥ ५ ॥
पाल्लवता वृक्ष लता, मधुमासीं मत्त खगकुळें दुसरी,॥
षडृऋतु समाचि तुला बा!; प्रगल्भता दक्ष! तव अपूर्व खरी ॥ ६ ॥
छाया विपुळ तरूंनीं बुलबुल सेवो सुखें; परी धन्य! ॥
निर्मळ कांति सुखाचा भोक्ता तूं एकटा, न खग अन्य ॥ ७ ॥
लोटे पूर रवाचा मंजुळ तव हा नभां तुनी जेव्हां॥
"स्वत्सहज बुद्धि मध्यें दैव्यशाचि विपुळ" वाटले तेव्हां. ॥ ८ ॥
आदर्श बुधांचा तूं सन्मार्गी रत;—न बावरा फिरसी, ॥
इहपर सवर्ग वस्तु ग्रहण यथार्थे करोनि तु रमसी ॥ ९ ॥

---

नोटीस

रा. रा. जयराम वल्लद मारुती पावरुय राहणार खरपपावाविव तालुके व जिल्हे अकोले यांस नोटीस देणेघी मर्द जयराम हल्लीं राहणार कान तालुके व जिल्हा अकोले नोटीशीनें कळविते कीं तुजशीं माझें लग्न होऊन असें वर्षे (११) अकरा झालीं लग्न झाल्यावर वर्षांनीं तुजला महारोगाची व्याधी व ती हल्लीं आतिशय झाली आहे ह्यांतूनची तबेत चांगली होणेची बिलकुल कांही प्रकारानें काही इतकी आशा नाहि शहाणी होऊन आज अदमासे ३ तीन झालीं ह्या तीन वर्षांत तुली दवापाणी घरेट व्हा अशावद्दल वाट पाहिली परंतु तर होणेचें एकीकडे राहिलें उलट दिवस व्याधी ज्यास्ती होत आहे. मी कोवळी व माझा सर्व जन्म व्यर्थ जाणार व आहे. याजकरितां तुह्मास बहुत वेळा सांगितलें कीं, नवरेपणाचा हक्क सोडून सोडचिठ्ठी द्यावी. ह्मणजे माझ्या स्त्री जन्माचे सार्थक होईल. ह्मणून सांगितलें परंतु तुह्मी काहीं एकत नाहीं. व माझा जन्म व्यर्थ जात आहे ह्या करितां नोटिशीनें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून दिवस (८) आठचे आंत चिट्ठी देउन फारकती द्यावी. व मजला मुक्त करावें असे केलें नाहीं तर हीच तुमची चिठ्ठी आहे असें समजून मी दुसरा घर करीन मग तुमचा नवरेपणाचा कोणतेही प्रकारचा हक्क मजवर नाहीं. तुह्मांस सर्व उघड उघड नोटीसीनें कळविलें आहे तर तुह्मी नोटिशींत लिहिल्या प्रमाणें सोडचिठ्ठी द्यावी ह्मणून दिली नोटीस सही ता. २३-११-९३ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी. चिठी मर्द जयराम इच्या हातची असे.

---

नोटीस.

रा. बाळकृष्ण हरबाजी नाईक बोर्डीकर जात ब्राह्मण राहणार कस्बे अकोट यांस खालीं सही करणार इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास माझें जें कुलमुक्त्यारपत्र आहे तें आज रोजीं रद्द केलें. आज पासून तुमचा पगारही बंद आहे. नोटीस पावले दिवसा पासून चार दिवसांत वद्याचे वगैरे सर्व हिशेब आह्मास समजाऊन द्यावे. असें केलें नाहीं तर रीती प्रमाणें तजवीज करून सर्व नुकसान निकाल होईपर्यंत जें होईल तें व या नोटीशीच्या खर्चा सुद्धां भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २९ माहे नोवेंबर सन १८९३ इ.

( सही )

इंद्राबाई जवजे मुळीधर जहागीरदार मौजे अडगांव खुर्द.

निशाणी खुद.

---

जाहिरात

सर्व लोकांस जाहिरात देण्यांत येते कीं बाळकृष्ण हरबाजी नाईक जात ब्राह्मण बोर्डीकर या इसमास आह्मी नोकरींतून कमी केलें व त्याचें कुल मुक्त्यारपत्रही रद्द केलें आहे करितां माझे संबधांत आजपासून त्याला कोणी पैसा वगैरे देऊं नये दिल्यास त्याज बद्दल मी जबाबदार नाहीं. कळावें तारीख २९ माहे नोवेंबर सन १८९३ इ. दस्तुर भगवंत विठ्ठल देशपांडे प्रगणे अडगांव.

सही

इंद्राबाई जवजे मुळीधर जहागिदार मौजे अडगांव

निशाणी खुद्द.

---

## जाहिरात.

हे पाक पहा वाशिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भीत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतूंत हिवाळ्यांत खाण्यानें शक्ति, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ति देणारी भागपसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. पाहिजे त्यांनीं मागविल्यास आह्मी व्हयुपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ अमिश्रीपाक दर शेरास (८० तोळ्यास) } किंमत ३ रु
२ आम पाक.................................२॥ रु.
३ अमिमश्री व बदाम प्रत २........ ३ रु.
४ भागपसुंठ ...................................२ रु.
५ कुंड पाक ................................. ५ रु.
६ गेहूं पाक .................................. ७ रु.
७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता— शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.

रुपया बसवावा.

आकारणी करण्याची रीत—म्युनिसिपल कमिटीनें मुद्दाम नेमिलेल्या सब कमिटी कडून कराची आकारणी केली जाईल व सदर्हू आकारणी म्युनिसिपल कमिटीचे मंजुराती करितां जनरल कमिटी पुढें ठेवण्यांत येईल.

कराच्या आकारणीच्या याद्या गांवांत प्रसिद्ध ठिकाणीं लाविल्या जातील आणि म्युनिसिपल आफिसांत पाहण्यास मिळतील.

कर देणाऱ्या प्रत्येक इसमास कराचे आकारणीची नोटीस दिली जाईल.

सदर्हू आकारणी संबंधीं ज्याची तक्रार असेल त्यांनीं नोटीस पावल्या दिवसां पासून एक महिन्याचे आंत लेखी तक्रार केली तर म्यु० कमिटी त्याचा विचार करील. जर एखादा इसम किंवा दुकानाचा म्यानेजर गैरहजर असेल आणि दुसरा कोणी योग्य एजंट नसेल सबब नोटीस बजावतां येत नाहीं तर तक्रार दाखल करण्याची तारीख सदर्हू इसम परत आले तारखे पासून एक महिना समजली जाईल.

ज्या इसमांस सदर्हू सुचविलेल्या करा संबंधी तक्रार करावयाची असेल त्यांनीं ह्या नोटिसीचे तारखे पासून ३० दिवसांचे आंत लेखी तक्रार कमिटी कडेस करावी त्यांचे तक्रारीचा विचार कमिटी स्पेशल मिटींग मध्यें करील.

| | |
|---|---|
| आकोट. | K. S. Tambe. |
| ता० २२।१।१८९४ | सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी. आकोट. |

## नोटीस.

विद्यमान डेप्युटि कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोले यांचे कचेरीतून

सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं अकोलें जिल्ह्यांतील बाजारचे लिलाव खालीं लिहिल्या तारखेस दिवसा बारा वाजता त्या त्या तालुक्यांतील तहसिलदारांचे समोर केले जातील त्या तारखा.

| | |
|---|---|
| अकोले तारीख | ५–२–९४ |
| अकोट तारीख | १२–२–९४ |
| बाळापूर तारीख | १९–२–९४ |
| खामगांव तारीख | २६–२–९४ |
| जळगांव तारीख | ३–३–९४ |

बाजार लिलावाच्या शर्ती संबंधाचे नियम जे हल्लीं अमलांत येत त्या संबधाची माहिती तहसिल कचेरीत मिळूं शकेल.

कळावें तारीख १२ माहे जानेवारी सन १८९४ इसवी.

R. P. Colomb
For
Deputy Commissioner.

## जाहिरात.

### क्रिमिनल प्रोसिजर कोड.

(आक्ट नंबर १० सन १८९२.)
स्टीक. आवृत्ती २ री.

सदर्हू आक्ट सन १८८२ पासून सन १८९३ अखेर १२ आक्टांवरून दुरुस्त झाला आहे, त्याप्रमाणें या आवृत्तींत दुरुस्ती केली आहे. सन १८९३ अखेरपर्यंत कलकत्ता मुंबई, मद्रास, व अलहाबाद हायकोर्टांनीं केलेले सर्व निवाडे ज्या त्या कलमाखालीं घातले आहेत. मुंबई हायकोर्टानें केलेले वटहुकूम ज्या त्या कलमावर घतले आहेत व इतर जरूर लागणारे फौजदारी आक्ट नमुने १४, याजवरील निवाडे व दुरुस्त्या सुद्धां छपून वेगळे जोडले आहेत; सदर्हू ग्रंथ माहे फेब्रुवारी सन १८९४ मध्यें तयार होऊन लोकांस मिळेल. याची अगाऊ किंमत माहे जानेवारी सन १८९४ अखेर घेणारांस रुपये ४ व टपाल खर्च ८ आणे ठेविली आहे व मागाहून घेणारांस किंमत रुपये ६ व टपाल खर्च ८ आणे पडेल.

| | |
|---|---|
| पुणें "न्यायाश्रय" आफीस ता० ३० नोव्हेंबर सन १८९३. | नरहरराव त्रिंबक राजमाचीकर. बी. ए. |
| | शिवराम हरी साठे. न्यायाश्रयकर्ते पुणें. |

### नोटीस.

रा० बुलाखीदास गोपाळदास वल्लद नारायणदास गु॥ दुकान बाळापूर यांस नारायण वल्लद कोंडजा कोळी वस्ती कसुरे तालुके बाळापूर यान कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे जवळ आमचें गहाणखत ता० ३०।४।९२ चें रुपये १०० चें आहे त्यांत वसूल दिला तो वजा जातां बाकी रुपये व्याजासह देणें आहेत तें रुपये आम्ही देण्यास तुमचे कडेस आलों असतां आपण घेतले नाहीं करितां रुपये खुशालचंद फुलचंद दुकान बाळापूर यांज पाशी ठेविले आहेत तें रुपये आपण त्यांज पासोन घेऊन गाहाणखताची पावती व गहाणखत त्यांज पासी द्यावें असें न केल्यास आज तारखे पासोन तुमचें व्याज बंद होऊन आपण फिर्याद कराल तर त्याचे खर्चांचे वगैरे संबंधी आम्ही जबाबदार नाहीं. कळावें तारीख २४।१।९४ इ०

(सही)
नारायण वल्लद कोंडजा कोळी
दस्तुर खुद्द राहणार कसुरे
तालुके बाळापूर.

### नोटीस

तुकाराम वल्लद पुनाजी हाडोळे वस्ती जळगांव जाटे तालुके अकोट यास खालीं निशाणी करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे धनी असून या दोन वर्षांत मला नांदवींत नाहींत. व मी आपले माहेरी राहून मला अन्नवस्त्रा बद्दल १२० रुपये कर्ज झालें आहे तर हें फेडण्याची व्यवस्था करावी. पुढील माझ्या पोटापाण्याची व्यवस्था करा. मी आपल्या बरोबर संसार करण्यास तयार आहे पण आपण पंचाची खात्री केली पाहिजे कीं, तुह्मी संसार करण्यास व नांदवणें वागविण्यास लायक आहांत. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सर्व व्यवस्था लावावी नाहीं तर मला दुसरा घरठाव करण्याची तुमचे कडून मनाई नाहीं असें समजून दुसरा नवरा करीन आणि कर्ज रिति प्रमाणें वसूल केलें जाईल. तारीख २१ माहे जानेवारी सन १८९४ इसवी.

(सही)
बजी मर्द तुकाराम हाडोळे हल्लीं
वस्ती मुंडगांव निशाणी
खुद्द हातची बांगडी

## TOWN FUND TAX.

Notice is hereby given that at a special meeting of the Akote Municipal Committee held on the 22nd January 1894, a resolution was passed to propose the imposition throughout the area within the Municipal limits of a tax under section 41 (1) B of the Municipal Law in substitution of the existing Town Fund Tax.

The class of persons to be taxed, the amount or rate of the tax to be imposed, and the system of assessment to be adopted are given below as required by section 44 (2) of the Berar Municipal Law.

"Class of persons to be taxed"

The tax shall, subject to the following provisions, be assessable on every person dwelling or personally working for gain or carrying on any business or calling within the limits of the Municipality the whole or any part of whose income derived from any source other than agriculture is not less than Rs. 100 per annum.

Explanation—The word "person" shall include a corporate or an incorporate company.

"Amount or rate of tax."

The tax shall be levied at the rate of one per cent on the taxable portion of the estimated income of the assessee derived from any other source than agriculture.

Proviso I. Provided that no person or firm shall be assessable to the tax at a sum exceeding Rs. 500 or less than annas 8 per annum.

Proviso II That in the computation of the income to be assessed these shall only be deducted from the annual income of the assessee.

(*a*) The sum of Rs. 99 (the minimum non-taxable income).

(*b*) Subject to any condition and restrictions which the Resident may prescribe in this behalf, such portion, if any, not exceeding one sixth of the full annual income (irrespective of the cost of establishment maintenance &) as is aid by the assessee in respect of life-assurance, pension, or provident Fund and Income tax (Imperial)

Proviso 111 That when one per cent on the assssable portion of the income invoves a fractional part of a rupee which is less than 8 annas then 8 annas shall be the amount of the fractional part to be collected and when one per cent on such portion of the income involves a fractional part of a rupee whih is greater than 8 annas then one rupee shall be collected.

"System of assessment to be adopted":—

The assessment shall be made by a sub—Committee specially appointed by the Municipal Committee and shall be submitted for confirmation to a general meeting of the Municipal Committee.

List of assessment shall be conspicuously posted in the Town and shall be open to view at the Municipal office.

Notices of the assessment shall be issued to each person assessed to the tax.

Objections to assessments shall be received and considered by the Municipal Committee if presented in writing within one month of the receipt of the notice. Provided that if any person or manager of a firm, be absent and unrepresented by duly empowered agent and that the notice cannot be served, the period for filing the objections shall be extended to one month from the date of the return of such person or manager or the duly empwered agent of the same.

Any inhabitant of Akote objecting to the proposed tax may within 30 days from the publication of this notice submit his objection in writing to the Committee and his objection will be taken into consideration at a special meeting of the Committee.

Date Akote 22nd January 1894

K. S. Tambe
Secretary
Municipal Committee
Akote

## टाऊन फंड कर.

जाहिरात देण्यांत येते की अकोट म्युनिसिपाल कमिटीने तारीख २२ माहे जानेवारी सन १८९४ इ. रोजी भरलेल्या स्पेशल कमिटींत मुनिसीपल हद्दी मध्ये वऱ्हाड मुनसिपल कायद्यातील कलम ४१ (१) बी अन्वयें खालील प्रमाणें कर बसाविण्याचे ठरविले आहे.

कर बसविण्यास योग्य लोकः—आकोलें म्युनिसिपालिटीचे हद्दींत राहणारा एखादा धंदा, कलेचें काम, उदीम किंवा उद्योग करणारा प्रत्येक इसम ज्याचें शतकी खेरीज करून इतर साधिना सर्व किंवा कांहीं उत्पन्न १०० रुपया पेक्षां कमी नाहीं अशी प्रत्येक इसमावर हा कर बसविला जाईल.

खुलासा—'इसम' यांत कारपोरेट अथवा इनूकारपोरेट कंपनीचा समावेश होतो.

कराची रकम अथवा दर—शेतकीचें उत्पन्न खेरीज करून इतर (साधिना) अंदाज उत्पन्नापैकीं हा कर बसविण्यास योग्य अशा उत्पन्नावर शेकडा १ रुपया प्रमाणें हा कर बसविला जाईल.

प्रोव्हिजो १. कोणताही इसम किंवा दुकान यावर हा कर ५०० रुपयांहून अधिक किंवा आठ आण्याहून कमी बसविला जाणार नाहीं.

प्रोव्हिजो २. कर बसविण्याचे उत्पन्नांतून फक्त खालीं दिलेल्या रकमा वजा केल्या जातील.

(अ) कर बसविण्यास सर्वांत कमी असें अयोग्य उत्पन्न रुपये ९९.

(ब) लाईफ इन्सुअरन्स, पेन्शन, प्रोव्हिडेंट फंड किंवा सरकारी इनकमट्याक्स या बद्दल अलिशान रेसिडेंट साहेब जे नियम किंवा अटी ठरवितील त्याला अनुसरून सदर्हू फंडाकडेस भरलेली सर्व रकम. [सदर्हू रकम वर्षाचें पुरें उत्पन्न—नोकर चाकर वगैरेचा खर्च सुद्धां धरलेलें—याचे $\frac{1}{6}$ पेक्षां ज्यास्त नसावी.)

प्रोव्हिजो ३. दर शेकडा पट्टी बसविण्या जोग्या उत्पन्नाच्या रकमेवर जो एक रुपया बसवावयाचा तो कराचा भाग जेव्हां अपूर्ण असेल ह्मणजे आठ आण्यापेक्षा कमी असेल त्या वेळेस आठ आणे बसवावे. व तो अंश जर आठ आण्या पेक्षा ज्यास्त असेल तर एक

## NOTICE

Under rule 12 of the Municipal rules, it is hereby published for general information, that elections to fill up the vacancies of members in the Akola Municipal Committee who retire on the 31 st March 94 under the operation of Rule 31 st of the Municipal rules, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on 27 th and 28 th of February 1894. The following table gives for each ward, names of retiring members date and place of election, names of polling officers and dates before which nomination papers under rule 13 of the Municipal rules should be delivered to the following officers.

| Ward | Name of retiring member | Date of election | Place of election | Name pof olling officer | Date before which nomination papers to be submitted |
|---|---|---|---|---|---|
| Ward 1 | Rao Saheb Deorao Vinayak<br>Mr. Gopal Hari | Feb. 27 th | Patil's Chawry | Mr. V. N. Dandekar | 19 th February 1894 |
| Ward 2 | " R. M. Sathe<br>" Malinkha | | Grain Market office | Mr. Balkrishn B. Sule | Do |
| Ward 3 | " Maulavi Hakimuddin<br>" Md Azimoddin | 28 th | Town Hall | Mr. V. N. Dandekar | 20 th. Do |

B. M. Sathe.
Secretary
Municipal Committee Akola

## जाहिरात.

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपल कमिटींतील तारीख ३१।३।९४ इ. रोजीं ज्या मेंबराच्या जागा सदहू नियमापैकीं नियम ३१ प्रमाणें खालीं होतील त्या भरण्या करितां तारीख २७।२८ फेब्रुवारी सन १८९४ इ. रोजीं सकाळचे ७ वाजल्यापासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों इलेक्शन (निवडणूक) होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डापैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा पोलिंग आफिसरचें नांव उमेदवारानीं कोणते तारीख पर्यंत पोलिंग आफिसर कडेस म्युनिसिपल रूल १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावे ही माहिती दिली आहे.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसराचें नांव | कोणत्या तारखेचे आंत उमेदवाराने नांवचा कागद द्यावयाचा |
|---|---|---|---|---|---|
| वार्ड १ | रावसाहेब देवराव विनायक<br>मि. गोपाळ हरी साबाकर | २७ फेब्रुवारी ९४ | पटेल चावडी | मि. विश्वनाथ नारायण दांडेकर | फेब्रुवारी १९ तारखेचे आंत |
| २ | मि. बाळकृष्ण [illegible]<br>[illegible] खा | २७ फेब्रुवारी १८९४ | ग्रेन मार्केट आफीस | मि. बाळकृष्ण बळवंत सुळे | सदहू |
| ३ | मि. मौलवी हकीमुद्दीन<br>मि. महमद अजीमुद्दीन | २८ फेब्रुवारी १८९४ | टाउनहाल | मि. विश्वनाथ नारायण दांडेकर | २० फेब्रुवारीचे आंत |

अकोला
ता. १०।२।९४

B. M. Sathe.
सेक्रेटरी
म्यु. क. अकोला.

डवास साहेब य

## नोटीस

रा. टिकू वा। पदमचंद मारवाडी राहणार अकोले ताजनापेठ यांस खाली सही करणार याजकडून नोटिसीनें कळविले जातें कीं कसबे ताजनापेठ पैकील सलीमखा याचे दुकान उत्तरे कडील सडकेचे पुर्वेस जाणाऱ्या मार्गाचे दाक्षिणेचे बाजूस आमची माडी आहे ।। माडीवर नेठमल राहता व खालीं तुह्मी राहाता त्या घराचें भाडें तुमचेकडे आज वितो एकंदर आजमास पंधरा सोळा महिन्याचे आहे तें आह्मी तुह्मास आमचे मुनीम ठेमल हरसुकदास आह्मी स्वतः अनेक वेळा मागितलें परंतु तुह्मी आमचे दुकानावर अदा करीत नाहीं. या नोटिसीनें तुह्मास कळविले जाते की आज तारखे पावेतो एकंदर भाड्याचे रुपये व त्याचे कट मि प्रमाणें व्याज दरमाहा दरसेकडा एक रुपया प्रमाणें व्याजाचे रुपये व नोटिसीचा खर्च योग्य झाला असेल तो असें आठ दिवसांची तुह्मास मुदत दिली आहे तर त्या मुदतीत आणून न दिल्यास आह्मी कोर्टात फिर्याद करून नोटिसीचा खर्च ऐन भाड्याचे रुपये व व्याजाचे रुपये व कोर्ट खर्च समेत भरून घेऊ. नोटीस पोचल्या तारखेपासून चार दिवसांचे आत घर खाली करावें आणि तसे न केल्यास दरमहाच्या भाड्याच्या चौपट भाडे तुह्माकडून कोर्ट मार्फत वसूल केलें जाईल. ही नोटीस दिली तारीख १०।२।९४

नारायणराव बापुराव देशमुख तर्फे<br>
वहिवाटदार कुलमुखत्यार गोविंद<br>
अंताजी दस्तुर खुद्द

## नोटीस

अकोले ता. १०।२।९४

श्रीमंत मा. रा. रा. गोविंद संतो उर्फ नाना संतो मुक्काम खामगाव यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मास एक हजार रुपयाची प्रामिसरी नोट लिहुन देऊन रुपये एक हजार घेऊन गेला. ते रुपये आह्मी तुह्मास अनेक वेळा पत्राने व आमची मुनीम माणसें पाठऊन मागितले परत अदा झाले नाहींत तर आपणास विनंती की आज पासून आठ दिवसांत रुपये एक हजार व त्याचे व्याज रीती प्रमाणें रुपये नेल्या तारखे पासून अदा केले जातील त्या तारखे पावेतो अशी सर्व रकम पाठऊन द्यावी व नोटिसीचा खर्च. असें न झाल्यास मजला लाचार होऊन स्नेह संबंधांत पैसा वाकडेपणा आणावा ही जी वडिलांची ह्मण आहे तिजकडे बघून मुद्दल, व्याज, नोटिसीचा खर्च व कोर्ट खर्च हीं कोर्ट मारफत मागाव्या लागतील तर असा प्रसंग न आणता आपले उभयपक्षी वैरत्व होण्याचा प्रसंग न आणता लोभ आहे त्याजला ज्यास्त भरभराट यावी व माझे घर तुमचें स्वतःचें आहे असें समजून आपण मजला कामा काजा निमित्य व मी आपले कुटुंबातला आहे असें समजून अनेक वेळा भेट व्हावी ही विनंती आहे.

सही

नारायणराव बापुराव तर्फे कुलमुखत्यार<br>
गोविंद अंताजी दस्तुर खुद्द.

## नोटीस

अकोलें ता. १०।२।९४

श्रीमंत मा. रा. रा. गोरराव अणासाहेब मु।। चांदुर यास खाली सही करणार याजकडून नोटीस दिली जाते कीं आपले साक्षात् बंधू माधवराव हे आज अजमास एक महीना दीड महिना झाला परलोकी गेले असो मर्जी परमेश्वराची त्याजला कोणाचा उपाय नाहीं! आतां रा० माधवराव नाना साहेब यांणी आपले स्वताचे कन्येचे लग्नाचे संबधांत आमचे दुकानांत एक हजार रुपयाची प्रामिसरी नोट देऊन रक्कम रुपये हजार नेले. ते रुपये आपणास मागण्यास हरीनें मजवर प्रसंग आणल्यामुळें मारुजा करितो कीं ऐन मुद्दल रक्कम व व्याज रिती प्रमाणें असेल ते रक्कम नेल्या तारखे पासून अदा कराल त्या तारखे पावेतो व नोटिसीचा खर्च असें देणें. या प्रमाणें न झाल्यास लाचार होऊन मजला स्नेहसंबंधांत पैसा वाकडेपणा आणतो ही जी वडलांची ह्मण आहे ती खरी मानून तिजला मान द्यावा लागेल व रिती प्रमाणें तजवीज करणे भाग पडेल. आणा साहेब मी आपले कुटुंबातील मनुष्य आहे व आज पावेतो माझे वडिलाना ही आपण पुर्ण कृपेनेच वागविलें व आह्मास ही मोटाच आपला आश्रय आहे आतां पैशा करितां माझेशी आपले वैरत्व यावें ही मजला मोठीच वाईट गोष्ट आहे व माझे वडील व आपले बंधुही स्वर्गवासी हासतील परंतु काय करावें इलाज नाहीं. कम नशीब माझें! असे न होता रकमेची कोणतेही सुरतेनें अदाई होऊन माझे घर हे आपण आपले स्वतःचे आहे असें समजून मजवर आपला लोभ दिवसानुदिवस ज्यास्त भरभराटीस आणाल अशी आशा आहे आपण वडील सुज्ञ आहा ज्यास्त लिहिणें नको.

( सही )

नारायणराव बापुरावजी देशमुख तर्फे<br>
कुलमुखत्यार गोविंद अंताजी<br>
चितळे दस्तुर खुद्द.

किरकोळ अंकास ...................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisemen
Below 10 lines... 2 Rs
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

VOL. XXVII | AKOLA MONDAY 10 JULY 1893 | NO. 27

वर्ष २७ | आकोला सोमवार तारीख १० माहे जुलै सन १८९३ इ० | अंक २७

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुस्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्मातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उवड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अथवा तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें, परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळलेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्या विषयीं घेणाराची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचा जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतंतूच्या योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूची अशक्तता साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून रहणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळेंत F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधागिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक' नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कैंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, नाळंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रीट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व. किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, म्युनिसिपल कमिटीचे हद्दींतील जळाऊ लांकडें कमेटीनें टीनहालवर जमवून ठेविलीं आहेत. सदरहू लांकडाचा हरास तारीख १२।७।९३ रोजीं होणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सकाळीं ७॥ वाजतां टीनहालांत येण्याची तजवीज करावी कळावें. तारीख २९।७।९२ इ०

Gopal Hari
Secretary—A. M. C.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता० ३।७।९३ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० आर्द्रा नक्षत्र लागल्या पासून फारसा पाऊस नव्हतां. पेरणीचें काम मोठ्या ह्मपाट्यानें बहुतेक संपलें. कालपासून पुन्हा आकाशांत अभ्रें येऊन आज तर सूर्यदर्शन होईल कीं, नाहीं याचा संशयच वाटतो. शेती लोक आनंदांत असून रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. पाऊस सुमारें ९ इंच पडला.

रा. रा. गणेश गोपाळ क्लार्क आफ कोर्ट हे दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवरून परत येऊन आपले कामीं ता० २६-६-९३ इ० रोजीं रुजू झाले. यांची प्रकृती नीट नसल्या मुळें त्यांनीं रजा घेतली होती व रजेच्या मुदतींत पुण्याकडे जाऊन शेंकडों रुपये खर्च करून औषध घेऊन प्रकृती सुधारली परंतु अजून मोगक्तृत सरलें नाहीं. रजेवरून परत येतांना अकोलें मुक्कामीं त्यांना हींव तापानें गांठिलें. तो आजार अजून चालूं आहे. ईश्वर करो व त्यांना लवकर आराम होवो. मि० गणपतराव अगदीं साधेभोळे व संभावित असून आपले कामांत फार हुशार आहेत. लहानपणा पासून त्यांच्या हातून सर्व कामें झालेलीं असल्यामुळें त्यांचे कामांत कोणी त्यांचा हात धरू शकेल असें वाटत नाहीं. ह्यांनीं मोठमोठ्या नामांकित साहेबांचे हाताखालीं कामें करून त्यांचीं चांगलीं सरटीफिकीटें मिळविलीं आहेत. नुकत्याच ज्या तहसिलदारीच्या जागा खालीं झाल्या त्या भरतांना त्यांच्या हक्काचा विचार मे० कमिशनर साहेब बहादुर यांनीं करावयाचा परंतु अशी चूक कशी झाली कोण जाणे! मि. गणपतराव यांचेपेक्षां जुनियर लोकांना तहसिलदारी मिळून यांचे हक्कांची पायमल्ली झाली असें विचार केल्यास विचारा अंतीं मे० कमिशनर साहेब बहादुरांना कळून येईल. इतर खात्यांतील लोक ह्या खात्यांत शिरकाव करूं लागले तर योग्य अनुभविक मनुष्यांना उत्तेजन कसें यावें! मे० कमिशनर साहेब बहादूर हे फार दयाळु व न्यायी आहेत अशी त्यांच्या कारकीर्दीची ख्याती आहे तेव्हां पुनः संधी आल्यास ते यांच्या बद्दल जरूर विचार करतील अशी आशा आहे.

रा. रा. नारायणरावजी सिंदे नायब तहशिल्दार पुसद यांना मंगरूळपीर येथें असतां क्षुल्लक कारणावरून बरतर्फ केलें. सदर्हू गृहस्थ २६ वर्षांचे नोकर असून त्यांची कारकीर्द चोख आहे असें त्यांचे सरवीस बुक, क्यारेक्टर बुक, व वरिष्ठांच्या रिपोर्टांचे उतारे यावरून सिद्ध होतें. अशा मनुष्यावर असें नाहक्क लचांड घेऊन त्याला अगदीं जमीनदोस्त करणें न्यायाला अनुसरून नाहीं. त्यांनीं वरिष्ठांकडे एक दोन वेळां अर्ज केले. परंतु दाद लागली नाहीं तरी मनुष्यावर प्रसंग आल्यावर त्याच्यानें उगीच कसें बसवेल? त्यांनीं पुनः खटपट केली व अपिलाच्या रूपानें व समक्ष भेटून आपली हकीकत मे० कमिशनर साहेबां पुढें मांडिली. व त्यांनींही योग्य विचार करूं व नोकरीचा हुकूम पाठवूं असें त्यांस सांगितलें. पुढें सदर्हू पेशकार साहेब चिखलदरा मुक्कामीं तापानें आजारी पडून सुमारें एक महिन्या पासून येथें हुकुमाची वाट पहात आहेत. अजून हुकूम नाहीं. व पुढें काय परिणाम होतो तेंही कळत नाहीं. आपल्या पत्रांत तसेंच आपले बंधु वैदर्भ कर्ते यांस कोणी सांगितलें कोण जाणे! खरोखर राजश्री शिंदे अद्याप हुकुमाकडे डोळे लावून देवाचा धांवा करीत आहेत. वार्तेवर भरंवसा ठेवून कांहीं तरी प्रसिद्ध केल्यानें लोकांची वर्तमानपत्रावरची भक्ती उडते. तेव्हां जें प्रसिद्ध करणें तें आधारभुत असावें. असो. अजून मि० सिंदे यांचें प्रकरण लांबणीवर कां पडलें कळत नाहीं. तर मे. कमिशनर साहेब बहादूर त्यांच्या बद्दल योग्य विचार करून त्यांना नोकरीवर कायम करण्याचा हुकूम लवकर पाठऊन त्यांना संकटांतुन मुक्त करतील अशी लोक इच्छा करितात. आतां ईश्वर त्यांना काय बुद्धी देतो तें पहावें.

मि० मोळे ता० २१।६।९३ इ० रोजीं सर्व दिवस काम करून शरीर प्रकृती चांगली असतां त्याच रात्रीं डोकें दुखूं लागून ताप आला व अंगाला मुंग्या येतात असा भास होऊन अर्धें अंग लटकें पडलें. ते येथें जवळ पोस्टापाशीं अरण्यांत रहात असत. जवळ एक स्वयंपाकी ब्राह्मण व इतर चाकर माणसें—दुसरें घरचे कोणी नाहीं परंतु सुदैवाची गोष्ट कीं मि. त्रिंबकराव पोस्ट मास्तर हे जवळ असल्यामुळें त्यांनीं अतीशय यांच्या करितां मेहनत घेतली. त्याच प्रमाणें मि. गंगाधर हरी नामजोशी हेही फार उपयोगी पडले. या दोघांनीं त्यांच्या घरच्या मंडळीला तार पाठवून उमरावतीहून त्यांचें कुटुंब, मुलें व वऱ्हाडांतील प्रसिद्ध डाक्टर खोत यांना आणविलें. त्यांनीं येथें येऊन ता० २८।६।९३ इ० रोजीं मि. मोळे यांना गाडींत घालून अकोल्या मार्गानें त्यांचे घरीं उमरावती येथें नेलें. त्यांच्या आजाराची वार्ता ऐकून त्यांचे मित्रांना खरोखर वाईट वाटेल यांत संशय नाहीं.

मि. डेवीस साहेब यांनीं आपले बोर्डाचे चेअरमनचा रोजीनामा दिला. आतां मि. हेअर साहेब बहादूर तें काम पहातील असें

दिसतें कळावें हे विनंती.

आपला " क्ष "

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक आषाढ वद्य ११ शक १८१५

## हिंदुस्थानच्या प्रजेची नागवणूक

( चलनी नाण्याच्या नव्या कायद्याचे दुष्परिणाम )

विद्युल्लता प्रमाणें हा कायदा सिमल्याच्या शिखरावरून एकदम पडला तो सर्व देशाच्या रसातळापर्यंत जाऊन पोंचला आणि त्या योगें इंडियांतील व्यापार व व्यवहार सोन्यारुप्या संबंधानें सर्व ठार बसले. बादशाही कायदे कौंसिलांत हा कायदा पसार झाला तेव्हां व्हाइसराय आदिकरून कौंसिलदारांनी अशी भयंकर दहशत घातली कीं जणू कांहीं एखादें परचक्र येऊन राज्याचा समूळ नाश होण्याचा रंग दिसत आहे ह्मणून नेहमींचे नियम, विचार व वादविवाद हीं अस्तास पोंचविलीं, आणि लष्करी कायदा चालू केला. थंडपणानें विचार करण्याची वेळ उरली नाहीं, वेळ नसल्यामुळें सर्व कौंसिलदार जमले नाहींत आणि मग हजीर तो वजीर या ह्मणी प्रमाणें लार्ड लान्सडाऊन, सर डेव्हीड बारबर इत्यादिकांनीं सर्व देशावर नव्या कायद्याचा तोफखाना चालू करण्याचा हुकूम दिला. लार्ड हर्शेल साहेबांची कमिटी गहन विचार करून शेवटीं निराश झाली आणि तिनें युक्तिवाद लढविला कीं हिंदुस्थान सरकारची सूचना आह्मांस खोडतां येत नाहीं आणि त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला व प्रसंगाच्या आणिबाणीला महत्व देऊन ती सूचना आह्मी कायम ठेवितों. इकडे कौंसिलांत व्हाइसराय वगैरेनीं आपली जबाबदारी हर्शेल कमिटीवर झोंकावी आणि प्रतिपादन करावें कीं आमच्या सूचनेला हर्शेल कमिटीचें पूर्ण अनुमोदन आहे तेव्हां या कमिटीच्या संमतीच्या अधिकारवैभवावर नवा कायदा करणें गैर नाहीं. काळोख्या अंधारांतून जाण्या विना गत्यन्तर नाहीं तेव्हां हर्शेल कमिटीच्या शहाणपणाच्या जोरावर उडी घालावी हें बरें!

टांकसाळेंतून रुपये पाडून देणें बंद झाल्या बरोबर देशांतील मौल्यवान रुप्यास किंमत नाहींशी झाली. रुप्याच्या विटा ज्यांजकडे त्या निरुपयोगी होऊन पडल्या. लोकांच्या जवळील रुपें व रुप्याचे दागदागिने बिनमोलाचें झाले. सरासरीनें चांदीचा भाव पूर्वी असा असे कीं निदान तिची किंमत जितके रुपये भार चांदी तितके रुपये मिळत असत परंतु सध्यां चांदीला कोणी पुसत नाहीं. लोकांच्या पाशीं जें सोनें होतें तें भारी किंमतीचें होतें परंतु नवीन कायद्यानें सरकारांत त्याचा भाव उतरला ह्मणजे सोन्याच्या व रुप्याच्या संपन्नतेचा अर्थ असा कीं, जो कोणी पूर्वी पांच लक्षाचा मालक होता तो या कायद्यानें तीन लक्षाचा झाला. दोन्ही बाजूनें हिंदुस्थानची प्रजा नागविली.

महाराणीच्या शिक्याच्या रुपयाची किंमत फार वाढली. त्या रुपयाभार चांदीस आठ बारा आणे किंमत येते परंतु त्याजवर महाराणीचा मुखवटा टांकसाळेंत उमटविला कीं त्या तुकड्याची किंमत बरोबर सोळा आणे. 'केसरीकारां' नीं लिहिल्या प्रमाणें कागदी नोटा असतात त्यांत जशी मूळची कागदाची किंमत कांहीं नाहीं त्याच प्रमाणें एक रुपया हें नाणें कागदापेक्षां जास्त किंमतीचा पदार्थ होय. परंतु त्यांतील चांदीची किंमत मात्र फार थोडी आहे.

हिंदुस्थाना सारख्या देशांत चांदीस किंमत नाहींशीं झाली ह्मणून रुप्याच्या खाणी अमेरिकेंत बंद पडूं लागल्या. नेटिव संस्थानांतील टांकसाळेंतून नाणें पाडण्यासाठीं चांदी घेण्याचे बंद केलें. चांदीची किंमत कमी झाली ह्मणून चीन देशचे व्यापारी आपल्या एक रुपयाच्या नाण्यांतील चांदीस पूर्वी इतका माल देणार नाहींत. महाराणीच्या ठशाच्या नाण्यास चीनच्या व्यापाऱ्या पाशीं त्यांतील चांदीचीच फक्त किंमत आहे तेव्हां इंडियाचा रुपया चिनी लोक पूर्वी प्रमाणें कबूल करणार नाहींत ह्मणजे त्या देशाशी आपला जो मोठा व्यापार चालतो त्यावर या कायद्यानें ही गदा आली तसेंच हिंदुस्थानांतुन चिनांत जो माल जातो त्याबद्दल चिनी नाणीं रुप्याचीं घेतलीं तर तीं या देशांत कमी मोलाचीं ठरतील ह्मणून इंडियांतील लोकांनीं ज्यास्त चिनी नाणीं मागितलीं तर आपला माल खपणार नाहीं व निर्यात व्यापारही बंद पडेल.

सरकारी नोकर चाकर आहेत त्यांचा मात्र फायदा झाला. पूर्वी प्रमाणें पगारांच्या रुपयांची किंमत तितके रुपये भार चांदीच्या मानानें सवाई दिढीनें वाढली. बहुतेक भारी पगारदार आंग्लो इंडियन लोक आहेत तेव्हां या कायद्यानें त्यांचें कोट कल्याण झालें. पंधरा रुपये भरले कीं, त्यांस एक पौंड मिळण्याची व्यवस्था होत आहे. तेव्हां ते लोक आनंदानें माना डोलवितील यांत नवल काय!

परंतु सरकाराच्या नोकरास जो रोजमुरा मिळतो तो सरकार पाशीं जो पैसा जमा होतो त्यांतुन खर्च होत असतो. ही जमा ह्मणजे प्रजेला जीं सरकार देणीं द्यावीं लागतात तीं जमिनीचा सारा, अपकारी कर, इनकमट्याक्स, मिठावरील कर इत्यादि रूपानें द्यावीं लागतात. हें सरकार देणें पूर्वीप्रमाणें कायम आहे. दरसाल सरासरीनें आठ कोट रुपयांचीं नवीं नाणीं लागत असत तीं सोनें दिल्या शिवाय लोकांस मिळणार नाहींत. या नाण्यांतच प्रजेला सरकारचें देणें दिलें पाहिजे. तेव्हां सोनें देऊन रुपये मिळण्यासाठीं पूर्वी पेक्षां जवळचा अधिक माल विकला पाहिजे. रुपयाला माल हा कायदा होण्या पूर्वी द्यावा लागे त्या पेक्षां रुपयाची किंमत वाढल्या कारणानें अधिक माल द्यावा लागेल, ह्मणजे प्रजेवर अप्रत्यक्ष रितीनें हा नवीन कर लादण्या सारखें होत आहे. नवीन कर बसविला नाहीं ह्मणून ह्मटलें आहे परंतु वास्तविक हा दुसरा कर बसविला इतकेंच नव्हे तर हा कर सर्व शेतकरी लोकांवर मुख्यत्वेंकरून पडणार आहे. या कायद्याच्या योगानें देशांतील धनोत्पादक लोकावरच या कराचा बोजा पडणार आहे ह्मणजे या देशाच्या साम्पत्तिक स्थितीवर हा मोठा आघातच होत आहे. आधींच अठरा विसेंवे दारिद्र्य या देशांत नांदत आहे आणि या अशा गुप्त, घातुक व अनर्थकारक कराच्या माऱ्यानें प्रजेची काय दशा उडेल याचें अनुमान करवत नाहीं. सध्यांपुरता हा कायदा आहे खरा पण त्याचे तात्कालिक परिणाम फार अनर्थावह आहेत. व्हाईसराय साहेबांनीं ह्मटलें कीं कांहीं तरी केलेंच पाहिजे ह्मणून कांहीं यथामति केलें. परंतु हें 'कांहीं तरी' नसून हा देश भिकार करण्याचा राजमार्ग आहे.

—:०:—

रा. रा. बापुजी रंगनाथ उटगीकर पेनशनदार एक्स्ट्रा असि० कमिशनर हे पंढरपूर मुनसिपालिटीचे व्हाइस प्रेसिडेन्ट आहेत. त्यांच्या कडुन आमच्याकडे एक पत्र पंढरपुरास शेतकीचें प्रदर्शन भरविण्या संबंधानें आलें आहे आणि त्यावर आपल्या प्रांतांतील लोकांचे विचार त्यांस कळविण्याचे आहेत. कार्तिकी यात्रेसाठीं भगवद्भक्तांची मोठी गर्दी उडते त्यावेळीं लोकांच्या ऐहिक उपयोगासाठीं एक प्रदर्शन भरवावें असा मूळ विचार आहे. पुरवणींत आह्मी त्या प्रश्नाची सर्व माहिती दिली आहे. राजश्री बापूसाहेब वऱ्हाडांत सर्वजणास ठाऊक आहेत. इकडून पेनशन घेऊन गेल्या नंतर सार्वजनिक कामांत बराच पुढारपणा त्यांनीं पंढरपुरास आपल्या माथीं घेतला आहे हें सांगण्यांस आह्मास आनंद वाटतो मनुष्य अनुभवी व वयस्क झाला ह्मणजे त्याच्या चांगुलपणाचा व सद्गुणांचा लोकांस मोठा लाभ होत असतो. आणि अलिकडच्या संप्रदाया प्रमाणें ह्मणजे वऱ्हाडांत नांवालौकिकाला व थोरपणाला चढावें व शेवटीं वऱ्हाडला विसरावें तें इतकें कीं इकडचें नांवगांव सोडून बाह्य प्रदेशीं जाऊन राहावें असा बहुतेक उपरी पांढरपेशा लोकांचा ठराव असतो. रावबहादूर नारायणभाई दांडेकर पुण्यास आपल्या चातुर्याचा व उद्योगी स्वभावाचा अनुपम फायदा बहुतेक सार्वजनिक लोकसंस्थाच्या द्वारें लोकांस देत असतात आणि तशाच विचारानें रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार हे पेनशन घेतल्या नंतर पुण्यास राहणार आहेत. त्यांनीं तिकडे वाडा वगैरे बांधविला आहे आणि ते त्यांत आनंदानें चिरकाल विश्रांति घेवोत असें आह्मी मना पासून इच्छितों. पण आह्मास आवडत नाहीं तें एवढेंच कीं सरकारी अधिकारावर असतांना वर निर्दिष्ट केलेल्या लोकांच्या हातून सार्वजनिक व राजकीय प्रकरणांत चांगलीशी मदत फुरसत नसल्यामुळें व चाकर बनल्यामुळें होत नाहीं आणि ते पेनशनदार झाल्या नंतर अखेरचा रामराम ठोकतात. ज्या घरांत, आळींत, गांवांत व प्रांतांत आपला अभ्युदय होतो व मानपानाला आपण चढतो त्याच स्थळाचा अभिमान व आपलेपणा वाटण्या इतकी उन्नत स्थिती पांच पंचवीस वर्षांच्या साहचर्यानें या अधिकाऱ्यांस प्राप्त होत नाहीं हें पाहून आह्मास वाईट वाटतें. ज्या लोकांमध्यें ते वाढले जातात त्यांचा त्यांच्यावर हक्क आहे. कीं त्यांनीं आपल्या उतार वयांत लोकसेवा करून पेनशनचा मोबदला दिला पाहिजे. राव बहादूर जठारा सारखे आमच्यांतील श्रेष्ठ लोक आह्मास इकडेच स्थायिक व्हावयास पाहिजेत. ज्या स्थळीं अधिकारसंपन्न होतो तेथें अधिकारविरहित रहाणें कित्येकांस बरें वाटत नाहीं. पण ती मोठी चूक आहे. निदान तसला किरकोळ विचार ज्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांवर आह्मी जोरानें हक्क चालवू इच्छितो त्यांना बाधा करील असें वाटत नाहीं. व्यक्तिविशेषा संबंधानें आह्मी ह्मणत नाहीं पण आमचे हे विचार सर्वसाधारण आहेत आणि जो पर्यंत हे लोक इकडे सुखवस्तु होत नाहींत तो पर्यंत आह्मी असें मानतो कीं त्यांनीं इकडील लोकांचें योग्य ऋण फेडलें नाहीं.

The Berar Samachar

MONDAY JULY, 10, 1893

One of our Congresswallas in Berar sends us a letter he has received from his friend in a distant Native state. The letter puts forth a few suggestions to the delegates of the ensuing Congress and we give it below in full as it stands. The mode of agitation it points out is certainly worth consideration and is highly valuable from a practical point of view.

"India expects us all to do our duty. This is no doubt a good answer to all my questions but it affords no solution which we are all in need of and which appears to me to consist in growing and strengthening the sense of duty which has gone so low.

Delegates go to and return from the Congress every year. There are, no doubt, a few noble workers among them; but the great work is too arduous to be done by a few. Delegates, one and all, must understand the duty they undertake by accepting the high honor. They seem to sit silent throughout the year. It is not enough if they are able to send their quota to the Congress secretary. They must work throughout the year whenever leisure permits them. I admit, we have no leisured class which can devote its whole time and energy to poilitics. But the absence of such a class makes it the more incumbent on the delegates that they should contrive to find out time and work throughout the year in those parts of the country of which they are the delegates. The masses are yet to be moved; and the constitution of the Congress is yet far from being perfect. Those who get themselves styled as delegates are chosen by a few friends assembled in a meeting. Efforts must now be made to remedy these drawbacks. I am however glad to learn that you have done your part with credit. I shall now further ask you to endeavour to go to the next Congress, not as a delegate chosen by a few friends but by a large public. Reports, from other parts, of the Congress work are not so satisfactory as the report you give me of your part. It is therefore that I venture to ask you to go still further in the direction. Your Berar has six districts contianing 22 talukas. Each Taluka has a lac of souls *i. e.* some thirty thousand families. Out of these, 25000 families may be supposed either to be too ignorant or too poor or too indifferent to take any

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें सोनाजी वल्लद शिवराम ढगे राहणार चिंचोली तालुके खामगांव हे असें जाहीर करितात कीं मजला सन १८९२ सप्टेंबर तारीख १६ रोजीं तीर्थरुप गंगाई मर्द शिवराम ढगे याणीं आमच्या धर्मीप्रमाणें व शास्त्राप्रमाणें दत्तक घेतलें आहे. व स्थावर जंगम इस्टेटीचा मजला मालक करून ठेविलें. परंतु अलिकडे तीर्थरुप मातोश्री गंगाई यास चार दुसरे लोकांनीं मजबद्दल गैरवाका समजूत देऊन स्थावर व जंगम इस्टेट मजकडे कांहीं राहूं नये अशा बद्दल गैर कायदा व्यवस्था चालविली आहे. तर सर्वत्रांस असें जाहीर करितो कीं माझ्या संमती शिवाय स्थावर व जंगम इस्टेट कोणीं कर्ज देऊन घेईल अगर गाहाण ठेवील अगर खरेदी करून घेईल अगर बक्षिस वैगेरे करून घेईल तर त्या बद्दल कोणचेही प्रकारें मी व स्थावर जंगम इस्टेट जवाबदार नाहीं. ती इस्टेट खालीं लिहिले प्रमाणें:—

स्थावर इस्टेट

सवर्ण शिवेचे शेत, सारा रुपये १९ चें.

बढाचा मळा सारा रुपये ६॥ चा.

तीवसाडी नंबर दोन एकाचा सारा रुपये १८ व दुसऱ्याचा रुपये १८.

ठिका शेत सारा रुपये ४॥- यांतील चवथा हिस्सा.

घर धाब्याचें नऊ खांबाचें.

कोठा दोन धारणी १२ खांबी

जंगम इस्टेट.

बैल जोडी एक किंमत रुपये १९०

गाड्या दोन किंमत रुपये ७०

ह्मैस रुपये ६० ची.

दागिने सोन्याचांदीचे किंमत रुपये २००

भांडी वैगेरे किंमत रुपये ५० चीं.

शेतकीची हत्यारें रुपये १० ची.

येणें प्रमाणें सदरील इस्टेट कोणी सदरी लिहिलें प्रमाणें घेईल वैगेरे तर त्याजबद्दल चा जवाबदार मी व इस्टेट नाहीं. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख ६ माहे जुलई सन १८९३ इसवी.

सही

सहीची निशानी ( वखर ) सोनाजी वल्लद शिवराम ढगे राहणार चिंचोली याचे हातची असे.

## जाहिरात

वेशमी सर्वत्रास कळविण्यांत येतें कीं तालुके जिल्हानिहाय यांस:—

जाहीर होण्यास देण्यांत येतें खालीं सही करणार इजकडून. माझा नवरा कस्तुरचंद आसाराम हा मैत झाला याचे नांवची दुकान मौजे नांदुर खुर्द प्रगणें कांजुड ता० मलकापूर जिल्हा बुलडाना येथें आहे. त्या दुकानावर कोणी नसल्यामुळें देणें घेणें चालविण्यास मी वारीस बायको असून माझा दीर नामे चुनीलाल खेतसीदास यांस गुमास्ता ठेविला. त्यांनीं दोन तीन महिन्यांत माझें पैशाची अव्यवस्था केली व लोकांजवळून पूर्ण त्याणी आपले नांवानें केले हें माझ्या नजरेस आल्यावरून मी त्याजला रजा दिली व तो आपले घरीं आहे आणि माझे पैसे असामी करून घेणें आहे तर आतां असाम्याचे येथें जाऊन तो आपले नांवें पावती देऊन असाम्या जवळून पैसा वसूल करितो. करितां तसें न होण्याबद्दल सर्वांस जाहिरात अवगत व्हावी कीं ज्यास कस्तूरचंद आसारामचा पैसा देणें आहे त्यांणी चुनीलाल खेतदास यांस देऊन पावती घेऊं नये. जर करितां लोकांस कस्तुरचंद आसाराम याचे देणें आहे त्यांणी याचे बायकोजवळ पैसा देऊन तिची पावती घ्यावी. जर इतक्यावर कोणीही पैसा चुनीलाल खेतसीदास यांस देऊन पावती घेईल तर ते मी न ऐकतां रिती प्रमाणें माझा पैसा मी घेईन कळावें ता० ६ माहे जुलई सन १८९३ इ०

सही.

कस्तुरचंद असाराम दुकान मौजे नांदुरा ता० मलकापूर जिल्हा बुलडाणा या दुकानचे वहिवाटदार भिकमचंद रतीराम मारवाडी दस्तूर खुद्द.

### नोटीस

रा. रा. सुर्यभान वल्लद गोविंदा माहाली पाटील राहणार रानेद तालुके व जिल्हे अकोलें यास नोटीस देणार येडाजी वल्लद परसा पाटील राहणार रानेद तालुके व जिल्हे अकोलें याजकडून नोटीशीनें कळविले जाते कीं, तुमचे पासून मी कर्ज रुपये पन्नास ५० दर रुपयास दोन पैसे व्याजानें काढिलें होतें. व त्याजबद्दल रिती प्रमाणें दस्तऐवज करून दिला. आज सुमारें एक महिना झाला. तुमचे सदरहु रुपये ५० व ह्याचे व्याज रुपये १० दहा असें मिळून रुपये ६० साठ रुपये तुह्मास आह्मी द्यावें. आणि लिहून दिलेला दस्तऐवज तुह्मी आह्मास फाडून देऊन निकाल करावा असें ठरलें. त्यावरून आज महिनाभर सुमारें झाला तुह्मास आह्मी रोख रुपये ३० तीस जयराम वल्लद सिवराम पाटील राहणार रानेद याजपासून कर्ज काढून तुह्मास रुपये ३० तीस दिले. व हे रुपये तीसें सदर्हू देणें मध्यें दिले. ते मी रुपये जयराम वल्लद सिवराम याजपासून मी घेऊन दिले असें नाहींतर सदर्हू जयराम व नथु वल्लद कृष्णाजी पाटील व सूर्यभान कळंबिकर व मी असें मिळून बजावून दिलें तें असें कीं तुमचे देणें ऐन रुपये ५० व व्याजाचे १० दहा असें मिळून साठ तर या साठ रुपये पैकीं रोख रुपये ३० तीस दिले व याज प्रमाणें राहिलेले रुपये ३० तीस बदल आह्मी आमचे खातेचे बावर तुह्मास रुपये ३० मध्ये नांवें करून दिलें. व ते देते वेळीं ही बजाविलें कीं तुमचे रुपये देणें ६० व्याजा सुद्धां त्यांत तीस ३० रुपये रोख दिले व राहिलेल्या तीस ३० रुपया करितां नांवें बावर करून दिलें व बावर करून दिलें त्यावेळीं ही तुह्मांस मी व बनसिंग वल्लद कडताजी ढोरे पाटील वागजाळीकर यानीं बजाविलें कीं तुमचे कांहीं आतां काडी सुद्धां देणें राहिले नाहीं. निकाल झाला आतां दिलेला दस्तऐवज व पावती द्या त्यांस तुह्मी सांगितलें कीं ठीक आहे. पावती व दस्तऐवज वैगेरे सर्व भरपाई करून देतो ह्मणून सांगितले. आह्मापासून रुपये ६० बदल रोख रुपये ३० तीस व बावर रुपये ३० चे नांवे करून घेतले आणि दस्तऐवज व पावती याजबदल आज सुमारें महिनाभर जाहाला पावती व दस्तऐवज मागितआहो तर आज देतो उद्यादेतो असें आज पावेतो सांगत आला इतकेच नाहीं तर उलट अशी जरब सांगता कीं फीर्याद करीन वैगेरे या सर्वा बदल तुम्हांस असे कळविले जातेकीं. तुमचे कांहीं कवडीही मी देणें नांही. तुमचे जवळ जो कागद वगैरे आहे तो पोकळ आहे. जर कींरतां तुम्हीं त्याजवरून फीर्याद वैगेरे केल्यास त्याजबदल कोणच्याही प्रकारचा जवाबदार मी नाही. तुम्हीं माझे पासुन ६० रुपयेमध्यें बावर रोख रुपये घेऊन कागद व पावती दीली नाही म्हणुन मजला ही नोटीस देणे भाग पडले. तर नोटीस पावेल पासुन च्यार दिवसाचे आत कागद कर्ज रोखा व पावती आह्मांस द्यावी असे जाहाले नाही तर रीती प्रमाणें तुह्मावर सरकारात फीर्याद करून ह्या नोटीसीचे खरचा सह जें नुकसान नीकाल होई पर्यंत होईल तें सर्व भरून घेतले जाईल ह्मणुन दिल्हा नोटीस सही ता० ६ माहे जुलाई सन १८९३ इ.

सही

येडाजी वल्लद परसाजी पाटील याच्या हातचीं सहीची निशाणी वखर असे.

### नोटीस

सौ. लक्ष्मी मर्द मुक्ताजी सईतवाळ हल्लीं राह० पेठ देऊळगांवराजा ता. चिखली जि० बुलडाणें इजला- खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें द्वारें "शु. वऱ्हाडी अंक २४ ता. २९।६।९३ यांतील नोटिशीचें" उत्तर देण्यांत येतें कीं, तुला जाच, जुलूम मारहाण वैगेरे मागें कधींच केली नसून पुढें ही होणार नाहीं. मग तुझ्या बापा समक्ष चार संभावित गृहस्थांशीं, तुला त्रास वैगेरे न देण्याचें कबूल करण्याचें मला कारण पडलेंच नाहीं. गतीं स्त्रिया मुखत्यारीनें वागत नसतात. नवऱ्याच्या घरीं रहातात. त्या प्रमाणें तुलाही माझें घरीं रहाणें भाग आहेच. तुला व तुझ्यां भावाला धमकी देऊन धांदरविण्याचें मुळींच कारण नाहीं. व तूं ह्मणतेस कीं, "मी एका लुगड्या निशीं बाहेर पडले." हें तुझें ह्मणणें फारच खोटें असून माझी रक्कम माहेर घरीं निराविण्याकरितांच आहे. तारीख १२।६।९३ इ. च्या वऱ्हाड समाराचे २३ व्या अंकांत आह्मी दिलेल्या नोटिशीतील व जाहिरातींतील एक अक्षर सुद्धां खोटें व तुफान घेण्याकरितां नसून सर्व मजकूर अगदीं खरा आहे. त्वां तुझें बंधूच्या मदतीनें ३३८८१२ रुपयांचा माल चोरून नेला, व तूं माहेरीं आहेस. या करितां वरील रकमेची सर्व प्रकारें जोखीम तुझा त्रिवर्ग भावंडांवर आहे. तुला माझें घरीं अन्न वस्त्रास अगदीं वाण नाहीं. तूं पाहिल्यानें दिल्या नोटिशी प्रमाणें मुदतींत आली नाहींस. तरी आतां ही नोटीस पावतांच वरील रकमेच्या मालासह येऊन माझे घरीं नांदावें. असें न करशील किंवा दुसरा घरठाव करशील तर तुझ्यावर व तुझ्याशीं घरठाव करणारावर फौजदारींत काम चालविलें जाईल. व आमचे एकंदर जें नुकसान झालें तें व पुढें होईल तें नोटिसीचे वगैरे खर्चा सुद्धा भरून घेऊं, हें पक्कें समज. या पुढें तुजकडून व्यर्थ येणाऱ्या नोटिशी आह्मी न घेतां उत्तरेंहीं दिलीं जाणार नाहींत. कळावें. तारीख ६ माहे जुलै सन १८९३ इ.

सही

मुक्ताजी वल्लद भिमाजी सईतवाळ द० खु० राहणार अंजनी खुर्द ता. मेहेकर. जिल्हा बुलठाणें.

### नोटीस.

ती० मातोश्री. गंगाई मर्द शिवराम ढगे राहणार चिंचोली ता० खामगांव यास नोटीस देणार सोनाजी वल्लद शिवराम ढगे नोटीशीनें असें कळवितो कीं तुमचा मी मुलगा आहे व स्थावर जंगम इस्टेटीचा मालक आहे. परंतु कांहीं दुसरे लोकांचे गैरवाका सांगण्यानें स्थावर व जंगमइस्टेट तुह्मी विकाल, अगर गाहाण ठेवाल, अगर इस्टेटीवर कर्ज वगैरे काढाल तर तुह्मास व तुमच्यापासून घेणारास त्याजबद्दल जवाबदार धरून सर्व नुकसान भरून घेईन. तुम्हास फक्त तुमच्या नांवाप्रमाणें अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. याशिवाय कोणच्याही प्रकारानें तुमच्याबद्दल मी कांहीं एक करण्यास तयार नाही. तुमची मरर्जी मजपाशी राहण्याची असून अंतर्दानें दिवस घालवण्याचे असल्यास मी सर्व प्रकारानें तयार आहे, मात्र कोणाच्या सांगण्यानें अगर सल्यानें माझें नुकसान होण्याचा व्यवहार तुह्मी केला तर तो मात्र कबूल नाहीं, ह्मणून दिल्हे नोटीस सही. ता० ६ माहे जुलै सन १८९३ इ०

सही.

सहीची निशाणी वखर सोनाजी वल्लद शिवराम ढगे याच्या हातची असे.

### नोटीस

रा. रा. हुकुमचंद वल्लद गिरधारी लाल मारवाडी व सूर्यभान वा॥ रामजी काळे वस्ती मौजे पळसोप ता० व जिल्हे अकोला यांस-

नोटीस देणार जाणु वा॥ भिवसनजी पाटील राहणार माहादालपूर तालुके व जि० अकोलें याजकडून. नोटीशीनें उभयतांस असें कळविलें जातें कीं, ता० २८ माहे जून सन १८९३ इ० रोजीं तुह्मी उभयतांनीं नेहू वा॥ सोगाजी बढे वस्ती मौजे महादालपुर प्रगणें मोर्तीजापूर ता० व जि० अकोलें याजपासून कोठा दक्षिण उत्तर हात ४० पूर्वपश्चिम हात २१ तुह्मी उभयतांनीं रुपये२००दोनशे देऊन निहू वा॥ सोगाजी बढे याजपासून खरेदी करून घेतले व रितीप्रमाणें खरेदीखत करून घेऊन नोंदलें वगैरे त्यास सदरहू दक्षिण उत्तर हात ४० पूर्वपश्चिम हात २१ चा कोठा आमच्या मालकीचा आहे तो विकणेस अगर त्याची कोणचेही प्रकारची व्यवस्था करणेस आह्मा शिवाय दुसरे कोणासही अधिकार नाही करितां तुह्मी खरेदी घेतलेला सदरहू कोठा तुह्मास कोणचेही प्रकोर मिळणार नाही व त्याजबदल तुह्मी फिर्याद वगैरे काम चालविलें तर सर्व गोष्टीचे जवाबदार तुमचे तुह्मी आहा ह्मणून दिल्ही नोटीस सही ता० ७ माहे जुलई स०१८९३ इ०

सही.

सहीची निशाणी वखर जाणु वा॥ भीवसनजी पाटील राहणार माहादालपूर यांच्या हातची असे.

# शेतकी प्रदर्शन— पंढरपूर.

राव बहादूर भास्कर रामचंद्र हेबळीकर डिस्ट्रीक्ट डेपुटी कलेक्टर व प्रेसिडेन्ट मुनासिपालिटी शहर पंढरपूर यांनीं श्रीक्षेत्र मजकुरीं कार्तिकी यात्रेंत शेतकी संबंधानें प्रदर्शन भरविण्याविषयीं प्रश्न काढला आहे. या प्रदर्शनास चोहींकडून संमती मिळाली तर ते वरिष्ट सरकाराकडून मंजुरी मागवून प्रदर्शन भरविण्याची व्यवस्था करणार आहेत. आणि सर्व गोष्टी अनकूल झाल्या तर हा प्रदर्शनाचा योग येत्या कार्तिकांत आणण्याचा त्यांचा संकल्प आहे. 'हा विषय मोठा महत्वाचा आहे व तो हातीं घेण्यास सन १८७३ चा आक्ट ६ कलम २४ पोट कलम १६ व २१ यावरून आहे. यात्रेच्या संबंधांत लोकांस विशेष खर्च न होतां लौकिक फायदा करून दिल्यास तो फार दिवस टिकून लोकांपासून जो पैसा घेण्यांत येतो त्याबद्दल ऐहिक महत्वाचा फायदा त्यांस करून दिल्यानें त्यांचे अरोग्यतेकडे दुर्लक्ष न करतां मुनीसपालिटीनें आपलें कर्तव्यकर्म विशेष चांगल्या रितीनें बनावल्या सारखें होऊन देशाच्या निरंतरच्या फायद्याच्या गोष्टींत भर घातल्या सारखी होणार आहे.' सदहू प्रदर्शना संबंधानें सर्व लोकांच्या माहितीसाठीं रावबहादूर हेबळीकर यांनीं एक टिपण तयार केलें आहे तें आमच्या वाचकाकारितां आह्मी समग्र निराळें खालीं दाखल करितों. या टिपणा वरून प्रदर्शनाच्या उपयुक्ततेविषयीं व विस्ताराविषयीं चांगली अटकळ होईल आणि या सत्कृत्यास कोणी कशी मदत करावी व त्या बद्दल म्युनिसिपालिटी शहर पंढरपूर ही इतर बाह्यप्रांतस्थ लोकांकडून कितपत मदत मिळावी ह्मणून इच्छिते याचाही अंदाजा कारितां येईल प्रदर्शनाची संस्था नुसत्या स्थानिक उपयोगाची नसून ती सर्व राष्ट्राच्या फायद्या साठीं आहे तेव्हां अशा संस्थे कडे सर्व राष्ट्राचें लक्ष पोंचलें तर पुरस्कर्त्या कल्पक मंडळीस चांगलें उत्तेजन येऊन सर्व कार्यारंभ सुयंत्रपणें उभारला जाईल. वर निर्दिष्ट केलेलें टिपण येणें प्रमाणें:—

"हिंदुस्थान देशाचा उत्कर्ष सर्वतोपरी शेतकीच्या सुधारणेवर अवलंबून आहे हें सर्वांस विश्रुत आहेच. अलीकडे माल नेणें आणण्याच्या सोई आतोनात वाढल्यामुळें शेतकी कामाची ज्यांत भरभराट आहे अशा परदेशी व्यापाराशीं आपली स्पर्धा वाढत चालली आहे, त्या मानानें शेतकी व्यवसायांत आपण सुधारणा केली नाहीं तर हल्लीं जो कांहीं थोडा बहुत आपल्यास फायदा होत आहे त्यासही आपण मुकू. आणि असें होऊन ज्यावर आपलें निवित्व बहुतेक अंशीं अवलंबून आहे तेंही आपलें संरक्षण करण्यास असमर्थ होईल. व्यापाराचे योगानें संपत्ति विशेष जोरानें वाढते, ही गोष्ट खरी आहे. पण त्याचें मूळ शेतकी आहे. शिवाय जें हातीं आहे त्यापासून फायदा करून घ्यावा हें विशेष शहाणपणाचें काम आहे. व त्याबद्दल योग्य खटपट करून मग दुसऱ्याबद्दल होईल तितकें प्रयत्न करणें रास्त आहे. ज्या सुधारणा करावयाच्या त्याकारितां शेतकरी लोकांजवळ जरूर तितका पैसा नसल्यामुळें तो कसा मिळेल ही भ्रांती लोकांस होती ती आतां फिटत चालली आहे. गेल्या सालीं सरकारांनीं माझ्या शिफारसीवरून पंढरपूर, सांगोला व माळशिरस या तीन तालुक्यांत शेतकरी लोकांस देण्याकरितां रुपये १९००० ची तगाई मंजूर केली. ती देण्याचें काम अद्यापि चालूं आहे. व त्यामुळें या तिन्ही तालुक्यांतील पाण्याची कमताई कांहीं प्रमाणानें कमी झाली व होत चालली आहे, व ताली वगैरेचे योगानें जमिनींचा सुपीकपणाही वाढत चालला आहे. अलीकडे अशा रकमाबद्दल मागण्या कमी होत चालल्या आहेत ज्या लोकांनीं पूर्वीं अर्ज केले ते आतां कर्ज नाकारतात! ही दुःखाची गोष्ट आहे. या कामीं सुधारणेची दिशा एकदां लोकांस माहीत झाली तर ती होईल तेथपावेतों स्वीकारून चालण्यास लोक मागें घेत नाहींत एवढा अनुभव बऱ्याच अंशीं आलेला आहे. ज्या रकमा मागण्यांत आल्या त्या बहुतेक ताली व विहिरी करतांच आहेत व ज्यास या सुधारणा करण्याची सवड नाहीं त्यास रकमनको आहे.

"या वरून सुधारणेचे हे दोनच रस्ते लोकांस माहीत आहेत हें स्पष्ट होत आहे. याशिवाय निरनिराळे तऱ्हेचीं व इतर आउतें व इतर शेतकीं हत्यारें, निरनिराळे तऱ्हेचें धान्य, तें उत्पन्न करण्याच्या रीति, तें पेरण्याचे हंगाम, त्यांस घालण्याचीं खतें, थोडक्या वेळानें विशेष काम करून घेण्याची साधीं यंत्रें व अशा प्रकारच्या मोटा वगैरे यांची माहिती शेतकरी लोकांस झाल्यास त्यापासून मोठा फायदा होणार आहे अशी माझी समजूत आहे. आपले देशांत जे दुष्काळ पडतात त्यांचें कारण अवर्षण हें तर आहेच, पण कांहीं सालीं ज्या देशीं जें पीक लोक करतात त्यास ज्या वेळीं पाऊस पाहिजे तो न पडल्यामुळें बरेंच नुकसान झालेलें अनुभवास आलेलें आहे. तसें झाल्यानें दुसरे पाऊस पडले तरी त्यापासून आणखी एखादा पिकाचा फायदा घेण्यासारखा असल्यास तो लोकांस माहीत नसल्यानें तो पर्जन्य विपूल होऊन ही व्यर्थ झाल्याचीं उदाहरणें दृष्टींस पडतील. तसेंच हल्लीं जनसंख्या वाढली त्या मानानें पड जमिनी गुरांस गवताकारितां राखून ठेवण्यांत येत असलेल्या लागणींत आणण्याचे वाढत चालल्यामुळें गुरांची संख्या कमी होत चालली. यास दुसरीं कारणें असतील पण हेंही एक सबळ कारणापैकींच आहे. यामुळें शेतकी कामास जितकीं गुरें पाहिजेत किंवा पूर्वीं प्रत्येक बिघा तयार करण्यास जितकीं गुरें लावीत असत तितकीं न लागलीं गेल्यामुळें जमिनींचा कस कांहीं अंशीं कमी झाला असून ओलावा राखून घेण्याची तिची शक्ती कमी झाली किंवा होत चालली आहे, यामुळें पूर्वीं जितकें पीक येत होतें त्यापेक्षां हल्लीं कमी पीक येत आहे अशी सर्व साधारण समजूत झाली आहे. ह्याचा खरेपणा ताडण्यास जरी आपल्या जवळ माहितीचें साधन नाहीं तरी कारणावरून कार्याचें अनुमान काढतां येण्यासारखें आहे. थोड्या वेळानें जास्ती किंवा पूर्वींपेक्षां विशेष चांगलें काम निघण्यासारख्या शेतकी हत्यारांची हल्लीं आह्मांस विशेष जरूरी आहे यांत संदेह नाहीं. अशा प्रकारचीं हत्यारें निरनिराळे ठिकाणीं तयार झाल्याची सरकारी रीतीनें आह्मांस माहिती मिळते व वर्तमानपत्रांवरून ही कळते. पण त्याचा यथायोग्य उपयोग करून घेण्यास किंवा सर्व लोकांस करून देण्यास अवश्यक साधनें आपल्याजवळ नाहीं ही एक मोठी उणीव आहे. निरनिराळ्या प्रकारचें एकच जातीचें धान्य निरनिराळे प्रदेशांत पिकतें हें आह्मास माहीत आहे. गेल्या दुष्काळांत एकोणीस (१९) प्रकारचे नोंधळे आह्मी पाहिले आहेत. व कांहीं बद्दल जी आह्मी माहिती घेतली आहे त्यावरून ते निरनिराळे ऋतूंत पेरण्यांत येतात हें समजलें आहे. त्या सर्वांची माहिती सर्वांस नाहीं ती होणें अगदीं अवश्य आहे. तसेंच बागाईतास विपूल पाणी देऊन व सक्त मेहनत घेऊनही कमी मोलाचें पीक काढण्यांत येत आहे. ह्या सर्व व अशाच दुसऱ्या उणिवा बऱ्याच आहेत त्या दूर होण्यास शेतकरी लोकांच्या मोठ्या भागास याविषयीं माहिती देणें अवश्य आहे. ती देण्या कारितां त्या लोकांचा एक ठिकाणीं जमाव घडवून आणविणें कठीण आहे व आणवेल तितकी माहिती मिळवून एकत्र दाखविण्यास पैशाची उणिव पडते, ती दूर होणें ही बऱ्याच अंशीं कठीण आहे. आपल्या श्रीक्षेत्र पंढरपुरीं जो मेळा यात्रेसंबंधानें वारंवार जमतो तशा प्रसंगीं ह्या उणिवा दूर करण्याचे हेतु फार चांगल्या रितीनें सिद्धीस जाण्या सारखे आहेत. त्यांत कार्तिकीची यात्रा तर अशा कामाला फारच अनकूल आहे. मोठ्या शहरीं निराळें प्रदर्शन केल्यास शेतकरी लोकच विशेषतः जमण्याची आशा नसून मौजे कारितां थोर लोक जमतात त्यांत तशा प्रदर्शना पासून उपयोग करून घेणारे फार थोडे! किंबहुना नसतात ह्मटल्यास ही चालेल. या यात्रेस निरनिराळे दूर दूर प्रदेशांतले निवळ शेतकरी येतात व ते कांहीं कर हल्लीं मु० टीस वृत आहेत, त्यांतच किंचित् फेरफार केल्यास (पुलाचें काम झाल्यावर न केल्यास ही चालेल असें आमचें मत आहे.) खर्च भागून स्वार्थ परमार्थ त्यांस साधून दिल्यासारखें होणार आहे. व त्यांत देशाच्या भरभराटीस अशा प्रकारें कारणीभूत होणारी अनेक तत्वांची पेरणी कारितां येईल असें माझें मत आहे. वर शेतकऱ्यांचे उणीवांचे व त्या दूर करण्याच्या उपायांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून आपण विचार केला असतां आणखी पुष्कळ गोष्टी ध्यानांत येणाऱ्या आहेत. त्या सावकाशपणें आपोआप अंमलांत येतील. आमच्या कांहीं महत्वाच्या सूचनेस आजपर्यंत जसा कमेटीनें मान दिला आहे, तसेंच अशा अत्यंत उपयुक्त कामीं मनोभावें ती साह्य देईल अशी आमची उमेद आहे. या कामीं ज्या ढोबळ सुचना तूर्त करणें योग्य वाटतात त्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ प्रत्येक कार्तिकेच्या यात्रेंत शेतकी धान्यें वगैरे पदार्थ व शेतकी हरएक हत्यारांचें प्रदर्शन करावें.

२ इतर प्रदर्शना प्रमाणें यांत बक्षिसें असावीत.

३ जें धान्य वगैरे प्रदर्शनास येईल तें पाठविणाराकडून त्याबद्दल अव्वल पासोन अखेर पर्यंत माहिती आणवावी, व ती छापून तयार करावी.

४ सदरी प्रमाणें — शेतकी हत्याराबद्दल माहिती छापील असावी. व त्यांत हत्यारांच्या किंमती दाखल असाव्या.

५ प्रदर्शनाचा विशेष दर्शनीय खटाटोप न करितां साध्या रीतीनें, त्यांच्या हेतू सिद्धीकडे लक्ष ठेवावें.

६ हल्लीं या यात्रेतून परत जातांना कर घेऊन टिकिटें देण्यांत येतात तसें न कारितां या यात्रेपुरतें गांत येताना टिकिटें द्यावीत यात्रेकरितां टिकीट घेतलेल्या सर्व लोकांस प्रदर्शन पाहण्याची मोकळीक असावी. एकच टिकीट दोनदा उपयोगांत आणता न येईल याचे बंदोबस्तीकारितां, प्रदर्शनगृहांत शिरण्याचे वेळीं त्यावर छाप मारावा.

७ एकदा अनुभव घेऊन पाहून खर्च न भागल्यास तिकीटाची किंमत बेतानें किंचित वाढवावी. त्याबद्दल लोक कुरकुर करणार नाहींत असें मला वाटतें.

८ प्रदर्शन करणें तें कार्तीकी यात्रेंतच करावें कारण त्यावेळीं हवा चांगली असते, रोगाची भीती नसते, हें अनुभवानें सिद्ध झालें आहे.

९ याच वेळेस गुरांचें प्रदर्शन अन्य रीतीनें पैशाची व्यवस्था करून बेताबातानें केल्यास शेतकी संबंधानें, ज्या पदार्थांची अवश्यकता आहे तो सर्व माल एक ठिकाणीं मिळण्याची सोय होऊन यात्रा विशेष भरण्याचा संभव आहे. त्या मानानें मुख्य प्रदर्शनाची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत जाईल अशी माझी समजूत आहे.

१० शेतकरी लोक कित्येक वाचणारे नसतात कारितां, त्यांस प्रत्येक पदार्थांची समजूत करून देण्यास जरूर तितके सुशिक्षित लोक नेमावेत व त्यांनीं प्रत्येक शंभराच्या किंवा त्याहून अधीक अशा लोकांच्या टोळीस समजूत करून द्यावी. याबद्दल ज्याची उत्सुकता असेल तशा कारितां समजूत देण्याची वेळ नेमावी.

११ सदर हत्यारांपैकीं पसंत पडलेलें हत्यार कमेटीनें मूळ योजकाकडून विकत घ्यावें.

१२ तसलें हत्यार घेण्याची कोणी इच्छा दर्शविल्यास स्थानिक उद्योग शाळेंत तयार करून त्यास पोहोंचतें करून देण्यास पतकर घेण्यास सदर शाळेस सूचना करावी.

१३ या कामाकरितां वर्गणीनें म्युनिसिपालटीच्या खर्चानें बेतसीर एक इमारत बांधावी.

१४ सोलापूर डिस्ट्रीक्ट् बोर्डाच्या ग्रांटानें एक शेतकी शाळा सोलापुरास होती ती नुकतीच बंद झाली आहे, ती ग्रांट प्रदर्शना कारितां देण्यास त्या बोर्डास विनंती करावी.

१५ याबद्दल विचार करण्याकारितां दूरची एक तारीख नेमून त्या दिवशीं कमेटी भरवावी. या संबंधानें व दुसऱ्या लहानथोर गोष्टी विचार करण्यासारख्या बऱ्याच आहेत. त्यांचा उहापोह वेळीं ज्याच्या त्याच्या मतानुसार होईल पण हा विषय नुसतां स्थानिक महत्वाचा नसून बऱ्याच अंशीं देशाच्या नफा नुकसानीच्या गोष्टी यांत गोवल्या जातात याची व्यवस्था चांगल्या रीतीनें होत गेल्यास त्यापासून फारच महत्वाचे परिणाम घडतील असें माझ्या अल्पमतीस वाटतें. करितां हें काम हातीं घ्यावें न घ्यावें, व त्याची व्यवस्था कशी करावी याबद्दल चर्चा होण्याच्यावेळीं इतर प्रसिद्ध म्युनसीपालिट्यांचे प्रतिनिधीस पाचारण करावें ह्मणजे योग्य सल्ला आपल्यास मिळेल ही शेवटली सूचना आपल्यास पसंत वाटेल अशी माझी उमेद आहे. कारण यांत स्थानिक स्वराज्याचें जें तत्व आहे, तें अमलांत आणण्याचे कामीं सरकार हेतूस अनुसरून आपण एक पाऊल पुढें टाकल्या सारखें होईल."

interest in the national work. There then remain at least 5000 heads of families who can be successfully induced to take interest. Here lies the work of the delegates. Each Taluka should send its representatives to Provincial congress which should in its turn send representations to the National Congress. The chief thing is that members should be elected and not chosen. The work is not easy. It is very difficult when your come to details. Nor do I mean that this can be soon accomplished. What I wish that you should do is that efforts should be commenced in this discetion; and the first step is to make it obligatory on the delegates that each of them should hold not less than 15 meetings in the different parts of the district in which he resides, where the Congress-object should be explained to the people and their objections should be removed and signatures taken of those who may be in sympathy with the Congress. The reports of such meetings should be published in the local newspapers and copies of such reports should also be forwarded to the Berar Standing Congress Committee. This will I think be a fair beginning. The result will be something. This will have the way. A Marathi newspaper devoted solely to the Congress-cause is a great necessity. That if it be not possible to start such a paper for some time, at least the editors of existing local papers should be requested by the Standing Congress Committee to devote more space to Congress literature than they do now. They only talk of Congress matters during the last two months of the year and go to sleep over them for the remaininig ten months. The editors have the great powers of criticism; and they can bring, if they choose, erring delegates to this path. At the same time they can encourage good workers by due praise. The main point or the main defect is that our leaders i. e. the delegates know not how to carry on an agitation and how to educate the people politically or if they do the work half—heartedly.

Turning to the subject of Native States in which you like myself appear to be much interested, I quite agree with you when you say that the subject is a very difficult one. But difficult as it is, it must not be thrown away.

I think the Congress would do weil to pass the following resolutions:—

That this Congress respectfully advises the rulers of Native States to furnish themselves with Legislative Councils on the lines of the cld or the new councils Act, with such modifications as may appear necessary on account of the back ward condition of the people and other local peculiarities.

That the rulers should draw a line between personal and household expenditure on the one hand and the expenditure of the Government on the other and they should fix on the former head such a percentage of the revenue as may seem just and proper.

That they should spend not less than five per cent of the revenue on the education of the people, far behind as the subjects of the native states are, when compared with the subjects of the of the British Government, and too back ward asince they are to take care of their own education.

It is true the passing of this resolution will not bring about any perceptible results at once, but it will set the minds of the rulers and the subjects in motion.

The condition of Native States, generally speaking, is very deplorable. The subjects have no rights; and the rulers can have their own way; and every body knows how most of the rulers are. The British Government only interferes when the worst has been reached, and sometimes interferes to make the bad worse. The subjects have neither self-respect nor moral courage. They are too ignorant to make a common cause for their own well-being. Their good neighbours must help them or they are lost. I think you know the condition very well.

I am very anxious to know your industrial activity. How many mills you have. Whether efferts are being made to induce cultivators to take to the long stapled cotton. I hear the people there are rich and prosperous· Is this true?"

## वऱ्हाड.

मि. ए. इलियट डेपुटी कमिशनर, यवतमाळ यांस चालूं महिन्याच्या २१ वे तारिखे पासून दोन महिने व बारा दिवस इतक्या मुदतीची हक्काची रजा मिळाली आहे.

आणि त्या रजेंत कुमार श्री हरबानजी असि. कमिशनर वर्ग १ यांस आफिशिएटींग डेपुटी कमिशनर नेमिलें आहे.

क्याप्टन वारन हेस्तिंग्स डेपुटी कमिशनर इलिचपूर यांस येत्या शनिवार पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

आणि त्यांच्या रजेंत खान बहादूर सय्यद शमसुद्दीन अली स्पेशल असिस्टंट कमिशनर यांस आफिशिएटींग डेपुटी कमिशनर नेमण्यांत आलें आहे.

मि. सी. एफ. एरस्कीन सर्व्हे आफिसर यांस गेल्या पांचेव तारखे पासून तीन महिन्याची हक्काची रजा देण्यास आली.

आकोल्याचे रजेवर असलेले तहशीलदार मि. मिर अनवरअली यांची नेमणूक तहशीलदारीवर कायम होऊन गेल्या आठवड्यांत कामावर दाखल झाले.

मि. माणिकशा रतनजी दस्तूर एक्स्ट्रा असि. कमिशनर खामगांव हे चालू महिन्या अखेर पावेतों हक्काच्या रजेवर आहेत ह्मणून तेथील स्मालकाज कोर्टाचें काम चालविण्यासाठीं येथील स्मालकाज कोडताचे जज्ज रा. रा. गणेश बापूजी उटगीकर यांस आळीपाळीनें एक आठवडा आकोल्यास व दुसरा खामगावास या प्रमाणें काम पाहण्यास सांगितलें आहे.

रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर असि. मास्टर हायस्कूल उमरावती यांनी एक वर्षाची फर्लो रजा घेतल्या वरून रा. रा' रघुनाथ वामन देवभानकर बी. ए. यांस उमरावतीसच १०० रुपयावर नेमून त्यांच्या ७५ रुपये पगारावर रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. यांस येथून उमरावतीस बदललें; आणि शेवटील जागेवर रा. रा. महादेव काशिनाथ आक यांस नेमलें.

दारव्हे तालुक्यांतील मौज टाकळी येथें एक बाई खुनाच्या तडाक्यांत सांपडून गरणोन्मुख झाली आहे. अपराध्यांचा तपास अद्याप लागला नाहीं.

पातूरच्या श्रीकुमार शेखरसिंह लायब्ररीचे प्रेसिडेन्ट बाबू शिवरतनसिंह कळवितात कीं हिंदुस्थानी शाळांचे डेपुटी इनस्पेक्टर मि. महमद आजिमुद्दीन बी. ए. यांस मागील आठवड्यांत पानसुपारी करण्यांत आली त्या वेळीं या पाहुण्या गृहस्थांनीं गांवांतील लोकास बोध करून व्यर्थ दूहो मानवून दोन लायबऱ्या ठेऊं नये असें सांगितलें आणि त्या वरून दोन लायबऱ्या मिळून एक जंगी सार्वजनिक लायब्ररी होईल असा सुयोग दिसतो.

रा. रा. दवलत झाबाजी यांची येथील आक्टींग नायब तहशिलदारी संपल्यावर त्यांनीं तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली. त्याच्या स्टांप स्टोअर कीपरच्या जागेवर रा. रा. दत्तात्रय बापूजी उटगीकर यांस नेमिलें.

कोल्हापूरच्या गायन समाजांतील तंतू वाद्यांचे शिक्षक रा. रा. नारायण विष्णू भावे हे आकोल्यास आले आसून त्यांच्या येथें पुष्कळ मैफली झाल्या. सतार, हारमोनियम व बिन हीं वाद्यें सर्वोत्कृष्ट प्रकारें वाजवून त्यांतील मंजूळ व मनोहर बोलांनीं ते श्रोतृसमाजास तल्लीन करून सोडतात गायनकलाही शास्त्रोक्तरित्या यांस चांगली अवगत आहे. यांचे तीर्थरूप रा. रा. विष्णु अमृत भावे हे सांगलीस असतात. हे मोठे कल्पक असून मराठी भाषे मधील नाटक कलेचे आदिगुरु आहेत. प्रत्येक जुन्या नाटकांतून 'विष्णुदास कवी' या नावानें ते सर्वांस विश्रुत आहेत. वडिला प्रमाणें चिरंजीवही गायनवादन कलेंत चांगले प्रवीण आहेत तेव्हां या गुणी गृहस्थास येथें चांगला आश्रय मिळाला तसा अन्यत्रही मिळेल हें निराळें सांगावयास नको कांकीं 'न हि कस्तुरिकामोदः शपथेन विभाव्यते'.

रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे तहशीलदार मुर्तीजापूर, रा. रा. रामचंद्र नारायेणे देशपांडे बी. ए. कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट, व हैदराबादचे एक युरेशिअन गृहस्थ अशा तीन जणास वऱ्हाडांत एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमल्या विषयीं आनंदकारक बातमी कळते.

आणि कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं रा. रा. विठ्ठल नारायण काळीकर तहशिलदार - मेहकर यांस नेमणार असल्या विषयीं घाटत आहे.

√ परतवाड्याहून एक गृहस्थ लिहितात कीं, पलटणीच्या मुख्य साहेब बहादुरांनीं आपल्या हाताखालील शिपायांचें नवें आरंभलेलें देऊळ जमीनदोस्त करविलें आणि मूर्ती मात्र कायम ठेवण्याची मेहेरबानी केली. हिंदु शिपायांनीं देऊळाचे बांधकाम पाडण्यास इनकार केला आणि त्याचें कारण ही सांगितलें नाहीं ह्मणून तीन इसमांस त्या मुख्यानें तुरुंगांत पाठविलें आणि मेजर सुभेदाराची एक ग्रेड कमी केली. देऊळवाल्या शिपायांनीं 'शरण कुणा जावें'!

---

नादारी मोकदमा नंबर १४ सन १८९२

नमुना ( जी )

विद्यामान नादारी कोर्टाचे ज्यडूज्य जिल्हे अकोलें

सर्वत्र लोकांस नोटीश देण्यांत येते कीं, मौलवी महंमद मुनत जबुद्दीन साहेब वल्लद मौलवी महंमद मासूम साहेब खानबहादूर जहागीरदार रहाणार बाळापूर हा नादारी आहे असा आज तारिख ३० माहे मार्च सन १८९२ इ॥ रोजी ठराव झाला आहे आणि तारिख १२ माहे आगष्ट सन १८९३ हा दिवस नादाराचे सावकारानीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदाविणें असतील त्याणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचे प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिष्टरांत दाखल होतील; कळावें ता० ७—७—९३.

Ganesh Bapuji.

नादारी कोर्टाचे ज्यडूज्य जिल्हे अकोलें.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या वषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ११ प्रमाणें.

दि. कि. क्ला. १५ मी. नंबर ३

१८९३

स्पे. असि. कामिशनर साहेब बहादूर जि. अकोला यांचे कोर्टांत.

नांव दत्तुलाल

बापाचें नांव सुंदरलाल अगरवाले.

राहणार— शिनखेड तालुके अकोला

जिल्हे— अकोला यांस मयत.

बद्रीनाथ बापाचें नांव नथमल रहाणार शिनखेड तालुके अकोला जिल्हा अकोल याचें कर्ज वसूल कारितां येण्यासाठीं सटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज कारेतां सदर्हु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. १५ माहे जुलई सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. १ माहे जुलई सन १८९३ इ.

V. N. Dandeker

शिक्का. सिव्हिल जडज्य.

---

## वर्तमानसार.

खांडवा येथें एक मनुष्य आला आहे, त्याच्या पाठीच्या डाव्या कण्यावर सरासरी आठ ईंच लांबीचें एक लोंबतें शिंग असून तें कठोर व हरिणाच्या शिंगाकृतीचें आहे. एक वेळ हें कापलें होतें, पण पुनः तें उगवलें असून वाढत्याप्रमाणावर आहे.

कोर्टमार्फत जे पैसे वसूल होऊन जमा होतात ते त्या पक्षकारानें साहा ६ महि न्याचे आंत घेऊन जावे नाहीं तर ते रुपये सरकारजमा होणार असा नवीन ठराव झाला आहे.

प्रसिद्ध श्रीमान स्वामी यांचा ठिकाण पुष्कळ दिवस नव्हता. ते समाविस्त झाले असेंही वर्तमान बाहेर पडलें होतें. पण हे स्वामी जिवंत असून त्यांचें गोरक्षणाचें काम उत्तम रितीनें चाललें आहे असें कळतें. डाक्यास यांनीं गोरक्षणावर व्याख्यान दिलें व त्यांत अकबर बादशहाची गोरक्षणाची गोष्ट सांगितल्याबरोबर तेथें जमलेल्या पुष्कळ मुसलमान लोकांनीं गोरक्षण करण्याच्या प्रतिज्ञा घेतल्या.

सरकारानें एकाएकी चलनी नाण्याचा कायदा पास करून टांकशाळा बंद केल्यामुळें सोन्याची किंमत उतरून चांदीची तर चांदीच उडण्याची वेळ आली आहे. तिची किंमत इतकी उतरली आहे कीं, १०० रुपये भार चांदीला ८० रुपयेही देण्याला व्यापारी धजावत नाहीं. चांदीच्या कित्येक खाणीही त्यांच्या मालकांनीं बंद केल्या! क.त

टक्कर होऊन फुटलेल्या इंग्लडांत विक्टोरिया लढाऊ गलबतांतील फक्त २९९ माणसें बचावलीं आणि ४२२ ठार झालीं. फ्रान्स, जर्मनी, इटाली, अमेरिका, वगैरे राष्ट्रांनी इंग्लंडच्या या नुकसानीबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे.

या अपघातांत बुडून मेलेल्या लोकांचा मुलामाणसाकरतां वर्गणीनें पैसा जमविण्याचें काम चालू झालें आहे.

फ्रान्सानें सायामची दुसरी दोन बेटें बळकावलीं.

बुडेलल्या बुखारी आगबोटींतील माला पैकीं सोन्याच्या ४०,००० विटा अजून सांपडणें राहिल्या आहेत.

मक्का येथें ता. २९ रोजीं पटकीनें ४९० माणसें मेलीं. व अद्याप पटकीचा उपद्रव बळावत चालला आहे.

आस्त्रेलियांतील आणखी एका व्यांकेचें दिवाळें निघालें.

हिंदुस्थानानें चांदीचें नाणें कमी करण्याचें ठरविल्यावरून अमेरिकेंतल्या व्यापारास बराच धक्का बसला आहे असें सांगतात.

विचारल्या प्रश्नास जबाब देताना कामन्स सभेंत पराज्यासंबंधी अंडर सेक्रेटरी सर ग्रे यांणीं सायाम प्रकणरसंबंधानें इंग्रज सरकार काय करणार हें सांगावयाचें नाकारलें. तिकडे जे इंग्रजलोक आहेत त्यांचें व त्यांच्या हिताचें रक्षण करण्याकरतां इंग्रजसरकारचें एक लढाऊ गलबत सायामांत बांकाक येथें दाखलही झालेलें असून दुसरें एक रवाना झालें आहे आणि तिसऱ्या एकास तिकडे जाण्यास तयार व्हावें असा हुकूम झाला आहे इतकें मात्र त्यांणी सांगितलें. यावरून फ्रान्स व सायाम हे हातघाईवर येण्याच्या बेतांत आहेत असें दिसलें.

शहरांत लहान सहान मारामाऱ्या चालूच आहेत, पण ह्मणण्यासारखें कांहींच नुकसान नाहीं.

पुष्कळ हिंदुलोक म्युनीसिपालिटीच्या स्लाटर हौसांत शिरले व कापण्याकरतां आणलेलीं पुष्कळ जनावरें हाकून नेलीं त्यामुळें आज रंगून येथें मांस मिळेनासें झालें आहे.

दंग्यांत हिंदुचा कांहीं संबंध नसून ते अगदी एकीकडे राहात असतां मुसलमान त्यांच्यावर हल्ले करित. लोडे वें विटा यांचा पोलिसावरही वर्षाव झाला. असें होतां होतां दंगेखोरांचा जमाव हजारों लोकांचा झाला व त्यांस पक्कें शासन केल्यावाचून निर्वाह नाहीं असें झाल्यावरून व जमेलल्या सर्व कामदारांचे सर्व उपाय निरुपयोगी झाल्यावरून आणि डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटासही घापाळ करून बेगळाल्या घरांतून पोलिसावर बंदुकीच्या गोळ्या येऊं लागल्यावरून दंगेखोरांवर गोळ्या घातल्यावाचून आवाज करण्याचा हुकूम झाला, तरीही दंगेखोर शांत होत नाहीं असें झाल्यावरून दंगेखोरावर गोळ्या चालण्याचा हुकूम झाला. तशा गोळ्या सुरू होऊन कित्येक ठार झाल्यावर दंगा मोडला. फिरून आजही मशिदींतून गोळ्या घालूं लागले व ऐकत नाहींसे झाल्यावरून पुन्हा गोळ्या सुरू करण्याचा हुकूम होऊन सुमार २० लोक ठार झाल्यावर दंगा मोडला व लष्करी २०० लोक आणून दंगेखोरांनीं अडविलेले रस्ते खुले केले.

व्हालंटीयर लोकांसही कामावर बलावलें आहे.

हिंदु व मुसलमान यांचें पक्कें वैमनस्य झाल्यामुळें पुन्हा दंगा होण्याची भीती आहेच.

त्या दोन्ही पक्षांत जागो जाग मारामाऱ्या होऊन कित्येक लोक ठारही झाले.

सर्व व्यापार धंदा अगदी बंद आहे.

हिंदुस्थानच्या संरक्षणाकरितां १९,००० गोरे शिपाई जास्त ठेवले पाहिजेत असें ज. राबर्ट यांचें ह्मणणें आहे असें सांगतात.

हिंदुस्थानच्या एका लश्करी कामदारास कांहीं फौजेसह तावडतोब आफ्रीकेंतल्या कामावर जाण्याचा हुकूम झाला आहे. ठा. अ.

मुंबईच्या अडव्होकेट नामक पत्रांत पुढें दिलेली चमत्कारिक व मजेदार हकीकत छापलेली आहे.— एका गृहस्थापाशीं एक गाढव आहे तो मनुष्याप्रमाणें संगतवार व अर्थयुक्त भाषण करीत नाहीं तरी इंग्रजी आणि फ्रेंच भाषेमध्यें कांहीं तुटक तुटक वाक्यें उच्चारितो. या गाढवा संबधानें आणखीही गंमत सांगण्यांत येते कीं, तो विलायतचे मुख्य प्रधान नामदार ग्लाडस्टन साहेबांची नेहमीं स्तुति करीत असतो, व नामदार साहेब दीर्घायु होवोत असे शब्द उच्चारीत असतो. पुराण मुखोद्गत ह्मणणारे पोपट पुष्कळांच्या पाहण्यांत अगर ऐकण्यांत तरी असतील, परंतु असा बोलका गाढव या दुनियेंत असेल असें त्यांच्या ध्यानीं मनींही नसेल विवात्याची करणी अगाध आहे असें ह्मणतात तें यासाच. बा. व.

तमाखूचा धूर— आशिया खंडांत जो महामारीचा आजार होतो त्याच्या जंतूवर तमाखूचा धूर हें चांगलें औषध आहे. ह्या धुरानें सर्व प्रकारचे जंतू मरतात ह्मणून जेव्हां महामारीचा अगर संन्निपात तापाचा रोग उद्भवतो तेव्हां तमाखू ओढणे अत्यंत हितकर आहे असें इटालीयन डाक्टर तासिनारी यांणीं पुष्कळ दिवस अनुभव पाहून ठरविलें आहे.

अद्भुत जहाज— इटाली देशांतील एका इंजनेरानें एक नवें जहाज तयार केलें आहे. तें चालविणारीं यंत्रें आंतल्या बाजूस ठेवण्याची जागा केली आहे तें जहाज त्या त्या यंत्राच्या जोरानें सहज पुढें लोटतां, चालवितां, बुडवितां, आणि वर काढतां येतें थोड्या दिवसां पूर्वी पुष्कळ इंजनेरांच्या समक्ष तें जहाज समुद्रांत ढकलून त्याच्या कडून वर लिहील्या प्रमाणें सर्व कृती करून पाहिल्या त्यावरून तो अनुभव फारच नामी झाला असें इंजनेरांनीं सांगितलें. समुद्रांत गडप झालेली संपत्ती काढण्यास व लढाईंत ह्या जहाजाचा अतिशय उपयोग होईल असें इंजनेरांनीं आपलें मत दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे. शु० सु०

आरोग्यरक्षणाचा कायदा— कौन्सलांत पास करून त्याच्या पोषणाकरतां एक नवीन कर हिंदुस्थानांतील लोकांच्या डोक्यावर लादण्याचा विचार कायम होऊं पाहात आहे, नवीन मंडळी कायदेकौंसिलांत येण्यास आणि सरकारानें नवीन कराची धुळवड खेळण्याचा प्रसंग आणण्यास एक गाठ पडल्यामुळें काय शेवट होतो याजकडे सर्वांचें लक्ष लागणें अवश्य आहे.

नवीन नेमून दिलेल्या मंडळींनीं ही आणिबाणीची वेळ समजून खरे हेतू दाखविण्यास भिऊनये, लाजूनये, अगर इतराजीला वचकूनये. म. मि.

पारीस शहरांत असा एक कळसूत्री पलंग तयार झाला आहे कीं त्याची कळा दाबली कीं अर्धे मिनिटांत वरील मच्छरदानी नीट नेटकी पडते. झोंपलेला मनुष्य उठला कीं तोंड धुण्यास व केश साफ करण्यास साबण टुवाल वगैरे सर्व पदार्थ पुढें येतात. झोंपलेला मनुष्य काय करितो हें बाहेरून मळींच दिसत नाहीं. आणखीही त्यांत कित्येक सोयीं केल्या आहेत.

शिश्न छेदन— तासगांव तालुक्यांतील पळसगांवच्या एका मराठ्याच्या स्त्री बरोबर रतिविलासास सोकावलेल्या एका गोंधळ्याचें जननेंद्रिय तिच्या नवऱ्यानें २१३ इसमाचें साह्य घेऊन छेदून टाकल्याचें समजतें.

चिकागो येथील प्रदर्शनांत पत्रानें लेखकाचें काम करणाऱ्या १२ अंधळ्या मुली आहेत!

समुद्रोदरांतील संपत्ति— हिंदुस्थानांतून इंग्लंडास व इंग्लंडाहून हिंदुस्थानांत येण्या जाण्याचा जो जलमार्ग आहे त्या वरून जात येत असतां पुष्कळ जहाजें बुडून त्यांतील संपत्ति समुद्राच्या पोटांत गडप झाली. आहे. सोनें व जड जवाहीर मिळून ८०,००,००,००० पौंड किंमतीची ही संपत्ति आहे असें एका आंकडे मोड्या उद्योगी पुरुषानें अनुमान केलें आहे.

महत्वाचा निवाडा— मुंबई स्माळकाज कोर्टांत या आठवड्यांत एका महत्वाचे प्रश्नाचा निकाल झाला. बांबे बरोडा रेलवे कंपनीनें एक प्रॉव्हिडेंट आणि म्युच्युअलफंड ह्मणून ठेविलेला आहे. त्या फंडातून कंपनीच्या नौकराचे मरणोत्तर त्याचे वारसास ४१९ शें रुपये मिळत असतात. या मिळणाऱ्या रकमेवर सावकाराला आपली डिक्री बजावून हे रुपये घेतां येतील असें स्मालकाज कोर्टाचे जज्यांनीं ठरविलें. आणि ज्या मारवाड्यानें दावा आणिला ज्या मारवाड्यास रेलवे कंपनीनें रुपये द्यावें असा निवाडा दिला. न्या० सिं०

जमिनीपासून सात मैलाचे उंचीवर आकाशांत कोणी प्राणी गेल्यास त्याला श्वासोच्छ्वास करितां येत नाहीं असें अनुभवांवी शोधक लोकांनीं सिद्ध करून प्रसिद्ध केलें आहे.

टांचण्या— इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व हॉलंड ह्या देशांत टांचण्या करण्याचे कारखाने आहेत त्यांतून दररोज सात कोटी टांचण्या तयार होतात, असा हिशेब काढला आहे.

सर्पविषाची बाधा नाहीं!— डुकरांना सर्पविषाची बाधा मुळींच होत नाहीं. याचें कारण त्यांच्या अंगांतील मेदाचें योगानें सर्पविष त्यांच्या रक्ताभिसरणक्रियेस जाऊन पोंचत नाहीं.

अंडीं खाणारा साप— दक्षिण आफ्रिकेंत एक जातीचा सर्प आहे तो पक्ष्यांचीं अंडीं खाऊनच आपला निर्वाह करितो. त्याचे तोंडांत दांत नसून अंडीं चावण्याची वगैरे क्रिया त्याचे पोटांत असलेल्या चमत्कारिक रचनेनें होते.

"रॉयल साव्हेरन" नांवाची एक इंग्रजी लष्करी आगबोट आहे. तिचेवर ८०० विजेचे दिवे लावण्यांत आले आहेत. त्या विद्युद्दीपांच्या तारा एकमेकींपुढें जोडलेल्या तर त्या तारांची लांबी ३० मैल होते!

गोळी न लागणारा पोषाख— जर्मनींत वेस्ट फ्यालियन येथें राहणाऱ्या डोवे नामक एका कुशल शिप्यानें बंदुकीतून उडविलेल्या छऱ्यांचें ज्याजवर कांहीं चालणार नाहीं असा एक नवीन पोषाख तयार केला आहे. व तो जर्मन सरकारानें अनुभव बघून आपल्या लष्करांत चालू करण्याचें ठरविलें आहे.

फार मोठी जाहिरात— अवघ्या जगांत आजपर्यंत कधीं येवढी मोठी जाहिरात लागली नाहीं अशी एक जाहिरात कानेरी बेटांतल्या उंच टेकड्यावांवर लाविली आहे. ह्या जाहिरातींत "Grand Canary Engineering Company" हीं अक्षरें लिहिलीं आहेत. ह्या जाहिरातींतील प्रत्येक अक्षर २० फूट लांब व १९ फूट रुंद असून प्रत्येक अक्षराची आडवी किंवा उभी रेघ ३। फूट जाड आहे. ही जाहिरात २९० यार्ड लांब झाली आहे!

बहुगुणी पेटी— एका युरोपियन कारागिरानें एक पियानो वाजाची पेटी अशी बनविली आहे कीं, त्या पेटीचा बिछाना अंथरून निजण्या करितां पलंगा सारखा, बिलियर्ड टेबल सारखा, स्वस्थ पडायला एखाद्या कोंचासारखा, जेवायासाठीं लागणाऱ्या मेजासारखा अथवा चीजवस्तु ठेवण्याच्या लहानशा कपाटासारखा उपयोग करितां येतो. युरोपियन कारागीर ज्या युक्ति व कल्पना काढतील त्या कांहीं अजब व थक्क करून टाकण्यासारख्या असावयाच्या, हें आपलें ठरलेलेंच आहे! ज्ञा .च.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके याचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ........................ ४

Annum in arrears 7 ,, 1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.....................................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।१

Advertis
Below 10 lines... 2 R
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 17 JULY 1893 NO. 28

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १७ माहे जुलै सन १८९३ इ० अंक २८

## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्मातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गुण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें तावडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, विचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूळ झाला, कंबरेंत सलका मारल्या तसेंच पाटींत दुखणें वेळेवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लवकी पांढरी होणें, परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळलेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्या विषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक मात्रानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूचा जबरदस्त शक्ति वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतंतूच्या योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोंचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग थकवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्मांच्या योगें शरिरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जेंवर ज्ञानतंतूची अशक्तता साधारण किंवा स्थानिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून रहाणार नाहीं. जोपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाचीं कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजरांत तें विकत मिळतें F. Moor Clements.ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगिरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. ‘ क्लेमेंटचें टानिक ’ नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु ही यानें बनतात, आणि रक्त व मेंदु यांना हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृति सदृढ, बळकट, ताकतदार, आणि जोमदार होते आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बोनन को, कलकत्ता; डब्ल्यु इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकानं.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

## शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा वहा )

नंबर ३

( २५ वे अंकावरून पुढें चालूं )

गुरुजी—मुलांनो, मागील खेपेस मी तुह्माला नकाशा ह्मणजे काय, व तो कसा काढितात, वगैरे माहिती सांगितली. आज आपण त्याच विषयांवर आणखी बोलूं. हा पहा आपल्या गांवाचा नकाशा येथें टांगून ठेविला आहे. आपल्या शाळे पुढून जो नाला वाहतो, तो या नकाशांत दाखीव पहूं सदू? सदूनें दाखविल्यावर

गुरुजी—हा नाला फार लांबून वाहत आलेला नाहीं. मागें आपण गणू पाटलाच्या मळ्यांत हुरडा खाण्याकरितां गेलों होतों, त्याच्याच उत्तरेच्या बाजूस उंच बरड आहे, त्याच्या पायथ्या पासून हा निघाला आहे.

विठू—गुरुजी, मळ्यांतल्या झाडांस दोन चार दिवस पाणी मिळालें नाहीं, तर तीं मेल्या सारखीं दिसतात; आणि बरडावर काय जिकडे जावें तिकडे दगड. पाण्याचें कुठें नांव देखील नाहीं; असें असतां उन्हाळ्यांत देखील बरडावरचीं झाडें टवटवीत दिसतात. असें कशानें होतें.

गुरुजी — बरें पुसलेंस मी याविषयीं तुह्मांला केव्हां तरी सांगणार होतोंच, तें आतां सांगतों ह्मणजे झालें. कांहीं झाडांना एक दोन दिवसां आड नेहमीं पाणी द्यावें लागतें न दिल्यास तीं कोमजून जातात. मळ्यांतलीं भाजीचीं झाडें ह्मणजे मेथी कोथिंबीर चाकवत, तोंडली, भोपळा, पडवळ, इत्यादि हीं अशाच प्रकारचीं झाडें होत. कित्येक फुलझाडें जसे गुलाब, चमेली वगैरे पाण्यावांचून बरेच दिवस वाचतात. जोंधळा कापूस या झाडांचें आयुष्य तीन चार महिने असतें. त्यांचा निर्वाह पावसाच्या पाण्यावर होतो परंतु त्यांस कणसें व कापूस आल्यावर मग त्यांस कितीही पाणी घातलें तरी तीं वांचावयाचीं नाहींत. गहूं हरभरा इत्यादि धान्याच्या झाडांस जमिनींतला ओलावा पुरेसा होतो, व तेवढ्यावर तीं तीन चार महिने वांचतात, परंतु त्यास फुलें येऊन धान्य बांधल्यावर जमिनींत ओलावा असून हीं तीं वाळून जातात. हीं सर्व झाडें अल्पायुषी असतात. मोह, लिंब, बकाण, आंबा इत्यादि झाडें जमिनींतल्या ओलाव्यावर पुष्कळ वर्षें वांचतात.

रामा— बरडीं जमिनींत ओलावा कोठें असतो गुरुजी? तेथें दगडावर देखील झाडे उगवलेलीं आढळतात.

गुरुजी— मुलांनो, सांगतों ऐका. सर्व प्राण्यांस निर्वाहा करितां कांहीं तरी खावें लागतें. कोणी धान्य खातात, कोणी गवत व झाडपाला खातात, व कोणी दुसऱ्या प्राण्यांला मारून त्यांचें मांस खातात. त्याच प्रमाणें झाडांसही कांहीं तरी खाऊन निर्वाह करावा लागतो. प्राण्यांला जसें तोंड असतें तसें झाडांसही असतें. परंतु प्राण्यांचें तोंड वर असल्यामुळें दिसतें, तसें झाडांचें तोंड दिसत नाहीं, कारण तें जमिनींत असतें.

गणू— झाडांना तोंड असतें हें मी कधीं ऐकिलें नव्हतें. गुरुजी, आह्मांला एखाद्या झाडाचें तोंड दाखवाल काय.

गुरुजी— होय दाखवतों. सदू, त्या वाफ्यांतून एक झेंडूचें झाड उपटून आण पाहूं.

सदूनें एक झाड मुळांसह उपटून आणल्यावर

गुरुजी— या मुळ्यां, हेंच झाडांचीं तोंडें होत. आपण जें काम तोंडानें करितों, तें काम झाडें मुळ्यांनीं करितात. जमिनींत जो ओलसरपणा असतो, तो झाडें मुळ्यांच्या योगानें शोषून घेतात किंवा पितात. ज्या झाडांच्या मुळ्या आंखूड असतात त्यांना खोल जमिनींतला ओलावा पितां येत नाहीं ह्मणून तीं अल्पायुषी असतात, व सहज उपटून टाकितां येतात. भाजी पाल्याचीं व धान्यांचीं झाडें या प्रकारचीं होत लिंब आदीकरून वृक्षांच्या मुळ्या फार खोल व लांबवर पसरतात, ह्मणून त्यांस आसपासच्या खोल जमिनींतला हा ओलावा पिऊन घेतां येतो, आणि ह्मणूनच हीं झाडें मनुष्याला उपटतां येत नाहींत एवढेंच नाहीं तर मोठ्या वादळानें देखील सहसा उपटत नाहींत. बरडावरचीं झाडें सर्व या प्रकारचीं आहेत. वरून जरी कोरडी जमीन दिसते तरी बरडावर देखील खोल खणिलें असतां आंत पाणी लागेल.

सदू— झाडांस पुष्कळ मुळ्या असतात त्या सर्व मुळ्यांनीं झाड ओलावा पीत असतें. ह्मणून एखाद्या झाडाच्या बहुतेक मुळ्या कापून टाकिल्या असतां तें झाड कोमेजून जातें, याचें कारण त्यास पाहिजे तितका ओलावा मिळत नाहीं असेंच ना गुरुजी.

गुरुजी— बरोबर. आतां तुह्मांला झाडांचें उपजीवन ह्मणजे निर्वाह कसा चालतो हें समजलें. परंतु सर्व प्राणी व वनस्पति यांच्या उपजीवनाचें मुख्य साधन जें पाणी, तें जमीनींत कोठून येतें, हें तुह्मास माहीत आहे?

सदू— पाऊस पडला ह्मणजे नद्या तळीं विहिरी यांचें पाणी चढूं लागतें. आणि पावसाळा संपला ह्मणजे त्यांचें पाणी कमी होतां होतां, शेवटीं उन्हाळ्यांत कित्येक विहिरी नद्या तळीं कोरडीं पडतात. यावरून जमिनींतील सर्व पाण्याचें कारण पाऊस आहे, नाहीं का गुरुजी!

विठू—नद्यांना पावसा पासून पाणी येतें ह्मणावें, तर उन्हाळ्यांत पाऊस नसून ही त्या वाहतात. तसेंच विहिरींचीं तोंडें लहान असतात, त्यांत पावसाचें पाणी किती पडेल? आणि तेवढ्या पाण्यानें विहिरींचें पाणी कसें वाढेल?

गणू— गुरुजी माझ्या वगांत विहीर आहे, तींत पावसाचा एक थेंबही जात नाहीं; तरी देखील पावसाळ्यांत तिचें पाणी अगदीं वर चढतें. असें कां होतें?

गुरुजी—असें होण्याचें कारण अगदीं उघड आहे. जमिनीवर एक तांब्याभर पाणी उपडें केलें, तर तें नदीला जाऊन मिळणार नाहीं. त्याचें काय होतें तें तूं सांग विठू?

विठू— तें जमिनींत जिरून जातें.

सदू—पाऊस थोडा पडला ह्मणजे तेवढ्यानें नदीला पूर येत नाहीं, कारण तें पाणी जमीनींत जिरून जातें.

गुरुजी …शाबास सदु. लहान तोंडाच्या कुपींत पाणी भरावयाचें असतां, पाण्याची धार बारीक असली तर पाणी सांडणार नाहीं. परंतु घागरीनें त्या कुपीवर पाणी ओतलें तर कुपींत त्यांतलें थोडेंसें पाणी जाऊन बाकीचें सांडून जाईल. त्याच प्रमाणें पाऊस थोडा पडला, ह्मणजे तें सर्व पाणी जमिनींत जिरून जातें मोठा पाऊस पडला तर त्यांतलें थोडेंसें पाणी जमिनींत जिरून बाकीचें वाहून जातें. अशा रितीनें जमिनींत मुरलेल्या पाण्यानें विहिरी तळीं नद्या यांस पाण्याचा पुरवठा होतो. असो, आज उशीर झाला आहे. पुढील खेपेस याच विषयाच्या संबंधानें तुह्मांस आणखी उपयुक्त माहिती सांगणार आहे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आषाढ शुद्ध ४ शके १८१५

---

## वृश्चिकदंशावर रामबाण औषध

आह्मास सर्व लोकांस कळविण्यास मोठा आनंद वाटतो कीं कुलाबा जिल्ह्यांतील पेण येथील 'सुधाकर' पत्राचे म्यानेजर रा. रा. नारायण गणेश मंडलिक यांनीं विंचवाचे विषावर हटकून गुणकारी अशी एक वल्ली अनुभव घेऊन पाहण्यासाठी धाडली होती. तिचा आह्मी वृश्चिकदंशावर प्रयोग करून पाहिल्या नंतर आमची त्या वल्लीच्या गुणाबद्दल पक्की खातरी झाली. आह्मी व आमचे स्नेही उभयतां मिळून तिचा अनेक वेळा उपयोग केला आणि खरोखर ही वल्ली अजब आहे असा आमचा पक्का ग्रह झाला आहे या मुळींत नवल एवढेंच कीं विंचू ज्याला चावला असेल त्याच्या आंगाला इचा स्पर्श न होतां विंचू उतरतो. त्या दंश झालेल्या मनुष्याच्या दृष्टीसमोर ही मुळी दुसऱ्यानें आल्या अंगावर फिरवली कीं चटकन थोड्या पळांतच विषबाधा दूर होते. वनस्पतीचा हा विलक्षण धर्म पाहून ईश्वरी कृतीचा महिमा अगाध वाटतो. ही मुळी मागविणारांस वरील गृहस्थाकडून १९ आण्यांत व्हाल्यु-पेबलनें धाडली जाईल. मुळी बरोबर अवश्य संग्रही ठेवण्या सारखी आहे.

---

मागील सालचा वऱ्हाडांतील तुरुंगाचा रिपोर्ट आमच्याकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. वऱ्हाडांत सात तुरुंग आहेत व ह्यांत गतवर्षीं १४३० पुरुष कैदी होते. व ९४ बायका होत्या. ह्या चवऱ्याण्णव बायकांत फक्त दोघीच बदचालीच्या आहेत. मागील दहा वर्षांत दर वर्षीं कैद्यांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. वरील दीड हजार कैद्यांपैकीं शेतकीवर निर्वाह करणारे जवळजवळ सातशे आहेत. ह्या वरून आमच्या शेतकऱ्यांची खरी स्थिति कशी आहे ह्याचें अनुमान करण्यास बरीच सवड आहे. डाकेखोरी सारखे अपराधी जरी कमती होत चालले असले तरी एकंदर कैद्यांचें वाढतें प्रमाण चांगलें ह्मणतां येणार नाहीं व शेतकरी लोकांची आहे अशीच जर स्थिति राहील तर ही संख्या अशीच वाढत्या प्रमाणावर राहील असें दिसतें. ह्या कैद्यांत ११ मुलें आहेत. ह्यांची शिकण्याची व्यवस्था काय? सर्व वऱ्हाडा करितां एक मोठा तुरुंग होणार आहे. व तो झाल्यावर कैदी मुलांची शिकण्याची व्यवस्था होणार आहे, परंतु सध्यां व गरजे पुरती व्यवस्था होणें फार जरूर आहे. रिपोर्टाच्या वर्षीं तुरुंगाकडे ७६६१२ रुपये खर्ची पडले व ते मागल्या सालापेक्षां १५५२७ रुपयांनीं अधिक होते. प्रत्येक कैद्याच्या मागें ६६ रुपये खर्च आला आहे व त्या पैकीं २९ ३० रुपये त्याच्या पोटखर्चास लागले आहेत. १८९१ सालापेक्षां साधारण ४ रुपये प्रत्येकास अधिक लागले आहेत व ह्याचें कारण महर्गता. येथील तुरुंगाखेरीज सर्व ठिकाणची व्यवस्था बरीच आहे. येथील तुरुंगांतील बऱ्याच ढोबळ चुका मे. लेन साहेबांनीं रपोटांत नमुद केल्या आहेत. डा. रेली साहेब येथील जेलावर व्यवस्थापक आहेत. ह्यांस कैदी लोकांबद्दल कितपत काळजी आहे ह्याचे मासले ह्या रपोटांत दाखल केले आहेत. कांदा फार पौष्टिक पदार्थ आहे व कैदी लोकांच्या खाण्यांत पौष्टिक असा हाच पदार्थ आहे. हे कांदे कैदी लोकांस देण्याचें डाक्टर साहेबांनीं बंद केलें व कांदे न दिले तरी ते लोक वांचू शकतात असें डाक्टर साहेबांचें ह्मणणें आहे. कैदी लोकांना जें अन्न मिळतें त्याच अन्नावर सर्व लोकांचेही प्राण राहूं शकतील. व साहेब बहादुरांचें मत सरकार जर कबूल करील तर सरकारचें कोट कल्याण होणार आहे हिंदु अथवा नेटिव्ह व पशू ह्यांच्या मध्यें भेदाभेद न जाणणाऱ्यांची ह्याच्यापेक्षां अधिक उदार मतें कोठून असणार! मे. लेन साहेबांनीं या साहेबांची बरीच कान उघाडणी केली आहे. व अकोला तुरुंगांत उमरावती पेक्षां अधिक कैदी मृत्युच्या दाढेंत सांपडतात ह्यांचें कारण डा. साहेबांचे वरल्या सारखी उदात्त वृत्ति अंशतः तरी कारणीभूत होण्याचा संभव आहे असें स्पष्ट ह्मटलें आहे. व अनुभव घेऊन ठरविलेल्या नियमांत ढवळाढवळ न करण्या बद्दल डा. साहेबांस ताकीद दिली आहे.

---

मामुली वहिवाटी प्रमाणें रेसिडेंट साहेबांकडून मागील सालचा (१८९२) वऱ्हाडांतील दवाखान्याचा रिपोर्ट आमच्याकडे आला आहे त्याचा आभारपूर्वक स्वीकार करितों. ह्या रपोटांत सरकारी दवाखाने (सिव्हिल हास्पिटल) व धर्मार्थ दवाखानें ह्यांची वेगळाली हकीगत दिली आहे. रपोट लिहिणाराचें काम ह्या योगानें जरी वाढलेलें आहे तरी मागल्या सारखा घोटाळा आता बिलकूल राहिला नाहीं. व निवळ सरकारी खर्चानें चालणारी संस्था व सरकारच्या मदतीनें चालणारी संस्था ह्यांची निरनिराळ्या तऱ्हेनें माहिती करून घेण्याचें सुलभ झालें आहे.

वऱ्हाडांत रिपोर्टाच्या सालीं आठ सरकारी दवाखाने होते. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं एक एक, कळमखारास एक व चिखलदऱ्यास एक. वऱ्हाडचे चिखलदरा हें महाबळेश्वर अथवा निलगिरी असल्या कारणानें जिल्ह्याच्या ठिकाणीं सरकारी दवाखाना असून येथें ही कां असावा असा प्रश्न करण्याची जिज्ञासा होण्याची जरूर नाहीं. धर्मार्थ दवाखाने ३६ होते. सरकारी दवाखान्यांत ४७७७६ लोकांस औषधें मिळालीं. ही संख्या तिगस्तां पेक्षां ३३९८ यांनीं जास्त आहे. साडे सहा हजार बायकांनीं औषधें घेतलीं. धर्मार्थ दवाखान्यांत २४८३१९ लोकांनीं औषधें घेतलीं. तिगस्ता पेक्षां सुमारें अकरा हजारांनीं ही संख्या अधिक आहे. ह्या दर वर्षींच्या वाढत्या प्रमाणांवरून लोकांस ह्या संस्थांचा उपयोग करून घेण्याची गोडी लागत चालली आहे असें दिसतें. ह्या आडीच लक्ष लोकांपैकीं ३९ हजारावर बायका होत्या. सरकारी दवाखान्यापेक्षां धर्मार्थ दवाखान्याचा बायका फार उपयोग करून घेतात असें सिद्ध होतें. दवाखान्यांतून बायका दाक्तरणी ठेवण्याचा प्रघात जारीनें अंमलांत येईल तर बायकांची संख्या खचित वाढेल. ह्या दोन्ही दवाखान्यांत अनुक्रमें २०९० व १७६८ लोकांनीं दवाखान्यांत राहून औषधें घेतलीं. सरकारी दवाखान्यांत १३९ लोक व धर्मार्थ दवाखान्यांत १६३ लोक एका वेळीं रहातील अशी सोय आहे परंतु सरासरी १०९ लोकांनीं दररोज ह्या सोईचा उपयोग करून घेतला. खाजगी खोल्या काढण्याचा विचार सर्वत्र अमलांत येईल तर ह्या सोईचा उपयोग लोक अधिक करून घेतील असें दिसतें.

रोगावर शस्त्रप्रयोग करण्याच्या कामांत वऱ्हाडांतील डाक्तर बरेच मागसलेले आहेत तरी पण उमरावतीचे डाक्तर रो प्रमाणें यवतमाळचे, बुलढाण्याचे दोन्ही, शेगांवचे, आकोल्याचे दोन्ही, (डा. रेली व डा. दुरगया) डाक्तर स्तुतीस पात्र आहेत. आमचे येथील लोकप्रिय डा. दुरगया ह्या कामांत फार हुशार आहेत व कुशल युरोपियनां बरोबर त्यांची बरोबरी असणें त्यांस फार भूषणावह आहे.

सरकारी दवाखान्याकडे ४९६९४ रुपये खर्ची पडले ही रकम तिगस्ता पेक्षां सुमारें तीन हजारांनीं कमी आहे. ९३ रु. युरोपियन वर्गणीदारांचे, ३७ रु. नेटिव्ह वर्गणीदारांचे व सुमारें दोनशें रुपये लोकल फंडाकडील खेरीज करून बाकीचा सर्व खर्च सरकारचा आहे. धर्मार्थ दवाखान्याकडे ९२३७४ रुपये लागले ह्मणजे चार हजारापेक्षां कांहीं अधिक रुपये तिगस्ता पेक्षां कमी लागले. दोन्हीही संस्थांतून रोग्यांची संख्या असतां खर्च कमी यावा हें काटकसरीचे चांगलें उदाहरण आहे. तरी पण इंग्रजी औषधाकडे एक हजारावर अधिक खर्च झाले आहेत! शिलक, शिलकीवरील व्याज, लोकलबोर्डे, म्युनिसिपालिट्या वर्गण्या, देणग्या, व सरकारी मदत इतक्या धर्मार्थ दवाखान्याच्या उत्पन्नाच्या जागा आहेत ह्या सर्व मिळून १३२५४७ रुपये धर्मार्थ दवाखान्या करितां उत्पन्न झालें. ह्यांत सरकारचे ३२९७९ रुपये आहेत. वरील खर्च वजा होऊन ८०१७३ रुपये शिलक आहेत. ही तिगस्ता पेक्षां तीन हजारांनीं कमी आहे. व्याजावर दवाखान्यांचा खर्च भागेल इतकी शिलक वाढविण्याचा प्रयत्न करण्याबद्दल रपोट लिहिणारनें म्यु. कलोकल बोर्ड यांस उपदेश केला आहे व त्यास रेसिडेंट साहेबांनीं मान डोलाविली आहे. उपदेश खरोखर स्तुत्य आहे परंतु सरकारनें पांचवर्षांचा खर्चाचा अंदाज काढून त्याप्रमाणें खर्चाच्या निम्मे आपली देणगी कायम करण्याचा विचार कां करावा हें कळत नाहीं. बत्तीस हजारांचे पंचवीस हजार झाल्यावर सात हजारांची खळ भरून काढण्यास शिलके कडेच डोकावलें पाहिजे. शिलक वाढणें सरकारासही हितावह आहे व ती वाढविण्यास हात भार जरी न लावतां आला तरी कमी करण्याच्या भरीस पडणें जरा चमत्कारिक नव्हे काय?

रपोटाच्या सालीं तीन हजार रुपये वर्गणी धर्मार्थ दवाखान्या करितां गोळा झाली. तिगस्ता चार हजार झाली होती व १८९० सालीं सहा हजारावर मिळाली होती. दर वर्षीं ही रकम अशीच जर कमी होत जाईल व सरकार आपली देणगी कमी करण्याचा विचार अमलांत आणील तर शिलक वाढणार कशी? आहे ती संपून जाऊन दर वर्षीचा खर्च मागविण्या करितां गरीब म्युनि. कमेट्या व लोकलबोर्डे यांस आपल्या देणग्या वाढविण्याचा प्रसंग मात्र येणार आहे. वर्गणीची रकम वाढावी ह्मणून तहसीलदार लोकांस सूचना गेल्या आहेत परंतु दीड हजार युरोपियन व युरेशियन लोकांत धर्मार्थ दवाखान्यातून औषधें मिळाली असतां त्या वर्गा कडून एक शिरराई देखील जर वर्गणी मिळत नाहीं व अशीच स्थिति दरवर्षीं चालूं आहे तर नेटिवांकडून जास्ती वर्गणी मिळविणें कठीण दिसतें तहशिलदार लोकांकडून कांहीं मुद्दाम व्यवस्था झाल्यास गोष्ट निराळी. दवाखान्याचा खरा उपयोग जाणण्याची शक्ति असून दर वर्षीं धर्माकडे कांहीं रकम सढळ हस्तें घालण्याची ऐपत असून गोऱ्या लोकांकडून धर्मार्थ दवाखान्यास एक छदामाचीही प्राप्ति नसावी हीं खरोखर त्यांस लांछानस्पद गोष्ट आहे त्यांचेंच अनुकरण काळ्यांनीं नकरितां तीन हजार रुपये तरी धर्माच्या कामाकडे लावणें त्यांस फार भूषणास्पद आहे.

---

## औद्योगिक सुधारणा.

हिंदुस्थानास सामाजिक, व राजकीय सुधारणांची अवश्यकता जितकी, तितकीच किंवा त्याहून जास्त औद्योगिक सुधारणेची जरूरी आहे. पोटापाण्याची व्यवस्था झाल्यावर ज्या प्रमाणें प्रत्येक व्यक्तीस दुसरे धंदे करण्यास हरूप येतो त्याच प्रमाणें प्रत्येक देशास अथवा राष्ट्रास आपले प्रत्येक बाबींत सुधारणेचें पाऊल पुढें टाकण्यास, दरिद्रावस्थेंतून सुटका करून घेण्याचे उपाय प्रारंभीं योजिले पाहिजेत ह्मणजे प्रत्येक राष्ट्रानें आपले उद्योगधंदे इतके वाढविले पाहिजेत कीं, राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्यास दोन प्रहरची काळजी नसावी. ज्या देशांतील लोकांस 'उद्या कसें होईल' हा 'ससेमिरा' त्रास देत नाहीं त्याच लोकांची स्थिति सुखकर आहे व तेच लोक धारणें

The Berar Samachar

MONDAY JULY, 17, 1893

## THE PROPOSED SETTLEMENT IN BERAR.

The first instalment of proposals as regards the new assessment of land in the three Talukas of Malkapur, Jalgao and Khamgao is already before the Local Government; and it will be the fore-runner of all other proposals with respect to the rest of the province. The acceptance or otherwise of the first proposal of Mr. Francis the Settlement Officer of the province will also decide whether his future proposals will be welcome or not. The problem is of vital importance to the province and any short comings or defects left unnoticed in due time will multiply in the end the permanent and disastrous results of a hasty, uncalled—for and unjustifiable enhancement in the old rates of assessment.

Upon the decisive measures that the Government will adopt will depend the material advancement of Berar and it is to be hoped that no efforts will be spared to consult the public on such a subject where the best and dearest interests of the people are at stake. We request the Commissioner to make the question as largely talked of as possible and with that view we lay down a few suggestions here before the people at large.

A practical beginning is no doubt made at the last meeting of the Berar Sarva janik Sabha in so far as it invites a fair and impartial discussion on the subject and notes down the arguments for and against the revision of the current assessments. We have not got the resolution of the Sabha before us but people express perfect satisfaction at the fact that the members of the Sabha could record an unanimous vote in adopting the scholarly and well thought—out minute of Mr. Rangnath Narsinha Mudholkar on the subject. But many persons are in ignorance as to what is going on. Colonel Mackenzie has got a nice and singular tact of courting public opinion on any question which he deems of general interest and he will be acting in full harmony with the views of the Resident if he circulate freely and widely the proposal of Mr. Francis. We may mention here a sad ommission that the presses in Berar have not got the full report of the Settlement Officer. Some of the local papers have devoted columns after columns to bring the subject within the reach of the general reader and that their services are highly valued but we are sure that they have not learnt information at the direct channels of communication. The complete publication of Mr. Francis' paper is not the only thing we want most. We have come to know that some other officers have also tendered in their opinions on the subject of revision and some of them run counter to the suggestions of Mr. Francis. It is these papers that ought to be within the access of the people. The proposal of the Survey Officer betrays a spirit of advocacy rather than a whole and comprehensive view of the question from the stand—point of a judge. We are confident that the capable, judicious, and sympathetic men at the head of the Government will not ill consult the wishes of the people so as to lay down a bad policy pregnant with general discontent and total ruin of agriculture as a profession.

In the face of the revised rates of assessment we would advice a return to the old practice of collecting Governmental due *in specie* from the produce of land. The settlement of thirty years back is itself very heavy and burden—some. From *a priori* ground the Settlement looked like a blessing to the people but proved in the stern realities of experience an odius tax on agriculture. The present proposal makes matters worse and culminates in over—riding the just and right claims of the people as regards the fruit of their labour, capital, and superintendence. The new rates usurp even the small pittance of a competency of income that people could lay by for the demands of decrepit old age and the minor wards in the family. We are collecting old accounts to point out that out of the yield of the land 45 per cent goes to the public coffers. If Government were to lease out survey fields from year to year with a claim for half of the actual produce of them we make bold to assert that the Government would find it hard to realize the hondsome revenue it has received till now. One argument that is generally quoted to confirm the reaso—nableness of the Government assessment is most fallacious. If people cannot afford to pay at the assessed rate why do they not return the fields to Government? Herein lies their grand open truth that the assessment is fair, moderate and adequate. The fallacy turns upon the tendency and habits of the people. The general masses having been trained in the only profession of agriculture they do not know what else to do if not to cultivate land. Whether they gain fair livelihood or are starved they are driven to the brink of living upon agriculture alone. This is the reason why they stick to agriculture even for miserly emoluments. We are certain that if new industries were to open, agriculture will be neglected and people will be better off for some years at least.

( to be continued)

---

Lord Vernon has contributed an able article to the Nineteenth Century on 'how to attract capital to the land'. He points out that Government ought to afford every opportunity to the owners of land to apply capital to the development of land and that is only possible when no new attempts are made to make agriculture an unprofitable business. His observations are general and the following paras culled from the essay will teach an important lesson on the subject:—

"Agriculture has to be considered as a branch of industry, and not as a precious relic that trades on the traditions of the past. We have to appreciate in these practical days that the family of an impecunious landowner may claim to have owned certain lands since England was peopled by barbarians, but such a family is soon forgotten if succeeded by that of a wealthy man who attends to the wants of others in an open handed and liberal spirit. Present customs favour agriculture when a proprietor is rich and liberal. The owner is content with very little interest for his money, the farmer gets every possible inducement to make the most of his land, and the labourer benefits by the affluence of both. The houses in which the tenants live are watertight, and do not breed pulmonary diseases; the drains and water supply are in good order and do not invite typhoid and other fevers. We see the other side of the picture if a landlord is in pecuniary difficulties, and it is such a case that suggests the necessity for some modification in the existng customs.

I would suggest to those who propose considering agriculture as simply a branch of business that it might be unwise to look at it from a purely utilitarian point of view. Our one aim should be to disturb as little as possible the present condition of things, to endeavour to attract as much capital to the land as possible, and to get rid of those owners who are quite unable to effect the repairs and improvements that a landed property requires."

---

It is very amusing to find that the Government of India is active and energetic to appoint commissions after commissions to inquire into the intoxicating drugs that are *native* in the true sense of the word. We have reproduced below a summary of the work entrusted to the Hemp-Commission as detailed in an English paper but we would however urge the Government to stop for all practical purposes the abundant import of European wines. These drinks have done more harm to the health of the nation in addition to heavy drains upon the people's purse as well. We have often ridiculed the idea of abolishing the opium trade on the same principle upon which we take objections to such needless commissions as the present one under notice:—

"Two points are mentioned for special investigation:—(1)The danger lest prohibition or stringent restrictive measures may give rise to serious discontent, and be resented by the people as an unjustifiable interference with the long-established social customs; (2) whether, if the use of hempen drugs is prohibited, those who would otherwise use them would be driven to have recourse to alcohol or other stimulants or narcotics still more deleterious. Regarding the first point it is mentioned that the use of hemp drugs is common among fakirs and ascetics, who are held in veneration by large classes of the population. In Bengal it has been stated that an infusion of the leaves of the plant is offered to every guest and member of a family on the last day of the Durga Puja. It has no ill effects, and its use is not considered reprehensible in any way. It is believed that in some parts of the county bhang is in a special degree the poor men's narcotic, and the possible unpopularity of the measure which would deprive the very poorest of the population of the use of a narcotic to which they have always been accustomed, should be overlooked. Evidence is to be taken from among the classes using the drug, and the Commission are to state whether in their opinion, prohibitory measures would give rise to political discontent. They are further to set forth what reforms and imvorpements they may think necessary for controlling the cultivation, manufacture, sale, and [illegible] and if they pronoun[illegible] absolute prohibitio[illegible] duty to state the rega[illegible] should be adopted for the purpo[illegible] Local Governments have been instruct ed to render every assistance, and to make any suggestions which [illegible] ledge and experience may su[illegible]

---

## वऱ्हाड.

हवामान—गेल्या आठवड्यांत येथें पाऊस नाहीं तरी आसपास थोडा पडल्याचें एकतों रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं

गेल्या ९ वे तारखेस वऱ्हाड सार्वजनिक सभेनें खामगांव, जळगांव व मलकापूर या तीन तालुक्यां करितां सुचविलेल्या नव्या धाऱ्या विषयी आपला अभिप्राय नमुद केला सर्व कागदपत्र तयार करण्याचें श्रेय रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस आहे

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या आज्ञेनें तयार झालेलीं खालील पुस्तकें आह्माकडे अभिप्रायासाठीं आलीं आहेत त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों:—

(१) कार्थेज, (२) इराण, (३) तुर्कस्थान (४) विचाररत्नाकर, (५) मार्कस ऑरेलिअस याद हाची बोध वचनें.

शेट जहांनगीर हारमसजी मोदी यांनीं बडनेऱ्यास १५०८० रु. खर्च करून एक दवाखाना बांधला आणि गेल्या ८ वे तारखेस मे. कमिशनर साहेब यांच्या हातून लोकोपयोगार्थ ह्या भक्कम इमारतीचा धर्मादाय केला. या अत्यंत देणगी बद्दल बडनेऱ्याचे रुग्ण, आर्त, व पिडित लोक शेट जहांनगीर हारमसजी यांचें नांव कृतज्ञेनें चिरकाळ स्मरतील आणि त्यांस व त्यांच्या घराण्यास दुवा देतील हें उघड आहे कर्नल मेकेंझी साहेबांनीं म्हटल्या प्रमाणें शेट जहांनगीरजी हे या सत्कृत्याच्या योगें त्या पुण्यशील, उदारचरित व कल्याणकारी जेम शेटजी जीजीभाई, रेडीमनी, वाडिया, जहांनगीर कावसजी, कामास, पेटीट, दादीशेट इत्यादि विख्यात पार्शी मंडळीच्या नाम वळींत जाऊन बसले हें त्यांच्या कुळास ज्ञाति बांधवास मोठे भूषणास्पद आहे.

रा. सा. गिरराव रामचंद्र तहशीलदार यांची मलकापुरास झालेली नेमणूक फिरवून त्यांस चांदुरास नेमल्या प्रमाणें ते तिकडे रुजूं झाले. आणि चांदूरचे तहशीलदार रा. रा. गोविंद गंगाधर दामले यांस मलकापूरास बदलले.

गेल्या १२ तारखेस सकाळीं उमरावतीस एका भंग्यानें आपल्या बायकोस भर रस्यावर चाकूनें वार करून करून ठार मारलें. हें खरोखरच नवल!

---

नोटीस

तीर्थरूप गंगाभागिरथी रधाबाई मई

कस्तूरचंद मारवाडी राहणार नांदुरा खुर्द तालुका मलकापूर यांस:—

साष्टांग नमस्कार विज्ञापना की, आपण तारीख १० माहे जुलई १८९३ इसवीच्या 'वऱ्हाडसमचार' वर्तमान पत्रांत जाहिरात दिली ती निराधार असून सर्वथैव खोटी आहे. त्या जाहिरातींत मला 'गुमास्ता' ठरवून मला गुमास्तेपणा वरून रद्द केलें आहे हें सर्व खोटें आहे. मी आपला शास्त्राधारें दत्तक घेतलेला पुत्र आहे आणि सहा महिन्यापूर्वी दत्तविधान झालें तेव्हां तें कस्तुरचंद यांच्या मरतेवेळच्या आज्ञेवरून झालें. त्या आज्ञेला व शास्त्रोक्त दत्तविधानाला हरताळ लावून आमच्या नांवास बट्टा आणण्याचा तुमचा विचार दिसतो. गेल्या पांच सहा महिन्याची वहिवाट व सरकारी व दुकानच्या कागदोपत्री चालत आलेलें माझें नांव हीं तुमच्या उलट साक्ष देतील. ह्मणून मला ही जाहीर खबर देण्याचें भाग आहे व मला कायदेशीर रितीनें माझें हक्काचे व निजर्गाचें संरक्षण केलें पाहिजे. आपल्या वचनांत राहणें माझा पुत्रधर्म आहे आणि तो मी पाळण्यास तयार आहे पण आपण मातृस्नेहानें वागवून संगोपन केलें तरच आपला अधिकार चालणार आहे.

( १ ) तुह्मी मजला दत्तक घेतले दिवसा पासून तुमचा व माझा विचार चार पांच महिने एक राहिला व दुकानचें काम एकमतानें चाललें. तुह्मी माझे चुलत्याचे घरा आपेल अंगावरील दागिने ठेविले होते ते दागिने तुह्मी घरीं आणिले. आणि त्या दिवशीं मला जतावून बोलला कीं, तूं गळ्यांतील कंठी काढून ठेव आणि ती कंठी काढून ठेवण्यापूर्वीच तिसरे दिवशीं माझे गळ्यांतून रात्रीं कोणी झोंपेंतून नेली हें मला कळत आहे. कंठी कशी गेली याजबद्दल मोक्ष अनेक कुतर्क चालतात. पण त्याची रुष्पां जरूरी नाहीं. नुसती एक कंठी बेमालूम रीतीनें गमावल्या दिवसा पासून मजला घरांत फार वाईट साईट व उणें दुणें बोलूं लागला व खाण्या पिण्यांत भेदाभेद करूं लागला व त्याचा विक्षेप वांकडेपणावर गेला आणि शेवटी आपल्या जाचानें त्रासल्या मुळें मी रागांत पूर्वीच्या घरी आलों. हल्ली तेथेंच आहे व मला तेथून दत्तक घराण्यांत नेऊन दुकानदारी माझ्याकडे चालूं ठेवण्याचा तुमचा इरादा नाहीं. इतकेंच नव्हे तर माझी सर्व इस्टेट घालविण्याचे उपाय आपण चालविले आहेत.

( २ ) भिकमचंद रतिराम हा वहिवाटदार नाहीं आणि त्याला वहिवाटीचा अधिकार मी दिला नाही. जर त्यानें कारकुनाच्या कामाहून अधिक काम केलें तर मी त्याजवर फिर्याद करून नुकसान भरून घेईन.

( ३ ) माझ्या नांवचे दस्तैवज व सरकारी कागदोपत्री दाखले आहेत व माझ्या नांवानें जुन्या असाम्या करून घ्यावयाच्या आहेत तर त्याज विरुद्ध आपण कांही काम करूं नये. दस्तैवज फाडून देणें व असाम्या वसूल करणें व दुकानदारी चालविणें माझें काम आहे. आपल्या इतमामा प्रमाणें आपणास अन्नवस्त्र देण्यास व आपण एकत्र राहिलों तर आपल्या सल्यानें कामधाम चालविण्यास मी एका पायावर तयार आहे. पण आपण कांहीं गैरकायदा काम केल्यास मी तें रद्द समजेन व त्याजबद्दलची जबाबदारी माझ्यावर व माझ्या सर्व स्थावर जंगम इस्टेटीवर नाहीं. आणि असें असून जो कोणी तुह्मा अनअधिकारी बायको माणसाशीं व्यवहार करील तो स्वतांस फसवून घेईन.

( ४ ) आपण हल्लीं स्थावर जंगम जिनगीची अफरातफर मांडली आहे व काल रोजीं ज्वारीच्या दोन पेवा पैकीं एक पेवही परस्पर विकल्याचें ऐकतों तर इस्टेटची कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्याची या लेखानें मी मनाई करितों. दोन घरें, सुमारें तीन हजारांचे दागदागिने व वीस पंचवीस हजारांची दुकानदारी वगैरे सर्व इस्टेट नीटपणें जपून ठेवण्या पलीकडे आपला अधिकार पोंचत नाहीं असें आतां निक्षून सांगणें भाग झालें आहे.

शेवटी विज्ञप्ती एवढीच कीं जें करणें तें योग्य विचारानें करावें आणि फिर्यादी अर्यादी करून सर्व इस्टेट धुळीस मिळविण्याच्या नादीं पडूं नये. या उपर आपली मर्जी गैरवाजवी व गैरकायदा वागण्याची असली तर नाइलाजानें मला सरकारदरबार करावें लागेल. कळावें. ता० १५मा० ७स० १८९३ इ०

सही. मारवाडींत
चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी
मुकाम नांदुरा दस्तुर खुद.

---

नोटीस

मि. मनोवर अली कादरभाई दुकान आकोला यांस—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं तुह्मी नदीपार ताजनापेठ तील भाजी बाजारांतील लाल भुसारी वाली दुकानची लाईन रुपये ३००० हजारास आह्मास विकत दिली व रुपये २२०० बयाणा पेटे घेतलेत व त्याचा कागद करण्याचा करार दिवस आठचा केला असून अजून पर्यंत कागद करून देत नाहींत या करिता ही नोटीस पावल्या पासून दिवस ८ चे आत कागद करून देऊन रजिस्टर करून द्यावे व बाकीचे राहिलेले रुपयें घ्यावेत. असें न केल्यास शिरस्त्या प्रमाणे तजवीज करून ह्या नोटिसीचे खर्चा सह व कोर्ट खर्चासह अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख १९।७।९३

अबदुल हुसेन गुलाब हुसेन मुखत्यार सखाराम भिकाजी
दस्तूर खुद.

---

नोटीस

रा. रा. गीरधर मारवाडी ब्राह्मण राहणार पाळोदी ता. आकोलें यांस—

नोटीस देणार बाबूरावजी सखारामजी देशमुख नोटीस देण्यात येतें कीं तुह्मी मंडाळे येथील सखराम बा। कुकाजींची जमीन भाड्यानें वहितीस केली आहे त्या जमिनीवर आमचा हुकूम नामा झाला असून जप्त केली आहे तर तुह्मी ती जमीन करूं नये ही नोटिस.

बाबूरावजी सखारामजी
तर्फे मुखत्यार
गोविंदराव.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या लेखानें कळविण्यांत येतें कीं मौजे नांदुरा खुर्द तालुके मलकापूर येथील दुकान नामें 'कस्तुरचंद आसाराम' हें व त्या दुकानची सर्व स्थावर जंगम इस्टेट हीं एकंदर खालीं सही करणार यांच्या पूर्ण मालकीची आहे. तिजवर कोणाचा हक्क व अधिकार चालणार नाहीं. तेव्हां ज्या कोणास त्या दुकानाशीं देववेव, व्यापार ठापार, गहाण विक्री वगैरे हरएक प्रकारचा व्यवहार करणें असेल तो माझ्या शिवाय अन्य कोणापाशीं होऊं नये. आणि जर कोणी माझ्या पावती खेरीज दुकानावर कर्ज वगैरे परत करील तर ती रकम मला न पोचल्या मुळें वसूल धरली जाणार नाहीं. माझ्या परवानगी वाचून जो व्यवहार होईल त्याची जबाबदारी माझ्यावर व माझ्या इस्टेटीवर नाहीं. आणि त्या बद्दल ज्याचा तोच जबाबदार राहून नफा नुकसानीस कारण होईल. कळावें तारीख १९ माहे जुलई सन १८९३ इसवी.

( सही )
चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी
राहणार नांदुरा खुर्द
दस्तुर खुद.

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं अंबाबाई जवजें भास्करराव देशमुख मौजे सातेगांव प्रगणें व तालुके दर्यापुर जिल्हा इलिचपूर ह्या सातेगांव सोडून पंचगव्हाण येथें राहण्यास गेल्या आहेत. बाई मजकूर यांचे नांवानीं असलेलीं शेतें व दुसरी स्थावर इस्टेट त्या कदाचित येथून गेल्या मुळें विकतील किंवा गहाण ठेवितील किंवा बक्षीस देतील असा रंग दिसतो कारितां जाहिरात देण्यांत येतें कीं, सदर्हू बाईकडेस असलेल्या इस्टेटीवर बाईचा अन्न वस्त्रा शिवाय कांहीं हक्क नाहीं त्या इस्टेटेचा खरा वारीस मी आहे व वारीस असल्या बद्दल बाई मजकूर याणी येक करारनामा योग्य रीतीनें लिहून दिला आहे जर कोणी ती जमीन कोणत्याही रीतीने घेतली असलतर ती जबाबदार राहील घेतली नसल्यास घेऊं नये. सर्वत्रास कळावें तारीख १६-७-९३.

दिनकराव बा। संपतराव आज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई तर्फे मुखत्यार भगवंतराव देशमुख दतूर खुद.

---

नोटीस.

अंबाबाई जवजे भास्करराव देशमुख मौजे सातेगांव प्रगणें अंजनगांव ता० दर्यापूर जि० इलिचपूर यांस—

नोटीस देणार दिनकरराव वा। संपतराव अज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई जवजे संपतराव मुकदम देशमुख मौजे सातेगांव प्रगणें अंजनगांव ता० दर्यापूर जि० इलिचपूर तर्फे मुखत्यार भगवंतराव तुह्मास नोटीस देतों ऐसाजे मौजे सातेगांव येथील जमीन व मौजे गांवडगांव येथील जमीन व मौजे उमरी ता० दर्यापूर जि० इलिचपूर येथील जमीन वर लिहिलेले तीन गांवचे जमीनीचे खातें आमचे समजुती वरून जे तुमचे नांवानें झाले तेव्हां पासून तुम्ही पंचगव्हाण ता. आकोट जि. अकोला येथें तुह्मी आपले भावाचे घरीं रहात आहा. सबब तुह्मास नोटीस देण्यांचे कारण कीं, तुह्मी आपले घर गांव सोडून तेथें रहाण्याचे कारण तुमचे कांहीएक दिसत नाहीं बरें असो. परंतु तुह्मी तेथें राहून वर लिहिलेली जमीनीचें खरीदीखत किंवा गहाणखत व बक्षीसपत्र आमचे संमती वाचून कोणासही करून द्याल तर तो रद्द असे. कारण कीं सदरील जमिनीवर कोणाचे कर्ज वगैरे नाहीं. तर वर लिहिलेली जमीन वडिलोपार्जित असून तिच्यावर व घर इस्टेटीवर हक्क आमचा आहे दुसऱ्याचा नाहीं. आणि वर लिहिलेलें जमिनीचे उत्पन्न हजार रु. साल आहे. तेव्हां तुह्मी त्यांतून अन्नवस्त्र कारितां पाहिजे तितका खर्च करून राहिलेली रक्कम सावकारी ठेवावी. असें करण्यास तुह्मी चुकूं नये. कारण कीं वर लिहिलेले जमिनीचे वारसदार आह्मी आहों. सदरील जमीन व घर इस्टेटीची तुह्मी अफरातफर करूं नये. केली तर तुमचे पासून जबाब घेतला जाईल. कारण वारसदार आह्मी आहो. सबब तुह्मास नोटीस दिली आहे. कळावें तारीख १६ माहे जुलई सन १८९३ इ०

( सही )
दिनकरराव बा। संपतराव आज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई जवजे संपतराव तर्फे मुकत्यार भगवंतराव
दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

च्या कळसास जाऊन पोहोंचले आहेत. दुर्दैवानें आमची स्थिति बरीच शोचनीय आहे व एकंदर गोष्टींचा सूक्ष्म रीतीनें विचार [illegible] असतां ह्या शतकांत सौख्याचा खरा अनुभव घेणाऱ्या राष्ट्रांची बरोबरी तर राहोच, परंतु थोडे तरी जवळ आह्मी कधीं काळीं जाऊं किंवा नाहीं अशी बळकट शंका उभी राहते. भावी स्थितीच्या अशा खेदकारक चित्राकडे पाहून कोणाच्या मनाला चरका बसणार नाहीं बरें? व आपलें पुढें काय होणार असे उद्वेगजनक उद्गार कितीकांच्या तरी मुखांतून निघत असतील! परंतु दुर्दैवानें ज्याला आपल्या भावी दुःखद स्थितीचें अनुमान करितां येतें आहे त्यापाशीं तिचें निवारण करण्याचें साधन नाहीं व ज्या कांहीं थोड्या बहुतांपाशीं तें साधन आहे त्यांस तिची कल्पनाही होत नाहीं. परंतु पुढचा, कल्पनेसही दुःसह, असा प्रकार टाळण्या करितां ही स्थिति बदलण्याचा प्रयत्न फारच लवकर झाला पाहिजे. सांपत भुकेल्याला अन्न नाहीं व अन्न जवळ असणारास भूक नाहीं. तेव्हां अन्न वाया गेल्यावर भूक लागून होणारा अनर्थ टाळण्याच्या तजविजेस आपणास लागलें पाहिजे ह्मणजे आमचे व्यापार धंदे व कलाकौशल्य आह्मास उदयास आणिले पाहिजे.

औद्योगिक सुधारणे कडे आमचें लक्ष लागून आज बरेच दिवस झाले, आणि हा विषय व्यापक असूनही तिकडे जसे प्रयत्न झाले पाहिजेत तसे अजून होत नाहींत. राजाची मदत, लोकांचें धाडस, पैशाची विपुलता व सतत उद्योग ह्यांच्या संमेलनानें ही सुधारणा व्हावयाची आहे. व ह्या गोष्टी एकत्र होणें फार कठीण आहे. कारण राजाला आमची सुधारणा व्हावी असें तोंडीं जरी सांगतां येत आहे तरी मदत करण्याला कोणच्याच बाजूनें सवड नाहीं. अथवा इच्छाही नाहीं. ह्याचें कारण अप्लफेटिंग, हिंदुस्थानची औद्योगिक स्थिती समाधानकारक होण्यात इंग्लंडचें नुकसान फार आहे. हें जों पर्यंत आमच्या सरकारच्या मनांत घोळत आहे तों पर्यंत त्यांची मदत मिळणें नाहीं. सरकार उदारपणा आह्मांस दाखविण्याचा प्रयत्न करितें तितकें तें उदार नाहीं हें आह्मांस अजून तरी कळूं नये इतकें आह्मी मठ्ठ नाहीं मात्र सरकार ज्या प्रमाणें आम्हास गोंजारण्याच्या खटपटींत असतें. त्याच प्रमाणें त्याच्या कृतीस आपण भुललों आहोंत असें दाखवून आपण त्यांचा पिच्छा न सोडण्याची खबरदारी ठेविली पाहिजे व त्यांच्या वचनांतील व कृतींतील फरक जितका उघडकीस येईल तितका जगापुढें आणला पाहिजे. व आमच्या सरकारच्या [illegible]जारी पाजारी बंधूकडून त्याच्या तोंडांत साखर गेली पाहिजे. असो तात्पर्य आपल्या राजाकडील मदतीवर आपणास फारसें अवलंबून रहातां येत नाहीं. ह्मणजे औद्योगिक सुधारणेस लागणाऱ्या मुख्य मदतीचा नाद आह्मास सोडून दिला पाहिजे. व ही मदत जशी मिळाली पाहिजे तशी न मिळाल्या कारणानेंच ह्या महत्वच्या सुधारणेची हेळसांड होत आहे. तरी पुण्यांतील औद्योगिकपरिषदेसारख्या संस्थापासून आपणास फार उपयोग होणार आहे व सरकारची फारशी मदत नसली तरी आमचें धाडस, आमच्या पैशाच्या पिशवीचें तोंड खुलें व सतत उद्योग ह्यांच्या एकीकरणानें पुष्कळ गोष्टी साध्य होणार आहेत. व आमच्या पुढील पिढ्यांना आमच्या इतिहासा कडे अवलोकन करून आह्मी आळसांत दिवस घालविले असें वाटून आमच्या कडे धिःकार पूर्वक पहाण्यास व आमच्या विषयीं तिरस्कार उत्पन्न होण्यास जागा रहाणार नाहीं.

आज ह्या विषयाकडे वळण्याचें कारण इतकेंच आहे कीं, आमच्या वऱ्हाडी मंडळीस जागें करावें व औद्योगिक दृष्ट्या सांप्रतची शिथिलता सोडून द्यावयास सांगून त्यांच्या कर्तव्यकर्माकडे काना डोळा न करण्या विषयीं त्यांस विनंती करावी. प्रत्येक कामांत मुंबई इलाख्याचें अनुकरण करण्याचा आमचा सर्वसाधारण नियम आहे व कित्येक वेळां अस्सलाची नक्कल विशेष बहारीनें उठवून देण्यांतही आली आहे. असें असून व झालेल्या व होत असणाऱ्या सर्व सुधारणांचें अनुकरण त्या इलाख्याचें असून पुण्यास होत असलेल्या औद्योगिक चळवळींशीं आह्मी कांहींच संबंध ठेवूं नये ही मोठी खेदकारक गोष्ट आहे. आमचा प्रांत श्रीमंत आहे. लोक अज्ञान पण आज्ञाधारक आहेत तेव्हां कांहीं पुढारी मंडळींनीं त्यांस ह्या विषयाची फोड करून दाखविली असतां अकल्याण होणार नाहीं. पुण्यांतील औद्योगिक परिषदेस स्थापन होऊन दोन वर्षे झालीं तरी ह्या प्रांतांतून एकही मुखत्यार तिकडे गेला नाहीं! ह्या परिषदेच्या दर वर्षींच्या वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या हकीकती वरून हीचें महत्व आमच्या लोकांस कळून यावयास पाहिजे होतें. यंदा ही परिषद् येत्या सप्टेंबर महिन्यांत भरणार आहे. तेव्हां आमची आमच्या पुढारी लोकांस अशी सूचना आहे कीं त्यांनीं यंदा एक दोन मुखत्यार पुण्यास पाठविण्याची व्यवस्था करावी. व पुढें ह्यापेक्षां कांहीं जास्ती करतां येईल किंवा नाहीं याचाही विचार प्रसंगानुसार करावा. सामाजिक सभा किंवा राष्ट्रीय सभा ह्यांच्या वार्षिक समारंभास अजून वेळ आहे. तेव्हां आमच्या वऱ्हाडांतील मुंबई व पुणेंकरांनां ( अर्थात उमरावती व अकोलें करांना ) ह्या विषया कडे लक्ष पुरविण्यास सवड आहे.

दैव योगानें दुसऱ्या कोणत्या ही प्रांतास जी गोष्ट अलभ्य ती— ह्मणजे आमच्या विद्याखात्याचे अधिपती हिंदु आहेत— आह्मास अनायासें मिळालेली आहे. तेव्हां ह्या गोष्टी पासून आपणास मोठे फायदे होण्याची आशा आहे. आह्मी वर सांगितलेल्या परिषदेंत वाचिलेले नऊ निबंध पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाले आहेत. त्याच्या प्रति आमच्या प्रिय डायरेक्टर साहेबांनीं शाळेच्या पुस्तकालया करितां व बक्षिसा करितां उपयोगांत आणाव्या अशी आमची सूचना आहे. आमची खरी स्थिति जाणणारे व आमच्या गरजा काय आहेत हें ज्यांस पूर्ण अवगत आहे असे सरकारी अधिकारी राव बहादूरच आहेत तेव्हां त्यांच्या हातून ह्या उपयुक्त परिषदेस हस्तें परहस्तें मदत करण्याचा सुयोग ते वाया जाऊं देणार नाहींत अशी आमची खात्री आहे. रा. ब. जठार यांचा नेहमींचें आहे तें कायम ठेवून विशेष चळवळ न करितां आपल्या जबाबदारीवर असलेलें खातें सुयंत्रतेनें चालविण्याकडे कल असतो व सांप्रतच्या मनूकडे लक्ष दिलें असता हें त्यांचें करणें बाजवीही असेल परंतु दांडेकर, जठार असलीं नांवें राव बहादुरांच्या पश्चात् त्या अधिकारावर विराजमान झालेलीं पहाण्याचा प्रसंग येणें दुर्लभ (!) हें राव बहादूर जाणूनही असतील. तेव्हां लोकांची स्थिति लक्षांत आणून ह्या खात्यांत सुधारणा करण्या सारखें कांहीं असल्यास तें करावें तसेंच वर सांगितलेल्या पुस्तकांत 'व्यापारा संबंधीं शिक्षण' हा निबंध त्यांनीं वाचावा अशी आह्मी त्यांस शिफारस करितों व असें शिक्षण ( प्राथमिक किंवा माध्यमिक होईना) इकडे देण्या जोगी कांहीं तरी तजवीज करून ठेवावी. मे. कमिशनर साहेब व मे. रेसिडेंट साहेब रावबहादुरांचा शब्द क्वचित मोडणार नाहींत. रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार ह्यांचा एका खात्याचे अधिकारी या नात्यानें आमचा संबंध फार वर्षे टिकणारा नसल्या कारणानें त्यांस ही सूचना आग्रह पूर्वक करण्याचे आह्मी साहस केलें आहे त्याबद्दल आमचे वाचक व साहेब बहादूर आह्मांस क्षमा करतीलच. लोकांकडून ह्याबद्दल उचल झाली पाहिजे व आसाहेब बहादूर आपल्या नेहमींच्या व्यवस्थेंत बदल करण्याची तसदी घेतील तर लोकांस उत्तेजन येऊन ते या कामास आनंदानें लागतील.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या वषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ११ प्रमाणें.

दि. कि. क्ला. १९ मी. नंबर ४

१८९३

स्पे. असि. कामिशनर साहेब बहादूर जि. अकोला यांचे कोर्टांत.

नांव गुल्लुसा

बापाचें नांव आत्मासा कलाल

राहणार— उगवें तालुके अकोला

जिल्हे— अकोला यांस मयत.

शंकरसा बापाचें नांव आत्मासा रहाणार उगवें तालुके अकोला जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं ता. २९ माहे जुलई सन १८९३ इ० रोजीं सदर्हू अर्जाचा चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. १४ माहे जुलई सन १८९३ इ.

V. N. Dandeker

शिक्का. सिव्हिल जडज्य.

---

नोटीस

राजश्री यावेराजीत राजमान्ये राजश्री यशवंतराव वल्लद रामजी हाडे राहणार राहेर तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचें माझें लग्न जाल्यास सुमारें १८ वर्षें झालीं त्या मुदतींत तुह्मी मला मुळींच नेलें नाहीं व मी वयांत आल्यास सुमारें ६ वर्षें झालीं ह्या मुदतींत सुद्धां नेलें नाहीं. व सुमारें ९ वर्षें पूर्वीं मी लहान असल्यामुळें तुह्मी दुसरी बायको केली पुढें ३ वर्षांनीं तुह्मास श्रम झाल्यामुळें तुमचे दुसरे बायकोनें तुमचे समक्ष दुसरा नवरा केला. परंतु त्या बद्दल तुह्मास कांहीं वाटलें नाहीं. तथापि मला आशा होती कीं तुह्मी कांहीं दिवसांनीं तरी सुधाराल परंतु तें व्यर्थ झालें तुह्मास श्रम झाल्याचें सुमारें ६ वर्षें ऐकते, व त्याचें प्रत्यंतर पाहण्या करितां मी सुमारे १५ दिवसां पूर्वीं आपण होऊन तुमचे घरीं आले व सुमारें दोन अडीच महीनें राहिले. त्या मुदतींत आपण सर्व मनुष्या देखत मला बहीण सुद्धां ह्मटलें. तें असो परंतु स्त्री पुरुषाचे सृष्टीक्रमाचा व्यापार आपणास कांहींच सुचला नाहीं. ह्या वरून माझी पक्की खात्री झाली की, आपण खरोखर भ्रमिष्ट असून आपण पुरुषत्वांतूनही गेले आहां करितां विनंती आज १८ वर्षें मी बापाचे घरी दरसाल ३६ रुपये कर्ज करून खात आहे. तें एकंदर कर्ज ६४८ रुपये ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आणून देऊन व चांगले असल्याबद्दल माझी खात्री न केल्यास होच फारकती असे समजून व वरील मुदती नंतर दुसरा घरठाव करीन. मग तुमचा लग्नसंबंधी हक्क मजवर राहिला नाही असें समजावें. ता० १ जलई सन १८९३ इ०

सही-

आसरी मर्द यशवंता हाडे हल्लीं राहणार पळसखेडे भट तालुका चिखली जिल्हा बुलढाणें निशाणी खुद्द हातची बांगडी असे.

---

## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें की, नवीपार ताजना पेठ येथील मीरअली कादरभाई यांची भाजीबाजारांतील लाल कागदीवाले दुकानची लाईन आह्मी रु. ३००० हजारास विकत घेतली त्यापैकी रु. २२०० नगदी बयाना पेटे देऊन रु. ८०० राहिलेले कागद रजिस्टर झाल्यावर देणें त्याजबद्दल पावती दिली आहे तरी आमचे समती शिवाय जर कोणी हे मकान विकत घेईल अगर गहाण ठेवील वगैरे तर त्याजबद्दलचे नफा नुकसानाचे जबाबदार सदरहू दुकानची लाईन अथवा आह्मी नाही. ज्याचा तो जबाबदार आहे म्हणून दिली जाहिरात ता० १५।७।९३

सही

अबदुल हुसेन गुलाम हुसेन तर्फे मुखत्यार सिताराम भिकाजी द. खु.

---

☞ पुढें पुरवणी पहा.

कलेक्टर व डिस्ट्रिक्ट माजिस्त्रेट यांच्यावर ६०००० रुपयांचा दावा— बंगाल्यांतील मैमानाशींग जिल्ह्याचे कलेक्टर व डि० माजिस्ट्रेट मि. फिलिप्स यांनीं चुरशीनें व द्वेषानें आपल्यावर व्यर्थ फौजदारी खटला करून आपली अबरु घेतली, तिच्या नुकसानीं बदल ५०००० रुपयांचा व आपल्या वाड्याची भिंत पाडून तींतून नेला याच्या नुकसानीं बदल १०००० रुपयांचा दावा मैमानशींगचे राजे सुरजाकांत यांनीं मैमानसींग सब जज्ज कोर्टांत दावा लाविला आहे. आजपर्यंत असें लहरी माजिस्ट्रेट उदयास आले नव्हते व असुनुकसानी बदल त्यांच्यावर दावाही झाला नव्हता ह्मणून ह्या दाव्याच्यां निकालाकडे पुष्कळ लोकांचें लक्ष लागून राहील यांत संशय नाहीं.

एका गोऱ्या गार्डास चोरीबदल शिक्षा— जी. आय. पी. रेल्वेवरचा गार्ड मि. हुशमन यानें ब्रेकव्ह्यानमध्यें असलेली एक रोकडीची बंगी चोरली. तींत ११०० रुपये होते. सदर गार्डास मनमाड येथें रेल्वे पोलिस इन्स्पेक्टर मि. गायडर यांनीं पकडलें, तेव्हां त्याच्या जवळ १०९० रुपये रोख मिळालें. तेव्हां त्यास मि. हेवर्ड या माजिस्त्रेटापुढें उभें केलें. त्यावर अपराधाची शाबिती झाल्यामुळें मि. हेवर्ड यांनीं त्यास तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली.

साठ लक्ष रुपये किंमतीची चांदी भरलेलें एक नहाज लौकरच कलत्यास येणार आहे अशी बातमी समजते. शु. सू.

युनायटेड स्टेट्समध्यें एकानें एक इस्पितळ तयार केलें असून तो तें सगळीकडे दाखवीत हिंडत आहे. या इस्पितळांत वीस रोगी राहण्याची तजवीज आहे. जामिनी, भिंती तक्तपोशीं, दरवाजे सर्व कांहीं अत्यंत दाबानें कठीण केलेल्या कागदाचे केलेले आहे. खिडक्या मात्र तारांच्या जाळ्यांच्या आहेत. व त्यावर कांहीं औषध लावले आहे. प्रत्येक भागावर आंकडे घातलेले असतात. सगळी इमारत जोडण्याला किंवा उतण्याला एक दोन तास लागतात. तापानें किंवा दुसऱ्या कोणच्या सांथीच्या रोगानें ग्रासलेल्या प्रांतांत अगर शहरांत जाऊन तें इस्पितळ उभारावें आणि गरिबागुरिबांस औषध देऊन रोगमुक्त करावें. क.

निजाम सारकारांनींही आपली नाणें पाडण्याची टाकसाळ बंद केली. याच प्रमाणें बहुतेक संस्थानिक करणार ह्मणतात.

काठेवाडांतील एजन्सीकोर्टात ज्यांना यापुढें वकिलीचें काम करावयाचें असेल व पक्षकारांच्या अर्ज्या वगैरे लिहून द्यावयाच्या असतील, त्यांणीं दर वर्षास ३०।३० रुपये फी भरून पोलिटीकल एजंट यांच्या सहीचें लायसेन्स घेतलें पाहिजे, असा सक्त हुकूम पोलिटिकल एजंटानीं सोडल्यामुळें काम करीत असलेले सर्व वकील निरुपयोगी झाले व त्यामुळें कोर्टें बंद राहूं लागली आहेत असें समजतें.

पोलिसशाळा— पोलिसांतील इन्स्पेक्टर व चीफ कान्स्टेबल लोकांस कायदे कानूवे व गुन्हे काढण्याचे शिक्षण देण्यासाठीं अलाहाबादेस तारीख १ मिनहूपासून एक शाळा स्थापन होणार आहे. वकील लेके कायद्याच्या शकला काढून पोलिसांस फसवितात सबब तसें त्यांना फसतां येऊं नये ह्मणून ही शाळा सरकारानें मुद्दाम काढली आहे, असें ह्मणतात.

डोक्यांचे केस गळून जाऊं लागले तर त्यांस मिठाच्या पाण्यानें वारंवार भिजवावें.

मुंबईस एक धुण्याचें यंत्र आलें असून त्याच्या योगानें इस्तरी करतांना कपडा जळण्याची जी भिती असते ती बिलकुल नाहीं असें ह्मणतात.

जर्मनीत असा एक नवीन नियम निघत आहे कीं, २० वर्षांच्या आंत स्त्रियांची व २५ वर्षांच्या आंत पुरुषांची लग्नेच होऊं नयेत! त्याचप्रमाणें मोठ्या वयाच्या पुरुषांशीं लग्न करूं नये; व ५० वर्षांच्या वरच्या पुरुषांशीं ३० वर्षांच्या आंतील स्त्रियांनीं लग्न करूं नये.

हल्लींच्या नवीन खिलातच्या खानाचे रक्षण करण्याकरितां मुंबईच्या ६ व्या रिसाल्याचे तीन चतुर्थांश लोक आमच्या सरकाराकडून पाठविण्यांत आले आहेत.

कानपूर येथें ६ लक्ष रुपये भांडवलानें एक साखरेचा कारखाना निघत आहे. क. त.

निजामसरकारचा कारभार पुष्कळ दिवस सर सालरंजग सारख्या हुषार दिवाणाच्या हातीं होता तरी त्याच्या कारकीर्दींत जमा खर्चाची रिती पहिलीच होती. जमा खर्चाच्या खर्चांची पद्धत त्यांस माहीत नव्हती आणि यामुळें कोणत्या खात्याची जमा किती व खर्च किती हें कळत नव्हतें परंतु ती पद्धत हल्लीं सुधारत चालली आहे. सध्याचे जमाखर्चाचे प्रधान कोणी राजा मुरलीधर मनोहर नांवाचे गृहस्थ आहे, तरी व्हावी तशी सुधारणा झाली नसल्यामुळें इंग्रजांच्या जमाखर्चानें तयार झालेले लोक तिकडे गेले आहेत. समळ्या हिशेबाच्या आणि जमाखर्चाच्या रिती इकडच्या प्रमाणें बसवीत आहेत. मि. लोगन हे मुख्य जमा खर्चाचे प्रधान होणार असें समजतें.

रण प्रकाशिका.... समरंगणामध्यें रात्रींच्या वेळेस शत्रूची हालचाल पूर्ण रितीनें पहाण्यास सांपडावी या साठीं इतालीच्या तोफखान्यावरील एका अंमलदारानें एक विलक्षण बत्तीची योजना केली आहे. तोफ उडविण्या बरोबर एक लक्ष मेणबत्त्यांचे प्रकाशा एवढा तिचा प्रकाश पडतो!

वाद्य वाजविणारा वानर— पारिस मध्यें एक वानर आहे, त्यास व्हाय ओलिन नामक तंतु वाद्य सुंदर रितीनें वाजवितां येतें.

दांत बळकट होण्यास उपाय— चिंचोके मूठभर, बदामाची साल मूठभर, मीठ मोठें मूठभर, आणि निंबे मूठ भर यांच्या राखेनें दांत घासावें ह्मणजे बळकट होतात.

कायदे कौन्सिलची सभा या महिन्याचे अखेरीस पुण्यास भरणार आहे.

अठ्ठेचाळीस प्रकारचे नेत्ररोग आहेत असा शोध हल्लीं लागला आहे. धारवा.

मोठीं फुलें— सुमात्रा बेटामध्यें एक प्रकारचीं झाडें आहेत त्यावर एवढीं मोठीं फुलें येतात कीं, प्रत्येक फुलाचा घेर अदमासें ९ फूट असतो व फुलाचे मध्यभागीं जो खळगा असतो तो तीन फूट घेराचा असून त्यांत पक्के सहाशेर पाणी मावतें. या फुलासंबंधीं एक चमत्कार असा आहे कीं, तीं ज्या झाडावर येतात, त्या झाडास पानें बिलकूल नसतात.

सरहद्दीच्या कामा करितां निजामानें जी फौज दिली आहे तिला तयार करण्या करतां एक लष्करी साहेब नेमला असून ती चांगली तयार होत चालली आहे.

काश्मीरच्या फौजे पैकीं ३०० लोक हुल्ला चिला येथें आहेत.

हिंदुस्थानच्या अफूच्या व्यापाराच्या बंदीबद्दल विचार करून रपोट करण्या करितां एक रायल कमिशन नेमण्याचा पार्लमेंटांत ठराव झाला.

विलायतच्या एका पत्राचा केरोचा बातमीदार सांगतों कीं, इजिप्त देशांत जी इंग्रजी फौज आहे त्या बदल तुह्मी आपली टर्की फौज पाठवा आणि लार्ड क्रायर ह्मणून जो इजिप्त देशांत इंग्रजांचा एक बडा कामदार आहे त्या आमच्या देशांतून काढण्याची तजवीज करा अशी इजिप्तच्या केदीवानें टर्कीच्या सुलतानास विनंती केली आहे असे वारची तार सांगते.

लार्ड नार्थब्रुक यांनीं पार्लमेन्टच्या लार्डी सभेंत अशी एक सूचना आणली कीं, १८७४....७६ ची हिंदुस्थान सरकारची पत्रें हजर करा, आणि हिंदुस्थानचें जें नुकसान होत आहे तें न होण्याची लार्ड किम्बर्ले हे तजवीज करतील अशी आशा आहे, नाहींतर हिंदुस्थानानें आपलें नुकसान भरून काढण्याची एकोप्यानें तजवीज करावी अशी वेळ येऊन पोंचली आहे असें समजावें.

त्यांच्या या तकरारीस जबाब देतांना लार्ड किम्बर्ले ह्मणाले कीं, हिंदुस्थाना बाहेरच्या कित्येक लढायांचा खर्च हिंदुस्थानावर घातला हा अन्याय झाला आहे, पण इजिप्तच्या कामानें हिंदुस्थानची योग्यता फार वाढली आहे. आणि त्या करतां सरकार त्या बद्दल बहुतकरून विचार करील.

या प्रश्नाचा चांगला विचार होणें अवश्य आहे असें लार्ड राबर्ट ह्मणाले.

शेवटीं लार्ड नार्थब्रुक यांची सूचना कबूल झाली.

पारीस मधील दंगा बव्हावत चालला असून तो अजून चालूच आहे. विद्यार्थी व पोलिस यांच्यांत हा दंगा प्रथम सुरू झाला पण आतां विद्यार्थी एकीकडेच राहून तेथील प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या विरुद्ध असणारे जे तेथील राजपक्षाचे लोक तेंच आतां त्रास देण्यास प्रवर्तक झालें आहेत. दंगेखोरांचा जागाव वाढत असून ते अनेक प्रकारचे उपद्रव देत आहेत. कित्येक लोक ठार ही झालें. ठा अ.

अमेरिकेंत २२ हजार वर्तमान पत्रें निघतात.

पारिस मध्यें विद्यार्थ्यांनीं मोठा दंगा चालविला आहे.

बडोद्यास दोन स्त्रिया कंपॉझीटर झाल्या.

एक हजार फूट लांबी असणारा एक सर्प आहे त्याचें नांव रोरकुवल.

मनुष्यास उचकी लागली तर त्यास उताणें निजवून नाकात सुट गुळाचे पाण्यांत उगाळून घालावा ह्मणजे बंद होते.

दाण्याविरहित मकेच्या कणसाची राखुडी अधेला भार पाण्यांतून घेतली असतां औंकारी राहते. न्या. सिं.

पंजाबच्या २१ साव्या पलटणींतील एका शिपायानें त्याच पलटणींतील एक हवलदार व एक नाइक यांस ३० जून रोजीं कोहात येथें ठार केलें. कारण अजून बाहेर आलें नाहीं.

ठा. अ.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें सोनाजी वलद शिवराम ढगे राहणार चिंचोली तालुके खामगांव हे असें जाहीर करितात कीं मजला सन १८९२ सप्टंबर तारीख १६ रोजीं तीर्थरुप गंगाई मर्द शिवराम ढगे यांणीं आमच्या धर्माप्रमाणें व शास्त्राप्रमाणें दत्तक घेतलें आहे. व स्थावर जंगम इस्टेटीचा मजला मालक करून ठेविलें. परंतु अलीकडे तीर्थरुप मातोश्री गंगाई यास चार दुसरे लोकांनीं मजबद्दल गैरवाका समजूत देऊन स्थावर व जंगम इस्टेट मजला कांहीं राहूं नये अशा बद्दल गैर कायदा व्यवस्था चालविली आहे. तर सर्वत्रांस असें जाहीर करितों कीं माझ्या संमती शिवाय स्थावर व जंगम इस्टेट कोणीं कर्ज देऊन घेईल अगर गहाण ठेवील अगर खरेदी करून घेईल अगर बक्षिस वगैरे करून घेईल तर त्या बद्दल कोणचेही प्रकारें मी व स्थावर जंगम इस्टेट जबाबदार नाहीं. ती इस्टेट खालीं लिहिले प्रमाणें:—

स्थावर इस्टेट

सवर्ण शिवेचे शेत, सारा रुपये १९ चं.

बडाचा मळा सारा रुपये ६॥ चा.

तीवसाडी नंबर दोन एकाचा सारा रुपये १८ व दुसऱ्याचा रुपये १८.

ठिका शेत सारा रुपये ४॥· यांतील चवथा हिस्सा.

घर धाब्याचें नऊ खांबाचें.

कोठा दोन धारणी १२ खांबी

जंगम इस्टेट.

बैल जोडी एक किंमत रुपये १९०

गाड्या दोन किंमत रुपये ७०

झैस रुपये ६० ची.

दागिने सोन्याचांदीचे किंमत रुपये २००

भांडी वगैरे किंमत रुपये ५० चीं.

शेतकीची हत्यारें रुपये १० ची.

येणें प्रमाणें सदरील इस्टेट कोणी सदरी लिहिलें प्रमाणें घेईल तर त्याजबदलचा जबाबदार मी व इस्टेट नाहीं. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख ६ माहे जुलई सन १८९३ इसवी.

सही

सहीची निशाणी (वखर) सोनाजी
वलद शिवराम ढगे राहणार
चिंचोली याचे हातची असे.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके याचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

The Berar Samachar
MONDAY JULY, 17, 1893

## THE PROPOSED SETTLEMENT IN BERAR.

The first instalment of proposals as regards the new assessment of land in the three Talukas of Malkapur, Jalgao and Khamgao is already before the Local Government; and it will be the fore-runner of all other proposals with respect to the rest of the province. The acceptance or otherwise of the first proposal of Mr. Francis the settlement Officer of the province will also decide whether his future proposals will be welcome or not: The problem is of vital importance to the province and any short comings or defects left unnoticed in due time will multiply in the end the permanent and disastrous results of a hasty, uncalled—for and unjustifiable enhancement in the old rates of assessment.

Upon the decisive measures that the Government will adopt will depend the material advancement of Berar and it is to be hoped that no efforts will be spared to consult the public on such a subject where the best and dearest interests of the people are at stake. We request the Commissioner to make the question as largely talked of as possible and with that view we lay down a few suggestions here before the people at large.

A practical beginning is no doubt made at the last meeting of the Berar Sarvajanik Sabha in so far as it invites a fair and impartial discussion on the subject and notes down the arguments for and against the revision of the current assessments. We have not got the resolution of the Sabha before us but people express perfect satisfaction at the fact that the members of the Sabha could record an unanimous vote in adopting the scholarly and well thought—out minute of Mr. Rangnath Narsinha Mudholkar on the subject. But many persons are in ignorance as to what is going on. Colonel Mackenzie has got a nice and singular tact of courting public opinion on any question which he deems of general interest and he will be acting in full harmony with the views of the Resident if he circulate freely and widely the proposal of Mr. Francis. We may mention here a sad commission that the presses in Berar have not got the full report of the Settlement Officer. Some of the local papers have devoted columns after columns to bring the subject within the reach of the general reader and that their services are highly valued but we are sure that they have not learnt information at the direct channels of communication. The complete publication of Mr. Francis' paper is not the only thing we want most. We have come to know that some other officers have also tendered in their opinions on the subject of revision and some of them run counter to the suggestions of Mr. Francis. It is these papers that ought to be within the access of the people. The proposal of the Survey Officer betrays a spirit of advocacy rather than a whole and comprehensive view of the question from the stand—point of a judge. We are confident that the capable, judicious, and sympathetic men at the head of the Government will not consult the wishes of the people to lay down a bad policy pregnant with general discontent and total ruin of agriculture as a profession.

In the face of the revised rates of assessment we would advice a return to the old practice of collecting Governmental due *in specie* from the produce of land. The settlement of thirty years back is itself very heavy and burden—some. From *a priori* ground the Settlement looked like a blessing to the people but proved in the stern realities of experience an odius tax on agriculture. The present proposal makes matters worse and culminates in over—riding the just and right claims of the people as regards the fruit of their labour, capital, and superintendence. The new rates usurp even the small pittance of a competency of income that people could lay by for the demands of decrepit old age and the minor wards in the family. We are collecting old accounts to point out that out of the yield of the land 45 per cent goes to the public coffers. If Government were to lease out survey fields from year to year with a claim for half of the actual produce of them we make bold to assert that the Government would find it hard to realize the hondsome revenue it has received till now. One argument that is generally quoted to confirm the reasonableness of the Government assessment is most fallacious. If people cannot afford to pay at the assessed rate why do they not return the fields to Government? Herein lies their grand open truth that the assessment is fair, moderate and adequate. The fallacy turns upon the tendency and habits of the people. The general masses having been trained in the only profession of agriculture they do not know what else to do if not to cultivate land. Whether they gain fair livelihood or are starved they are driven to the brink of living upon agriculture alone. This is the reason why they stick to agriculture even for miserly emoluments. We are certain that if new industries were to open, agriculture will be neglected and people will be better off for some years at least.

(to be continued)

---

Lord Vernon has contributed an able article to the Nineteenth Century on 'how to attract capital to the land'. He points out that Government ought to afford every opportunity to the owners of land to apply capital to the development of land and that is only possible when no new attempts are made to make agriculture an unprofitable business. His observations are general and the following paras culled from the essay will teach an important lesson on the subject:—

"Agriculture has to be considered as a branch of industry, and not as a precious relic that trades on the traditions of the past. We have to appreciate in these practical days that the family of an impecunious landowner may claim to have owned certain lands since England was peopled by barbarians, but such a family is soon forgotten if succeeded by that of a wealthy man who attends to the wants of others in an open-handed and liberal spirit. Present customs favour agriculture when a proprietor is rich and liberal. The owner is content with very little interest for his money, the farmer gets every possible inducement to make the most of his land, and the labourer benefits by the affluence of both. The houses in which the tenants live are watertight, and do not breed pulmonary diseases; the drains and water supply are in good order and do not invite typhoid and other fevers. We see the other side of the picture if a landlord is in pecuniary difficulties, and it is such a case that suggests the necessity for some modification in the existng customs.

I would suggest to those who propose considering agriculture as simply a branch of business that it might be unwise to look at it from a purely utilitarian point of view. Our one aim should be to disturb as little as possible the present condition of things, to endeavour to attract as much capital to the land as possible, and to get rid of those owners who are quite unable to effect the repairs and improvements that a landed property requires."

---

It is very amusing to find that the Government of India is active and energetic to appoint commissions after commissions to inquire into the intoxicating drugs that are *native* in the true sense of the word. We have reproduced below a summary of the work entrusted to the Hemp-Commission as detailed in an English paper but we would however urge the Government to stop for all practical purposes the abundant import of European wines. These drinks have done more harm to the health of the nation in addition to heavy drains upon the people's purse as well. We have often ridiculed the idea of abolishing the opium trade on the same principle upon which we take objections to such needless commissions as the present one under notice:—

"Two points are mentioned for special investigation:—(1)The danger lest prohibition or stringent restrictive measures may give rise to serious discontent, and be resented by the people as an unjustifiable interference with the long-established social customs; (2) whether, if the use of hempen drugs is prohibited, those who would otherwise use them would be driven to have recourse to alcohol or other stimulants or narcotics still more deleterious. Regarding the first point it is mentioned that the use of hemp drugs is common among fakirs and ascetics, who are held in veneration by large classes of the population. In Bengal it has been stated that an infusion of the leaves of the plant is offered to every guest and member of a family on the last day of the Durga Puja. It has no ill effects, and its use is not considered reprehensible in any way. It is believed that in some parts of the county bhang is in a special degree the poor men's narcotic, and the possible unpopularity of the measure which would deprive the very poorest of the population of the use of a narcotic to which they have always been accustomed, should be overlooked. Evidence is to be taken from among the classes using the drug, and the Commission are to state whether in their opinion, prohibitory measures would give rise to political discontent. They are further to set forth what reforms and imvorpements they may think necessary for controlling the cultivation, manufacture, sale, and taxation of the drug: and if they pronounce in favour of absolute prohibition it will be their duty to state the regulations which should be adopted for the purpose. Local Governments have been instructed to render every assistance, and to make any suggestions which localknowledge and experience may suggest."

---

## वऱ्हाड.

हवामान—गेल्या आठवडाभर येथें पाऊस नाहीं तरी आसपास थोडा पडल्याचें ऐकतों. रोग राई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

गेल्या ९ वे तारखेस वऱ्हाड सार्वजनिक सभेनें खामगांव, जळगांव व मलकापूर या तीन तालुक्या करितां सुचविलेल्या नवीन धाऱ्या विषयीं आपला अभिप्राय नमूद केला. सर्व कागदपत्र तयार करण्याचें श्रेय रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस आहे.

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या आज्ञेनें तयार झालेलीं खालील पुस्तकें आह्माकडे अभिप्रायासाठीं आलीं आहेत त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों:—

(१) कार्येज, (२) इराण, (३) तुर्कस्थान (४) विचाररत्नाकर, (५) मार्कस ऑरेलिअस बादशहाचा बोध वचनें.

शेट जहानगीर हारमसजी मोडी यांनीं वडनेऱ्यास १५००० रु. खर्च करून एक दवाखाना बांधला आणि गेल्या ८ वे तारखेस मे. कमिशनर साहेब यांच्या हातून लोकोपयोगार्थ ह्या भक्कम इमारतीचा धर्मादाय केला. या अत्यंत देणगी बद्दल वडनेऱ्याचे रुग्ण, त्रस्त, व पिडीत लोक शेट जहानगीर हारमसजी यांचें नांव कृतज्ञतेनें चिरकाळ स्मरतील आणि त्यांस व त्यांच्या घराण्यास दुवा देतील हें उघड आहे. कर्नल मेकंझी साहेबांनीं म्हटल्या प्रमाणें शेट जहानगीरजी हे या सत्कृत्याच्या योगें स्व पुण्यशील, उदारचरित व कल्याणकारी जेम शेटजी जीजीभाई, रेडीमनी, वाडिया, जहानगीर कावसजी, कामास, पेटीट, दादीशेट इत्यादि विख्यात पार्शी मंडळीच्या नामावळीत जाऊन बसले हें त्यांच्या कुळास ज्ञाति बांधवास मोठें भूषणास्पद आहे.

रा. रा. गिरराव रामचंद्र तहशीलदार यांची मलकापुरास झालेली नेमणूक फिरवून त्यांस चांदूरास नेमल्या प्रमाणें ते तिकडे रुजूं झाले. आणि चांदूरचे तहशीलदार रा. रा. गोविंद गंगाधर दामले यांस मलकापुरास बदललें.

गेल्या १२ तारखेस सकाळीं उमरावतीस एका भंग्यानें आपल्या बापकोस भर रस्त्यावर चाकूनें वार करून करून ठार मारलें. हें खरोखरच नवल !

---

नोटीस

तीर्थरूप गंगाभागिरथी राधाबाई मर्हुम

कस्तूरचंद मारवाडी राहणार नांदुरा खुर्द लुका मलकापूर यांसः—.

साष्टांग नमस्कार विज्ञापना कीं, आपण तारीख १० माहे जुलई १८९३ इसवीच्या 'वऱ्हाडसमाचार' वर्तमान पत्रांत जाहिरीत दिली ती निराधार असून सर्वथैव खोटी आहे. त्या जाहिरातींत मला 'गुमास्ता' ठरवून मला गुमास्तेपणा वरून रद्द केलें आहे हें सर्व खोटें आहे. मी आपला शास्त्राधारें दत्तक घेतलेला पुत्र आहे आणि सहा महिन्यापूर्वी दत्तविधान झालें तेव्हां तें कस्तूरचंद यांच्या मरतवेळच्या आज्ञेवरून झालें. त्या आज्ञेला व शास्त्रोक्त दत्तविधानाला हरताळ लावून आमच्या नांवास बट्टा आणण्याचा तुमचा विचार दिसतो. गेल्या पांच सहा महिन्याची वहिवाट व सरकारी व दुकानच्या कागदोपत्री चालत आलेलें माझें नांव हीं तुमच्या उलट साक्ष देतील. ह्मणून मला ही जाहिर खबर देण्याचें भाग आहे व मला कायदेशीर रितीनें माझें हक्काचे व मिनर्गाचें संरक्षण केलें पाहिजे. आपल्या वचनांत राहणें माझा पुत्रधर्म आहे आणि तो मी पाळण्यास तयार आहे पण आपण मातृस्नेहानें वागवून संगोपन केलें तरच आपला अधिकार चालणार आहे.

( १ ) तुह्मी मनला दत्तक घेतले दिवसापासून तुमचा व माझा विचार चार पांच महिने एक राहिला व दुकानचें काम एकमतानें चाललें. तुह्मी माझे चुलत्याचे घरा आपेल असावरील दागिने ठेविले होते ते दागिनें तुह्मी घरीं आणिले. आणि त्या दिवशीं मला जतावून बोलला कीं, तूं गळ्यांतील कंठी काढून ठेव आणि ती कंठी काढून ठेवण्यापूर्वीच तिसरे दिवशीं माझे गळ्यांतून रात्रीं कोणी झोंपेंतून नेली हें मला कळत आहे. कंठी कशी गेली यानबद्दल माझे अनेक कुतर्क चालतात. पण त्याचो रुध्यां जरूरी नाहीं. नुसती एक कंठी बेमालूम रितीनें गमावल्या दिवसापासून मजला घरांत फार वाईठ साईट व उणें दुणें बोलूं लागला व खाण्या पिण्यांत भेदाभेद करूं लागला व त्याचा विक्षेप वांकडेपणावर गेला आणि शेवटी आपल्या जाचानें त्रासल्या मुळें मी रागांत पूर्वीच्या घरी आलों. हल्ली तेथेंच आहे व मला तेथून दत्तक घराण्यांत नेऊन दुकानदारी माझ्याकडे चालूं ठेवण्याचा तुमचा इरादा नाहीं. इतकेंच नव्हे तर माझी सर्व इस्टेट घालविण्याचे उपाय आपण चालविले आहेत.

( २ ) भिकमचंद रतिराम हा वहिवाटदार नाहीं आणि त्याला वहिवाटीचा अधिकार मीं दिला नाही. जर त्यानें कारकुनांच्या कामाहून अधिक काम केलें तर मी त्याजवर फिर्याद करून नुकसान भरून घेईन.

( ३ ) माझ्या नांवचे दस्तैवज व सरकारी कागदोपत्री दाखल आहेत व माझ्या नांवानें जुन्या असाम्या करून घ्यावयाच्या आहेत तर त्याज विरुद्ध आपण कांही काम करूं नये. दस्तैवज फाडून देणें व असाम्या वसूल करणें व दुकानदारी चालविणें माझें काम आहे. आपल्या इतमामा प्रमाणें आपणास अन्नवस्त्र देण्यास व आपण एकत्र राहिलों तर आपल्या सल्यानें कामकाम चालविण्यास मी एका पायावर तयार आहे. पण आपण कांहीं गैरकायदा काम केल्यास मी तें रद्द समजेन व त्याजबद्दलची जबाबदारी माझ्यावर व माझ्या सर्व स्थावर जंगम इस्टेटीवर नाहीं. आणि असें असून जो कोणी तुह्मा अनअधिकारी बायको माणसाशी व्यवहार करील तो स्वतांस फसवून घेईन.

( ४ ) आपण हल्लीं स्थावर जंगम जिनगीची अफरातफर मांडली आहे व काल रोजीं ज्वारीच्या दोन पेवा पैकीं एक पेवही परस्पर विकल्याचें ऐकतो तर इस्टेटची कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्याची या लेखानें मी मनाई करितों. दोन घरें, सुमारें तीन हजारांचे दागदागिने व वीस पंचवीस हजारांची दुकानदारी वगैरे सर्व इस्टेट नीटपणें जपून ठेवण्या पलीकडे आपला अधिकार पोंचत नाहीं असें आतां निक्षून सांगणें भाग झालें आहे.

शेवटी विज्ञप्ती एवढीच कीं जें करणें तें योग्य विचारानें करावें आणि फिर्यादी अर्फीदी करून सर्व इस्टेट धुळीस मिळविण्याच्या नादीं पडू नये. या उपर आपली मर्जी गैरवाजवी व गैरकायदा वागण्याची असली तर नाइलाजानें मला सरकारदरबार करावें लागेल. कळावें. ता० १९मा० ७स० १८९३ इ०

सही. मारवाडींत
चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी
मुक्काम नांदुरा दस्तुर खुद्द.

---

नोटीस

मि. मनोवर अली कादरभाई दुकान आकोला यांस—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतेंकीं तुह्मी नदीपार ताजनापेठ तील भाजी बाजारांतील लाल भुसारी वाली दुकानची लाईन रुपये ३००० हजारास आह्मास विकत दिली व रुपये २२०० बयणा पेटे घेतलेत व त्याचा कागद करण्याचा करार दिवस आठचा केला असून अजून पर्यंत कागद करून देत नाहींत या करिता ही नोटीस पावल्या पासून दिवस ८ चे आत कागद करून देऊन रजिस्टर करून द्यावे व बाकीचे राहिलेले रुपये द्यावेत. असें न केल्यास शिरस्त्या प्रमाणे तजवीज करून ह्या नोटिशीचे खर्चासह व कोर्ट खर्चासह अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख ११।७।९३

अबदुल हुसेन गुलाब हुसेन मुखत्यार सखाराम भिकाजी
दस्तूर खुद्द.

---

नोटीस

रा. रा. गीरधर मारवाडी ब्राह्मण राहणार पाळोदी ता. आकोलें यांस—

नोटीस देणार बाबूरावजी सखारामजी देशमुख नोटीस देण्यात येते कीं तुह्मी मंडाळे येथील सखराम वा कुणबींची जमीन भाड्यानें वहितीस केली आहे त्या जमिनी वर आमचा हुकूम नामा झाला असून जप्त केली आहे तर तुह्मी ती जमीन करूं नये ही नोटिस.

बाबूरावजी सखारामजी
तर्फे मुखत्यार
गोविंदराव.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या लेखानें कळविण्यांत येतें कीं मौजे नांदुरा खुर्द तालुके मलकापूर येथील दुकान नामें 'कस्तुरचंद आसाराम' हें व त्या दुकानची सर्व स्थावर जंगम इस्टेट हीं एकंदर खालीं सही करणार यांच्या पूर्ण मालकीची आहे. तिजवर कोणाचा हक्क व अधिकार चालणार नाहीं. तेव्हां ज्या कोणास त्या दुकानाशीं देवघेव, व्यापार ठापार, गहाण विक्री वगैरे हरएक प्रकारचा व्यवहार करणें असेल तो माझ्या शिवाय अन्य कोणापाशीं होऊं नये. आणि जर कोणी माझ्या पावती खेरीज दुकानावर कर्ज वगैरे परत करील तर ती रकम मला न पोचल्या मुळें वसूल धरली जाणार नाहीं. माझ्या परवानगी वाचून जो व्यवहार होईल त्याची जबाबदारी माझ्यावर व माझ्या इस्टेटीवर नाहीं. आणि त्या बद्दल ज्याचा तोच जबाबदार राहून नफा नुकसनीस कारण होईल. कळावें तारीख १९ माहे जुलई सन १८९३ इसवी.

( सही )
चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी
राहणार नांदुरा खुर्द
दस्तुर खुद्द.

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं अंबाबाई जवजे भास्करराव देशमुख मौजे सातेगांव प्रगणें व तालुके दर्यापुर जिल्हा इलिचपूर ह्या सातेगांव सोडून पंचगव्हाण येथें राहण्यास गेल्या आहेत. बाई मजकूर यांचे नांवानीं असलेलीं शेतें व दुसरी स्थावर इस्टेट त्या कदाचित येथून गेल्या मुळें विकतील किंवा गहाण ठेवितील किंवा बक्षीस देतील असा रंग दिसतो करितां जाहिरात देण्यांत येतें कीं, सदर्हू बाईकडेस असलेल्या इस्टेटीवर बाईचा अन्न वस्त्र शिवाय कांहीं हक्क नाहीं त्या इस्टेटेचा खरा वारिस मी आहे व वरिस असल्या बद्दल बाई मजकूर याणी येक करारनामा योग्य रितीनें लिहून दिला आहे जर कोणी ती जमीन कोणत्याही रितीनि घेतली असेलतर तो जबाबदार राहील घेतली नसल्यास घेऊं नये. सर्वत्रास कळावें तारीख १६·७·९३.

दिनकरराव वा संपतराव आज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई तर्फे मुक्त्यार भगवंतराव देशमुख दतूर खुद्द.

---

नोटीस.

अंबाबाई जवजे भास्करराव देशमुख मौजे सातेगांव प्रगणें अंजनगांव ता० दर्यापूर जि० इलिचपूर यांस—

नोटीस देणार दिनकरराव वा संपतराव अज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई जवजे संपतराव मुकदम देशमुख मौजे सातेगांव प्रगणें अंजनगांव ता० दर्यापूर जि० इलिचपूर तर्फे मुखत्यार भगवंतराव तुह्मास नोटीस देतों ऐसाजे मौजे सातेगांव येथील जमीन व मौजे गांवडगांव येथील जमीन व मौजे उमरी ता० दर्यापूर जि० इलिचपूर येथील जमीन वर लिहिलेले तीन गांवचे जमीनीचे खातें आमचे समजुती वरून जे तुमचे नांवानें झाले तेव्हां पासून तुम्ही पंचगव्हाण ता. आकोट जि. अकोला येथें तुह्मी आपले भावाचे घरीं रहात आहा. सबब तुह्मास नोटीस देण्याचे कारण कीं, तुह्मी आपले घर गांव सोडून तेथें रहाण्याचे कारण तुमचे कांहीएक दिसत नाहीं बरें असो. परंतु तुह्मी तेथें राहून वर लिहिलेली जमीनीचें खरीदीखत किंवा गहाणखत व बक्षीसपत्र आमचे संमती वाचून कोणासही करून द्याल तर तो रद्द असे. कारण कीं सदरील जमिनीवर कोणाचे कर्ज वगैरे नाहीं. तर वर लिहिलेली जमीन वडिलोपार्जित असून तिच्यावर व घर इस्टेटीवर हक्क आमचा आहे दुसऱ्याचा नाहीं. आणि वर लिहिलेलें जमिनीचे उत्पन्न हजार रु. साल आहे. तेव्हां तुह्मी त्यांतून अन्नवस्त्र करितां पाहिजे तितका खर्च करून राहिलेली रक्कम सावकारी ठेवावी. असें करण्यास तुह्मी चुकूं नये. कारण कीं वर लिहिलेले जमिनीचे वारसदार आह्मी आहों. सदरील जमीन व घर इस्टेटीची तुह्मी अफरातफर करूं नये. केली तर तुमचे पासून जबाब घेतला जाईल. कारण वारसदार आह्मी आहो. सबब तुह्मास नोटीस दिली आहे. कळावें तारीख १३ माहे जुलई सन १८९३ इ०

( सही )
दिनकरराव वा संपतराव आज्ञान पालन करणार आई मुक्ताबाई जवजे संपतराव तर्फे मुक्त्यार भगवंतराव
दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार.

सहामाही " ३ " ८८
साल अखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ........८१

Annum in advance 5 Postage
Annum in arrears 7 ,,1Rs.
Six monthly............3 " 8
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertis
Below 10 lines... 2 R
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

VOL. XXVII AKOLA MONDAY 24 JULY 1893 NO. 29
वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २४ माहे जुलै सन १८९३ इ० अंक २९

CLEMENTS TONIC

## दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक.

( दुनियेंचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचे टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतलि थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग, मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्मातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरीक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणे, गुप्तस्त्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वी प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, बिचारांचा घोटाळा झाला, ज्या चा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासीनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेत सल्का मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पद्दाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें, परमा व गुप्तस्त्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्या विषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ती वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतंतूच्या योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोहोचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग अथवा, मेहनत, अतिश्रम अथवा क्रियेक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूची अशक्तता साधारण किंवा स्थनिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून रहाणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूंची अशक्तता हींच रोगाची कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांधयाकडे व बाजारांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगीरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु हीं यानें बसतात, आणि रक्त व मेंदू यांनां हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृती सदृढ. बळकट, ताकतदार, आणि जोमदार होतें आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—कॅंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मु. नंबर १४/१८९३

डेप्युटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव कृष्णा

बापाचें नांव नारायण आ. पा. आजा देवाजी वा दत्ताजी

राहणार— करजगांव तालुके इलिचपूर.

जिल्हे— इलिचपूर यांस मयत.

नारायण बापाचें नांव देवाजी रहाणार करजगांव तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता. ९ माहे अगष्ट सन १८९३ इ० रोजीं सदहु अर्जाचा चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. २९ माहे जुन सन १८९३ इ.

( Signed ) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District

शिक्का उपहज्य.

दिवाणी कोर्टास सूचना.

नमुना नंबर १४१

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सर्टीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबजा करण्यालायक मनुष्य नेमण्या विषयीं

वर्ग १३ सन १८९० चा आक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर ५ सन १८९३

डेप्युटी कामिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार-- पांडुरंग

बापाचें नांव— लक्षमण

जात— ब्राह्मण

राहणार— अंजनगांव तालुके दर्यापूर

( अज्ञान ) नागोभट बापाचें नांव त्रिंबकभट जात ब्राह्मण राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर

( यांचें पालन व मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव, मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्तैवजा वरून, किंवा अगदीं जवळचें नातलगपणाचे कारणा वरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदहू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळ कर्ता, या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्यां सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख १४ माहे अगष्ट सन १८९३ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकाची लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १० माहे जुलै सन १८९३ इ.

( Signed ) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District

शिक्का. जहज्य.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुढाऱ्यांनों अंधत्व सोडा!
डोळे उघडा!! जागे व्हा!!!

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वरील मथळा फारच चमत्कारीक व कान उघडणारा आहे परंतु आमचे पुढारी ह्मणविणाऱ्यांचे तिकडे लक्ष जाईल तेव्हां खरें! नाहीं तर अनाथ आर्य जननीचें व आमचे नशीब! बिचाऱ्या दादाभाइनें पोट बांधून आमची मोफत वकिली मोफत पत्करून आज एक सारखा १९ वर्षें आह्मांसाठीं एकसारख्या नेटानें झुंजत आहे व अविश्रांत परिश्रम, दीर्घोद्योग उद्योग तत्परता, उत्कंठा, असामान्य धैर्य व एक निश्चय याहीं करून मोठ्या शिताफीनें पार्लमेंट मध्यें शिरकाव करून घेतांच इतक्या अल्प काळांत मोठ्या कर्तबगारीनें, व विलक्षण चातुर्यानें एकदाचे सर्व लोक वश करून सिव्हील सर्व्हीस प्रश्न पार्लमेंटा पुढें आणून त्याचा निकाल युक्तीनें करून घेतला व अखेर मि. पॉल ह्यांच्या सूचने वरून पार्लमेंट सभेंतें ठराव पसार एकदाचा झाला. परंतु विघवेच्या लग्नास सतरा हजार विघ्नें! तद्वत् ह्या देशास कदाचित् हा हक्क मिळणार तों मि. ग्लडास्टन त्या प्रश्नासंबंधें विरुद्ध झाले. व जरी हौस आफ कामन्सनें ठराव केला तरी ह्या वयोवृद्ध गृहस्थानें ह्या प्रश्नाचा निकाल हिंदुस्थान सरकारावर ठेविला आहे! आतां हिंदुस्थान सरकार त्यांचें आंग्लो इंडियन जातभाई व पत्रकार ह्यांनीं कशी एक सारखी व्यर्थ कोल्हेकुई चालविली आहे! तसेंच ह्या आंग्ल गौरकाया बालकानें आपल्या व पुढील पिढीच्या पोटावर काळ्या लोकांचा पाय येईल ह्मणून ते आह्मांस नामर्द, तंटेखोर कुचकामाचे व अखेरी राज्यास धोक्यांचा संभव आहे! असेंही प्रतिपादन केलें आहे, ते किती घरसोडीचे, विघ्नसंतोषीपणाचे व फोल आहे हें प्रत्येक हिंदूस कळत आहेच. हा ठराव पसार झाल्यास आपले किती हीत होईल वगैरे सांगत बसण्यास वेळही नाहीं व स्थळ ही नाहीं! तस्मात् एकंदर मुद्दा हाकीं आमच्या पुढारीपणाची वृथा बमेंड मारून सभेंत हिंडणाऱ्यानीं उमरावती व अकोलें येथें सभा भरवून बिचाऱ्या दादाभाई, पॉल व त्यांचे साथीदारास उत्तेजन देऊन पार्लमेंटाकडे ठराव पसार करण्या बद्दल अर्ज पाठवावे असें झाल्यास आमच्या सप्तसमुद्राच्या पलिकडे रहाणाऱ्या वयोवृद्ध व तपोवृद्ध भिष्माचार्यांस दुप्पट बळ व हिंमत येईल. वराती मागून

घडेल कामाचे नाहीं, जें काम करणें असेल तें त्वरित करावें. व थोड्या दिवसांचे आंत उमरावती व अकोलें येथें प्रचंड जाहीर सभा करून तारा व अर्ज रवाना करावे. तसेंच बाकीच्या चार जिल्ह्यांपैकीं प्रत्येकानें एकएक अगर जास्त अर्ज पार्लमेंटकडे पाठविण्याची तजवीज आठचार दिवसांच्या आंत करावी. निदान वऱ्हाडांतुन ६ अर्ज गेलेच पाहिजेत. वऱ्हाड कांग्रेस कमेटी व सार्वजनिक सभा निजवायास गल्या काय? देश हितचिंतकानों जागे व्हा! नाहींतर आपला आळस आपणास भोंवेल! जरी मेसर्स मुधोळकर, देवराव वाव व जोशी ह्यांनीं सर्व संबधानें श्रम चालविले आहेत तरी त्यांच्या शिवाय हीं कामें करणारे फारसे कोणी दिसत नाहीं. तर त्यांनीं वेळींच जागे! होऊन उद्योगास लागावें. इतरांनीं ही पण ह्या कामास कां लागू नये हें समजत नाहीं. मि. मुधोळकरां नीं तर आज दोन महिने अहो रात्र अश्रांत श्रम चालविले आहेत. असो आत तरी त्यांनीं व इतर मंडळींनीं वेळींच जागे व्हावें! जागेगा सो पावेगा व सोवेगा सो खोवेगा!!!

एक देशभक्त.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ११ शके १८१५

## सभा भरवा व अर्ज करा.

मि. पाल यांची सूचना हाऊस आफ कामन्स सभेंत पसार झाली पण तिच्या अन्वयें हिंदुस्थानांत इंग्लंडांतल्या प्रमाणें सिव्हील सरव्हीसची परीक्षा भरवावी असा राज्यसूत्रधारी मुत्सद्याचा काडीमात्र विचार नाहीं इतकेंच नव्हे तर ती पसार झालेली सूचना रद्दी कागदाप्रमाणें गुंडाळून फेंकुन देण्याचा पक्का आंग्लो इंडियनांचा कृत संकल्प दिसतो. मि. पॉल यांच्या सूचनेनें आंग्लो-इंडियन लोकांची घाबरगुंडी उडाली हें 'सुधारक' पत्रकाराचें ह्मणणें कांहीं अन्यथा नाहीं. त्यांनीं गडबड करून सोडली आहे खरी पण तिला प्रतिरोधक सर्व हिंदुस्थानदेशभर चळवळ उडून धुमाकुळी माजली आहे. मि. पाल आदिकरून कळकळीच्या हितचिंतकांचें अभिनंदन करण्यासाठीं व त्यांच्या परम आल्हादकारक कृतीला मानाच डोलविण्यासाठीं नाहीं तर त्या सूचनेची अंमलबारी होण्या साठीं आणि सर्व देशाचें एकवटलेले लोकमत कळविण्या साठीं कामन्स सभे कडे निरानिराळ्या प्रांताप्रांतांतून अर्ज सहस्त्रावधि लोकांच्या सह्यानिशी रवाना होत आहेत.

या आणिबाणीच्या व ऐन कृती करून दाखविण्याच्या प्रसंगीं वीरश्री येऊन 'एका देशभक्ता'नें वऱ्हाडच्या लोकांस 'डोळे उघडा, जागे व्हा, पुढाऱ्यांनो अंधत्व सोडा' या सदराखालीं एक लेख आह्माकडे धाडला आहे. त्याच्या ह्मणण्याचा मथितार्थ कीं या वेळीं जिल्ह्या निहाय या प्रांतीं सभा भरल्या पाहिजेत आणि सिव्हिल सरव्हीस परीक्षे संबधानें पार्लमेंटास अर्ज धाडले पाहिजेत. वऱ्हाडांत जर कांहीं खरोखर बाणेदार पुढारी असतील तर त्यांनीं हा सुयोग दवडतां कामा नये. या आपल्या कृतीनें मि. पाल, दादाभाई नवरोजी, सर वुलियम वेडरबर्न आदिकरून महात्म्यांस आरंभलेलें सत्कार्य फलद्रूप करण्यास दुजोरा बळ येईल आणि बहुत काळचा शेट दादा भाई नवरोजी यांचा दीर्घ उद्योग अंशतः तरी सफळ होईल. लोकसेवा जे करितात त्यांचें अभिनंदन करण्या इतकें तरी गुणग्राहित्व व कृतज्ञता आपल्या आंगीं नाहीं असा निदान आपल्या देशावर विलायतेंतील अग्रणी लोकांनीं अपवाद ठेऊं नये. आह्मास बळकट आशा आहे कीं, इतर प्रांताप्रमाणें वऱ्हाडांत ही सभा भरतील आणि पार्लमेंटा कडे या प्रांताचे अर्ज जातील.

---

पुणें मेटल म्यानुफ्याकचरिंग कंपनी लिमिटेड या कंपनीचा दुसरे बारमाहीचा रिपोर्ट आह्माकडे आला आहे त्यावरून यंदा भागीदार लोकांस गुदस्ता प्रमाणें ६ टक्के फायदा वाटतां आला. सध्यां कारखान्यांत ७५ मनुष्यें काम करीत असतात. या कंपनीचे ३९८ भाग खपले. त्या खेरीज इतर लोकांकडून ठेवीजू रकम रु. १०१५६०८६ कंपनी कडे जमा आहे. ही ठेवीजू रकम कारखान्यांतील यंत्रें वगैरे किंमती बद्दल देणें आहे. गेल्या साली कंपनीचा एक शेअर १०० रुपयांचा करण्यांत आला तेव्हां पासून भराभर शिल्लक शेअर्स लोक घेत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. पुण्या सारख्या ठिकाणीं नेटिव लोकांनीं हा नवीन कारखाना उभारला आहे आणि त्याचे कामाची व्याप्ती उत्तरोत्तर वृद्धिंगत आहे ही संतोषकारक बातमी होय.

---

मि. डिग्बी साहेबांनीं मद्रासेस विजेनें चालणारी ट्रामवे कंपनी उभारली असून तिचे पुष्कळ शेअर्स नेटिव लोकांनीं मोठ्या तत्परतेनें घेतले आहेत कंपनीला मद्रास सरकारनें एक अट घातली होती कीं ७५००० शेअर्स नियमित मुदतींत गोळा झाले नाहींत तर कंपनीला ट्रामवे चालविण्याची मनाई केली जाईल. ५०००० शेअर्स खपले आणि बाकीचे आवश्यक २५००० शेअर्स कंपनीचे जे कंत्राटदार होते त्यांना देण्याचें कंपनीनें कबूल केलें होतें. परंतु मद्रास सरकारनें अशी शक्कल काढली कीं हे २५००० शेअर्स खरोखर खपले असें मानतां येत नाहीं तेव्हां म्युनिसिपालिटीनें ट्रामवे चालविण्याचा परवानगी देऊं नये. ही शक्कल अपंत चांगली ठरली नाहीं आणि सर्वत्र चळवळ उडून स्टेट सेक्रेटरी कडून ६ महिन्यांची काम सुरूं करण्यास मुदत मिळाली. व कंत्राटदारांस दिलेले शेअर्स कायदेशीर आहेत असा विषयीं हा ठराव करण्यांत आला. हा हुकूम सर्व लोकांस न्यायाचा वाटून ते परम संतोष पावतील हें स्पष्ट आहे.

---

बंगाल, मद्रास, मुंबई आदिकरून सर्व इलाख्यांतून ठिकाठिकाणीं जंगी सभा भरतात आणि लोक त्या त्या सभेच्या द्वारें आपली विनंती पार्लमेंट सभेस करीत आहेत कीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षे संबधानें पसार झालेल्या मि. पाल यांच्या सूचनेचा योग्य विचार व्हावा आणि तिच्या अन्वयें सिव्हील सर्व्हिस परीक्षा विलायते प्रमाणें हिंदुस्थानांतही दरसाल भरविली जावी. अशा सर्व सभामध्यें गेल्या १५ वे तारखेस मुंबई शहरीं जी या बाबदींत सभा भरली होती ती फार प्रचंड होती. लोकसमूह अपूर्व व फारच मोठा जमला होता असें सभेच्या वर्णना वरून कळतें. या खेरीज मुंबईच्या लोकांची कर्तुत्वशक्ति व कल्पना कांहीं विलक्षणच आहे मुंबईच्या सभेनें एका गोळीबारांतच दोन शिकारी साधल्या आणि कांहीं कोटिक्रम फार नामी काढले. सिव्हील सरव्हीस परिक्षे संबधानें त्या सभेनें आपला प्रौढ, साधार, व बिनचूक अभिप्राय तर प्रगट केलाच पण त्या वेळीं इंडियावर वृथा लादलेला लष्करी खर्च कमी करण्या विषयीं लार्ड नार्थब्रुक यांच्या पाठबळावर पार्लमेंटास दुसरा अर्ज जोडला.

विख्यात नामदार फेरोजशा मेथा यांच्या सर्वमान्य अध्यक्षते खालीं मुंबईची सभा जमली होती. सभे मध्यें जीं सुरस, विस्तापूर्वक, व विषयप्रतिपादनपर व्याख्यानें झालीं खुद्द अध्यक्ष, जव्हेरीलाल उमियाशंकर प्रोफेसर गोखले, दिनशा एदलजी वाचा इत्यादि बहुश्रुत विद्वानाच्या तोंडचीं असल्या मुळें सर्वांनीं वाचण्या सारखीं आहेत इतकेंच नव्हे तर जे इंग्रजी भाषा जाणत असून न वाचतील त्यांनीं स्वतांस तेवढ्या पुरतें फसविलें असें समजावें.

सिव्हील सरव्हीसची संस्था १८३३ सालीं निघाली तेव्हां पासून आजवर १३०० युरोपियन लोक हिंदुस्थानांत सिव्हिल सरव्हंटी गाजवून परत गेले पण त्यांच्या बरोबर फक्त काय ते दहा पांचच नेटीव सिव्हील सरव्हंट होऊन गेले असतील. १८५८ सालचा जाहिरनामा कीं जाती, धर्म, देशीविदेशीपणा इत्यादि भिन्नत्वदर्शक भेदाभेद न पाहतां महाराणी सरकार आपल्या प्रजेस न्यायाच्या समदृष्टीनें राज्य कारभारांत हक्क व अधिकार देतील. हीं सोन्याचीं अक्षरें किती मौल्यवान व उदारपणाचीं आहेत आणि त्यांना नेटीव लोक किती माना डोलवितात बरें! पण त्यांच्या वर आडवी रेघ मारणारे अनेक प्रकार करण्यांतआले आहेत अविश्वासाचें काम करणें राज्याच्या मोठेपणाला कमीपणा आहे हें इंग्लिश सरकार समजत नसतील असें नाहीं. सत्य प्रतिज्ञा ही राष्ट्राच्या चिरस्थायीपणाची व वैभवाची गुरुकिल्ली आहे आणि ती किती दक्षतेनें व काळजीनें इंग्लिश राष्ट्र जपून ठेवितें हें त्यांच्या इतिहासावरून उघड होईल.पण इंडिया: इंडिया संबधानें १८७० चा सिव्हील सरव्हिस स्याटूट व इतर प्रतिबंधक कमिशनचे ठराव स्त्या इत्यादिकांनीं महाराणी सरकारच्या जाहिरनाम्यावर आज ३५ वर्षे तिळांजली सोडली आहे. या वचन भंगाचें पाप क्षालन करण्याची पाळी मि पाल यांच्या सूचनेनें आली आहे आणि ती वृथा दवडली जाऊं नये ह्मणुन आमच्या लोकांचा व कैवाऱ्यांचा अहर्निश प्रयत्न चालूं आहे. या खेरीज विद्येनें विभूषित, राज्यकर्तृत्वानें निष्णात व राजनिष्ठेनें इंग्रजीराज्याचे आधारभूत असे अनेक लोक या देशांत सध्यां मिळण्यासारखे आहेत. सिव्हील सरव्हीसच्या खडतर नियमा प्रमाणें परकीय भाषाज्ञान विलायतेंत वास्तव्य, विपूल खर्च, वयाची इयत्ता या गोष्टी नेटिवास बाधक व घातुक होतात. विलायतच्या परीक्षेच्या कसोटीला लागणें आपल्या लोकांस दुर्घट, कष्टसाध्य व दुर्मिळ झालें आहे. वरील नियमांचा कडकपणा दूर करण्या साठीं कांहीं योजना आहेत ह्मणजे जो नेटीव हिंदुस्थान सरकारास सिव्हील सरव्हंटाच्या योग्यतेचा वाटेल त्यास सरकारनें सिव्हील सरव्हीसमध्यें नेमावें. या दयेच्या प्रेरणेनें सिव्हील सरव्हीसचें चांगले लोक न मिळाल्यामुळें नुकसान होतें, शर्यतीनें जागा मिळण्याचा राजमार्ग बंद होऊन आडमार्ग खुला होतो, आणि पक्षपात व लांचलुचपत वगैरे दुष्ट साधनांचा दरवाजा उघडला जातो ह्मणून आह्मावर ही मेहेरबानी नको असें आमचें ह्मणणें आहे.

सन १८८६ च्या सिव्हील सरव्हीस कमिशननें आपला शेरा दिला आहे कीं इंडियाचें राज्य चालविण्यास इंग्रजी राजनीती विलायतेंसच शिकली पाहिजे. त्यावर मुंबईच्या सभेचें ह्मणणें कीं हिंदुस्थानात परिक्षा पास झाल्या नंतर त्या सिव्हील सरव्हंटला नोकरी देण्या पूर्वीं त्यांस विलायतेंत दोन वर्षें एखाद्या पाठशाळेंत घालवावीं. आणि असें झाल्यानें नेटीवांच्या सोयी पुष्कळ निवतील. परीक्षेचा धोका न राहिल्यामुळें अनेकजण सिव्हील सरव्हीसची परिक्षा इंडियांत देतील आणि नंतर दोन वर्षें खुषीनें विलायतेंस घालवितील. आणखी जर राज्यकर्त्यांच्या मनांत किंतु येत असेल कीं अशा रितीनें नेटिवांचा भरणा मोठा होईल तर त्यांनीं इंग्लिश आणि नेटीव यांच्या नेमणुकीचें कांहीं प्रमाण नेमस्त करावें ह्मणजे ती खोटी भितीही राहणार नाहीं

---

## The Berar Samachar

MONDAY JULY, 24, 1893

### THE PROPOSED SETTLEMENT IN BERAR

(continued from our last issue)

It is yet an unsettled question as to how much of the land—produce should go to the Government exchequer. This tax on the land forms the largest and most fruitful source of the revenue. The necessities of administration for the safety of purse and person of one and all have sanctioned this incidence of taxation and the most permanent forms of interest in land ought to bear the greatest share of it The old law—givers of the Aryan times lay down that land is the milch cow to a ruler and that he should not claim more than one—sitxh of the annual yield in order to make his government firm, secure and protective. The proud boast of the English government is that the ryot is free from the usurping and destructive taxes of the Mongal period. To some extent the British ad-

ministration is an undouted blessing to the nation. It brought more land under cultivation, promoted agriculture and lightened the assessments under the Mahomedan rulers. The evils of despotic and tyrannical monarchism enhanced the value and goodness of the English rule but the latter is not on that account free from its open blemishes and drawbacks. But the ever growing population, the hard—fought struggle for bread and the largely expensive administration of a foreign nation have made extinct the revival of the good old age of richness and plenty. The other incidence of taxation have overlapped in indirect but unmistakable ways upon the margin of profit derivable from the tilling of land. In India and most particularly in Berar agriculture is the first and the last profession of the masses; and all the collections in one form of tax or another fall upon the agriculturists. In the long run Berar yields to the Government more than its due. This fact leads to the general result of ruining the only trade of the province. We can only indicate in general observations that the present assessment is more than what it ought to be! It is in round numbers 45 per cent whereas it should be 25 per cent at the most. We need not dilate more upon the point to express that the proposed enhancement is unwarranted by the justice and equality of the proportion between government demand and the land—produce.

Our next argument against the proposal of Mr. Francis is that there is no necessity for the increase in taxation. The province is a trust with the British government and it is gratifying to note from the clear, full, and accurate accounts of the province that His Highness the Nizam receives a handsome surplus revenue over the expenditure of the administration. The sum standing to the credit of the Nizam is already more than 40 lacs of Rupees and each year contributes a high sum of 13 lacs to the ever—increasing balance in favour of the Nizam. Berar is under a double—barrelled government. The province has to pay off the expenses of the British management, to support a Contingent force in protection of the Nizam's dominions and also to send an enviable round sum to the treasuries of the king *de jure*. But now it seems from the proposal under notice that Berar should moreover pay to defray the charges of the reforms that administrative capacity and utopian imagination can propose for the province. We perceive in the recent annual reports the prognostics and indications of the creative necessities of the province and the call for new funds to meet them. We would ask what is the highest ideal of Government. Is it to wring every pie from the people's purse to its last content in order to do good to them in some reformed manner. To collect revenue and to spend it in return for the good of the people which is not possible within the measure of single, divided, and indiviual efforts. There are some collective goods of the people and Governmet is an human artifice to secure them by the united and concentraled forces of the whole organism of a society. If these benefits which are within the gift and doing of a Government soar high and create demands for new taxes or rather an increase in the old ones we do not think that the British Government as the benign trustee of the province is right in holding that the time has come to necessitate an enhancement of assessment.

(to be continued)

At the grand public meeting held at Bombay on 15th current Mr. D. E. Wacha spoke in a vogorous tone on the heavy burden of military expenses with which India is mercilessly saddled. He concludes his remarks in the following remarkable manner:—

"There are Crown Colonies to whom England lends the service of the troops but you will be surprised to learn that save five none are called to contribute a farthing towards the cost. of maintenance of the home depot, and even in the case of the seven it amounts to petty sums. I shall read to you the particulars:—

| | Man | Contribution Per Head |
|---|---|---|
| Jamaica | 1569 | None |
| Wiad ward Island | 1330 | " |
| Bahama | 111 | " |
| West Africa | 953 | " |
| Gibraltar | 5196 | " |
| Cyprus | 553 | " |
| Malta | 7396 | 12 Shillings |
| Ceylon | 1416 | £ 23 |
| Hongkong | 2989 | £ 14 |
| Mauritius | 851 | £ 54 |
| Straits Settlement | 1509 | & 66 |
| Cape Colony | 3324 | None |

(*Economist*, 22nd April 1893.)

Is it not apparent, again, that India is indeed the milk-cow of England? Let me quote Sir C. Dilke's words on this subject. "The £750,000, which India is annually obliged to contribute, is simply a tribute paid by India to the war Office for the privilege of receiving British Regiments on loan at India's expense from the moment they leave England until the day when they are landed back again". Contrast the injustice of this charge with the *no* charge to the Colonies, though they are never tried of observing that India is the richest and brightest dependency of the Crown! According to Sir Charles, if the tribute were remitted, the Indian Government could afford for a fraction of it to keep recruiting offices in the Untied Kingdom and in Canada which would be able to supply all the men required, and with the balance to pension every one of its time-expired soldiers at the rate of shilling a day for life." What does then the tribute mean? This only, that the rich partner, under the precious amalgmation scheme, not only exacts from the poor an extravagant amount, but disallows him that freedom to purchase his materials cheaper elsewhere—freedom which is the privilege of the meanest subject of Her Majesty. Could there be a more tyrannical partnership than this? And that by a country which inculcates and practises the principles of free trade!"

In his Police Report for 1892 Colonel Lane makes the following important observation with regard to the Jaglia Force in Berar:—

"It is, I venture to think, a matter for regret that no progress has yet been made in organizing this large force for the more efficient prevention of crime. This can only be done by linking them on to the provincial police, from which now they are entirely disconnectd. I believe that this could be done without weakening any responsibility now in practice exacted from patels. At present, so far as my experience goes, the village police are treated to a great extent as a reserve force of peons at the disposal of Tahsildars and others for miscellaneous work They themselves perhaps consider the most imprtant part of their duty (and probably not the least remunertive) to be the provision of *sarbūrai* for officers' camps, and the performing of peons' duties at tahsilis elsewhere. Many are withdrawn from their villages for this purpose. One or two instances out of many which have come to my notice lately will be enough to show that these remarks are not merely imaginative, but are based on facts.

(*a*) To excuse himself for an omiission, the patel of a village explained to me that this jaglia had been absent for a month as a peon to a clerk at headquarters.

(*b*) Meeting a jaglia I enquired where he had come from: he stated that he belongs to a village 45 miles away, and had brought fowls into the tahsili.

(*c*) At the head-quarters of a toluk, I found one name down in the Police station register of notorious bad charecters. Enquiring how the man made his living, I ascertained that he had been entertained as a jaglia.

The provincial police are scattered in small parties over the province at distances of 10 or 15 miles apart. It is impossible that they can of themselves keep an effective watch over either the local or foreign criminals. For information as to the movements of both they must to a great degree be dependent on the village police. The more these are made to realize that they are an important part of the police force of the country; that their primary duty is not that of peons but the prevention of crime in their limits, and and the communication to the regular police, though their pateis, of information regarding criminals and suspicious characters, the more effective will be the surveillance of the regular police over both local and foreign criminals."

## वऱ्हाड.

मि. सी. एच. हालडेन एक्स्ट्रा असि. कान्सरव्हेटर यांस गेल्या १५ वे तारखे पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

बुलढाणा मुनसिपालिटीनें आलिशान रेसिडेन्ट साहेबांची मंजूराती घेऊन मुनसिपळ हद्दींत खालील कर बसविले आहेत:—

( १ ) ज्या घराची मुळ किंमत शंभर किंवा शंभराहून अधीक रुपये असेल अशा प्रत्येक घराच्या वार्षिक उत्पन्नावर शेंकडा २ ½ प्रमाणें कर वसूल करणें.

( २ ) दोन एकराहून अधीक जमिनीवर तिच्या उत्पन्ना मागें शेंकडा ६ या प्रमाणानें कर बसविला आहे.

(३) दुकानी गाडीस दर तिमाहीस १२ आणे.

( ४ ) बारा हाताहून अधीक उंचीच्या घोड्यास दर तिमाहीस १॥ रुपया.

( ५ ) बारा हात किंवा त्याहून कमी उंचिच्या तट्टास दर तिमाहीस ९ आणे.

मीर अनवर अली तहशिलदार अकोला यांस सध्यां एका रिकाम्या तिसरे वर्ग तहशिलदारीवर नेमलें आहे.

लेफटेनंट डब्ल्यु हेग असि. कमिशनर यवतमाळ यांच्या कोर्टास असि. कमिशनर वर्ग २ चे अधिकार देऊन स्माल्कॉज कोडताचे शंभर रुपये पर्यंतच दावे चालविण्याचा अधिकार दिला आहे.

नोटीस

राजाराम वा॥ उदेभान देशमुख रहाणार एकलारे तालुके जळगाव यांस:—

खालीं सही करणार इजकडून देण्यांत येतें कीं, मजला तुझें दोणें मुद्दल रुपये४०० दोन दस्तैवज रुपये २०० दोनशाचे या वरून अशोन शिवाय सदरहू रकमेचें व्याज असें आहे त्यांत तुह्मास वसूल ३४९+१००=४४९ दिला असोन तुमचे मजकडे बाकी जें निघत असेल तें घेऊन माझे दस्तऐवज व वसुलाची चुकती पावती द्या असें ह्मटलें असता आज उद्या असें करून चालवीत आहा. शेवट वसूल पावले रकम बदल तरी पावती द्यावी असें ह्मटलें असतां त्याबदल ही वर नमाणेंच थापा देत आहा. शेवट निरुपाय होऊन तुह्मास नोटीस दिली अहे तरी आठ दिवसांत सदरहू वसूल वजा जातां जी तुमर्षी बाकी असेल ती चुकती घेऊन रसीद व दस्तऐवज परत द्यावे. तसें न करितां जर फिर्याद वगैरे कराल व मजकडे राहिलेले रकमेवर व्याज सुरूं रहाण्याचे बुद्धीनें स्वस्थ बसाल तर या नोटीशीचे तारखे पासून मी तुमचे राहिलेले रकमेचे व्याजास किंवा कोर्ट खर्चास जबाबदार होणार नाहीं. माझा खर्च तुह्मास द्यावा लागेल. या नोटीशीचा खर्च तुमचे हिशेबांत मजरा करीन कळावें. ता० १९।७।९३ इ.

( सही )
मुक्ताबाई जवजे सूर्यभान द.
विठोबा पांडुरंग.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकेट मिळावें ह्मणुन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें.
दि. कि. मु. नंबर १५

१८९३

डेप्युटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव बापु
बापाचें नांव बाबनाजी आ. पा. बाबनाजी वा अवचीतजी
राहणार— मल्हार तालुके इलिचपूर.
जिल्हे— इलिचपूर यांस मयत.

पिसाई जवजे परशराम रहाणार मल्हार तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांनीं कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टिफिकिट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यात येत आहे कीं त्यानीं ता. ९ माहे अगष्ट सन १८९३ इ० रोजीं सदर्हु अर्जाचा चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. आज ता. २९ माहे जुन सन १८९३ इ.

( Signed ) W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpur District

शिक्का ज्यडज्य.

## वर्तमानसार.

सायाम किंवा त्याचा कांहीं भाग फ्रान्स खालसा करूं लागेल तर किंवा त्यावर आपलें वर्चस्व स्थापित करूं लागेल तर फ्रान्साच्या त्या करण्यास चीन सरकार हरकत करील असें ठरलें आहे; असें विलायतच्या एका पत्राचा चिनांतील बातमीदार सांगतो.

जर्मन सरकारानें अपलें एक लढाऊ गलबत सायामच्या हद्दींतील जर्मन लोकांच्या संरक्षणाकारितां सायाम येथें पाठविलें आहे.

लार्ड डफरीन हे पारीस येथील इंग्रज सरकारच्या राजकीय वकिलीच्या कामावर आहेत, पण फ्रेंच वर्तमानपत्रांनीं त्यांच्या विरुद्ध लिहिण्याचा सपाटा चालविल्यावरून ते तेथून निघून गेले आहेत हे लार्ड हिंदुस्थानांत गव्हरनर जनरल होते." हें सर्वांस माहीत आहेच.

न्युफौंडलंड नांवाच्या एका व्यापारी कंपनीचें दिवाळें वाजलें. तीन कोट रुपये देणें आहे.

फ्रान्स सरकारानें सायामच्या कामगिरीवर आपली जास्त फौज रवाना केली आहे.

फ्रान्सानें जीं नवीन दोन लढाऊ गलबतें सायामाकडे पाठविलीं आहेत त्यांस मिनम नदींत शिरूं द्यावयाचें नाहीं. व त्यांनीं आंत शिरण्याचा यत्न केल्यास त्यांस बुडवून टाकावयाचें असें सायाम सरकारानें ठरविलें आहे असें सांगतात.

रशियाची एक टोळी पामीवर जाण्याकरितां रवाना झाली आहे.

गिलजित येथें महापूर येऊन दोन पूल वाहून गेले.

मर्दन, महमद झे वॅ अलिशर या स्वतंत्र संस्थानिकांनीं सुमारे सहा हजार फौज जमवून महमद सरदार खानाशीं सात वर्षें लढण्याचा निश्चय केला आहे. जो या प्रमाणें न वागेल त्या पासून दंड घेऊन शिवाय त्याच्या घरादाराचा नाश करावयाचा असा त्यांनीं आपसांत ठराव केला आहे.

फ्रान्साचीं दोन लढाऊ गलबतें सायामच्या मेनम नदींत शिरलीं. गोळा गोळी झाली व एक फ्रेंच मेला. इंग्रजांचें तिसरें गलबत त्या नदीकडे जात आहे.

नामदार मंडलीक यांचे चिरंजीव बाळासाहेब यांजवळ एक हैस आहे. ती आपल्या शिंगानें नळ उघडते व आपलें आंग स्वच्छ धुते व नंतर परत नळ बंद करून निघून जाते. आंग स्वच्छ करण्याचा प्रकार मनुष्याहूनही जास्त शहाणपणाचा आहे. हा आंग धुण्याचा विधि ती दिवसांतून दोन तीन वेळा करिते. हा सर्व प्रकार मी स्वतः पाहिला आहे. केवळ रानटी पणानें व उदर पोषणार्थ गाईला आत्मा नाहीं वगैरे वाटतील त्या कोट्या पुढें येतील पण हशीला आत्मा नाहीं असें कोण ह्मणेल ! ठा. अ.

अफू प्रमाणेंच गांजासंबंधीं चौकशी करण्यासाठीं नुकतेंच एक कमिशन नेमण्यांत आलें आहे.

वकीलीच्या परीक्षेस उमेदवारांस आजपर्यंत शेंकडा दर विषयांत एकंदर साठ गुण मिळावे लागत असत, ते आतां पन्नास आले ह्मणजे बस झालें असें नुकतेंच हाय कोर्टानें ठरविलें आहे.

रोहें म्युनिसिपालिटीनें नाटकें व तमाशे यांच्यावर कर बसविला आहे. सु. प.

मक्का येथें गेल्याचे मागचे सोमवारीं एके दिवशीं एक हजार इसम पटकीनें मेले. मुसलमानांच्या मुख्य यात्रेच्या ठिकाणीं हा कहर उसळत आहे.

हिंदुस्थानांतील गोवध बंद करावा ह्मणून हिंदुस्थान सरकारास नागपूर गोरक्षण सभेनें विज्ञाप्ती केली आहे. कितपत अमलांत येते ती पहावी.

पतियाळचे महाराजांनीं एका युरोपियन स्त्री बरोबर विवाह केला त्या बद्दल विलायतच्या डेली न्यूज पत्रांत असें लिहिलें आहे कीं व्हाईसराय साहेबांनीं या विवाहाबद्दल अतिशय नाखुशी दाखविली आहे. व महाराजांस गादीवरून पदच्युत करून दुसऱ्या इसमास ती देण्याचा विचार आहे. क. त.

माशांची वीण— कौडर जातीचा मासा दर वर्षी ७० लाख अंडीं घालतो. दुसऱ्या कित्येक जातीचे मासे १० लाखां पासून ३० लाखांपर्यंत अंडीं घालतात. टर्बोट जातीचे मासे १२० पासून १३० लाखां पर्यंत अंडीं दरवर्षी घालतात.

शिवण्याकडे वीज— पारिस येथें एक शिंप्याचा मोठा कारखाना आहे. त्यांत शिवण्याचे यंत्राकडे विजेचा उपयोग करूं लागले आहेत. या मुळें माणसास श्रम कमी होऊं लागले. हे युरोपियन व अमेरिकन लोक विजेकडून कोण कोणतीं तरी कामें करून घेणार ?

लिहिण्याचे टांक— अवघ्या दुनियेंत दररोज ४० लाख टांक खपतात !

न्युयार्क येथें एक मुद्दाम नवें इंजिन तयार करविलें आहे. त्याची गति एका मिनिटास २ मैल आहे. अबब !! केवढी विलक्षण गति ही. ह्या गतीनें मुंबईहून पुण्यास एका तासांत जातां येईल. न्या. सिं.

ग्रीसचे राजे जार्ज यांस आपल्या राज्य त्याचा कंटाळा येऊन ते व्यापारी बनण्याच्या विचारांत आहेत. त्या संबंधीं त्यांनीं लंडन मधील एक मोठ्या कंपनीशीं पत्रव्यवहार सुरू केला आहे.

मुसलमान लोकांचा दुसरा मोठा दंगा— अझमगड येथें गोहत्येच्या संबंधानें हिंदु मुसलमान लोकांची कटकट होऊन गेल्या आठवड्यांत मोठा दंगा झाला. दंगेखोरांनीं पोलिसास धोंडेमार करून पोलिस सुपिंटेंडेन्ट साहेबांसही मार दिला. मुसलमान लोक फारच क्रूर कर्मे करूं लागल्यामुळें कांहीं जणांस पोलिसानें तरवारीनें कापून काढलें असें ह्मणतात. दंग्याच्या ठिकाणीं फैजाबादेहून सैन्य रवाना झालें असून अझमगड प्रगण्यांत सर्व अस्वस्थता होऊन गेली आहे. कित्येक युरोपियन लेडी व इतर स्त्रिया भीतीमुळें तेथून दुसरी कडे पळून गेल्या. गोवध बंद करण्याच्या उपायासाठीं कित्येक हिंदु लोकांचे जमाव त्या भागांतून हल्लीं फिरत आहेत, असें टा. इं. पत्रांतील तारांवरून समजतें.

झांशी येथें एका ब्राह्मणाची एका भंगिणीवर मर्जी बसून भंग्यास ती सहन न झाल्यामुळें ब्राह्मणास तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. ज्ञा. चि.

फौजेंतील लोकांनीं कर्जाऊ पैसे कींवा उधार जिनसा न देण्याची लोकांनीं काळजी घ्यावी; कारण त्यांच्यावर कर्जाबद्दल फिर्याद करतां येत नाहीं-

चमत्कारिकमेंढा—खानदेश जिल्ह्यांत बाभुळवाडी जंगलांत अंबूवल्द मिताठिकारी आपले बकरे व मेंढ्याचे कळप चारण्या[illegible] घेऊन आलेला आहे. त्यांत १॥ वर्षे उमरेचा एक जिवंत मेंढा आहे. त्यास चारपाय असावयाचे त्या ठिकाणीं सहा आहेत. व सहांनींही तो गोमेसारखा चालतो. एक शिश्न असावयाचें त्या ठिकाणीं दोन आहेत, व मुत्रविसर्जन एकाच कालीं त्या दोहोंतून होत असतें. वृशणजोड एक असावयाचा त्या ठिकाणीं पृथक् पृथक असे दोन जोड आहेत. गुदद्वारही दोन असून त्या दोहोंतूनही मळविसर्जन एकाच काळीं होत असतें. असें असून तो शरीरानें फार धष्टपुष्ट असा आहे. त्यास पाहिल्याबरोबर पाहणारास असें वाटतें कीं हा त्या कळपांतील जणू नायकच आहे कीं काय? या मेंढ्यास पहावयास येणारे लोकांची दररोज इतकी गर्दी जमत असते कीं, पुसता सोय नाहीं! कित्येक हौसी लोक त्याला संग्रही बाळगण्या करितां ह्मणून अंबूजवळ विकत मागत आहेत; परंतु अंबू त्यास विकत देत नसून ऊलट असें सांगतो कीं, हा मेंढा कळपात पैदा झाल्यापासून मला अन्नवस्त्राची, धनाची आणि संततीची ह्मणून कमताई नसून ती दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे, तेव्हां असा मेंढा मी कसा देऊं व सुखाचे आलेले दिवस मुद्दाम घालवून देऊन दुःखाचे काय ह्मणून आठवूं!! न्या. सु.

सन १८७२ सालीं लार्ड मेयो हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल होते त्यांनीं असें लिहिलें आहे "हिंदुस्थानांत साल्हेसाल करांची संख्या एक सारखी वाढत आहे ह्यामुळें नेटीव व युरोपियन लोकांत अतिशय असंतोष वाढत चालला आहे. लोकांमध्यें असंतोष मानणें हें राष्ट्र संबंधानें फार धोक्याचें आहे, तें किती धोक्याचें आहे ह्याचें वर्णन करणें अशक्य आहे.

यंदा बंगाल्यांत तागाचें पीक ३१ लक्ष गासड्या होईल असा अजमास तिकडील शेतकीखात्यानें केला आहे. शु. सू.

श्रीक्षेत्र काशीमध्यें प्रत्येक यात्रेकऱ्यापासून म्यु० कमेटी ८४ आणे करा दाखल घेऊं लागली. म. मि.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें सोनाजी वल्लद शिवराम ढगे राहणार चिंचोली तालुके खामगांव हे असें जाहीर करितात कीं मजला सन १८९२ सप्टेंबर तारीख १६ रोजीं तीर्थरुप गंगाई मर्द शिवराम ढगे यांणीं आमच्या धर्मप्रमाणें व शास्त्रप्रमाणें दत्तक घेतलें आहे. व स्थावर जंगम इस्टेटीचा मजला मालक करून ठेविलें. परंतु अलिकडे तीर्थरुप मातोश्री गंगाई यास चार दुसरे लोकांनीं मजबद्दल गैरवाका समजूत देऊन स्थावर व जंगम इस्टेट मजला कांहीं राहूं नये अशा बद्दल गैर कायदा व्यवस्था चालविली आहे. तर सर्वत्रांस असें जाहीर करितो कीं माझ्या संमती शिवाय स्थावर व जंगम इस्टेट कोणीं कर्ज देऊन घेईल अगर गाहाण ठेवील अगर खरेदी करून घेईल अगर बक्षिस वगैरे करून घेईल तर त्या बद्दल कोणचेही प्रकारें मी व स्थावर जंगम इस्टेट जबाबदार नाहीं. ती इस्टेट खालीं लिहिले प्रमाणें:—

स्थावर इस्टेट

सवर्ण शिवेचे शेत, सारा रुपये १९ चें.

वडाचा मळा सारा रुपये ६॥ चा.

तीवसाडी नंबर दोन एकाचा सारा रुपये १८ व दुसऱ्याचा रुपये १८.

ठिका शेत सारा रुपये ४॥- यांतील चवथा हिस्सा.

घर धाब्याचें नऊ खांबाचें.

कोठा दोन धारणी १२ खांबी

जंगम इस्टेट.

बैल जोडी एक किंमत रुपये १९०

गाड्या दोन किंमत रुपये ७०

हैस रुपये ६० ची.

दागिने सोन्याचांदीचे किंमत रुपये २००

भांडी वगैरे किंमत रुपये ५० चीं.

शेतकीची हत्यारें रुपये १० चीं.

येणें प्रमाणें सदरील इस्टेट कोणी सदरी लिहिलें प्रमाणें घेईल तर त्याजबदलचा जबाबदार मी व इस्टेट नाहीं. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख ६ माहे जुलई सन १८९३ इसवी.

सही

सहींची निशाणी ( वखर ) सोनाजी
वल्लद शिवराम ढगे राहणार
चिंचोली याचे हातची असे.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या लेखानें कळविण्यांत येतें कीं मौजे नांदुरा खुर्द तालुके मलकापूर येथील दुकान नामें 'कस्तुरचंद आसाराम' हें व त्या दुकानची सर्व स्थावर जंगम इस्टेट ही एकंदर खालीं सही करणार यांच्या पूर्ण मालकीची आहे. तिजवर कोणाचा हक्क व अधिकार चालणार नाहीं. तेव्हां ज्या कोणास त्या दुकानाशीं देववेव, व्यापार ठापार, गहाण विक्री वगैरे हरएक प्रकारचा व्यवहार करणें असेल तो माझ्या शिवाय अन्य कोणाशीं होऊं नये. आणि जर कोणी माझ्या पावती खेरीज दुकानावर कर्ज वगैरे परत करील तर ती रकम मला न पोचल्या मुळें वसूल धरली जाणार नाहीं. माझ्या परवानगी वाचून जो व्यवहार होईल त्याची जबाबदारी माझ्यावर व माझ्या इस्टेटीवर नाहीं. आणिं त्या बद्दल ज्याचा तोच जबाबदार राहून नफा नुकसनीस कारण होईल. कळावें तारीख १५ माहे जुलई सन १८९३ इसवी.

( सही )
चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी
राहणार नांदुरा खुर्द
दस्तुर खुद्द.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके याचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १८

किरकोळ अंकास ........................४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस .........०१

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly...........3 " 8 as

Single copy......................4as

Advertisement
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4 as
Repetition perline 3 as

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXVII AKOLA MONDAY 31 JULY 1893 NO. 30

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ३१ माहे जुलै सन १८९३ इ० अंक ३०



## CLEMENTS TONIC

### दुखणेकऱ्यास संजीवनी क्लेमेंटचें टानिक

( दुनियेचा पौष्टिक दवा )

क्लेमेंटचें टानिक ही रामबाण, त्वरित, आणि काय ती एकच खात्रीची औषधि आहे. तिच्या योगें मज्जूंतील क्षीणता, शरीराचा ऱ्हास, चेतनाशक्तीचा हीनपणा, साधारण अशक्तता, कण्यांतील थकवा, धातुश्राव आणि दुष्ट हवा, मनस्वी क्लेश, दगदग, दुर्व्यसन, दुरुपयोग,मूर्खपणा अगर अविचार या पासून शरीर क्षीण होऊन ज्या व्याधि जडतात त्या सर्व व्याधि व रोग दूर होतात.

क्लेमेंटचे टानिक स्वाभाविकपणेंच मनुष्याच्या शरीराला हुषारी आणते, क्षीण व अशक्त मनुष्यास तजेला व शक्ति देते. कमकुवत मनुष्यास सुदृढ, बळकट व वीर्यवान बनवितें आणि नाजूक स्त्रिया बांध्यानें मजबूत व पाणीदार अशा करितें.

तरुण, मध्यम वयाचे, व ह्मातारे पुरुष व स्त्रिया यांस खात्रीचे गुणावह औषध म्हणजे क्लेमेंट टानिक असें आढळेल. शारीरिक मानसिक मनस्वी दगदग, दुःख, उघड्या हवेंत राहणें, गुप्तस्राव, छांदिष्टपणा यां पासून ज्यांना विकृति जडतात अथवा ज्यांनीं अज्ञानपणानें व खोडसाळपणानें प्रकृति बिघडून घेऊन स्वतांवर अनेक दुःखें ओढून घेतलीं त्या सर्वांस याचा गूण आला आहे. शरीर क्रमाक्रमानें थकत चाललें असतांना त्या ऱ्हासाचीं लक्षणें या औषधानें ताबडतोब नाहींतशीं होतात आणि कमी कमी झालेल्या शक्ति पूर्वीं प्रमाणें जोमदार होऊन प्रकृति निकोप होते. मुख्य मुख्य इंद्रियें कमताकत झालीं, मेंदू बिघडला, शरीराचे व मनाचे व्यापार कुंठले, बिचारांचा घोटाळा झाला, ज्याचा त्याला भरंवसा वाटेनासा झाला, स्वभाव अनावर व शीघ्र कोपी झाला, उदासिनता व भित्रेपणा वाटला, गुडघे व पाठ थकली, छाती धडधडूं लागली, वातशूल झाला, कंबरेंत सळका मारल्या तसेंच पाठींत दुखणें वेळोवेळ दात दुखणें अवयव तिडकणें झोंप नाहींशी होणें, कपाळ दुखणें पहाटेस थकवा येऊन अवयव दुखणें, मूत्रपिंड व मूत्राशय यांची आग होणें लघवी पांढरी होणें, परमा व गुप्तस्राव यांनीं धातुपात होणें या व्याधि झाल्या अथवा स्त्रीपुरुषास आपल्या जन्मांतलीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या बजावण्यास नालायक करणारा व त्यांच्या कामांत व्यत्यय आणणारा असा मानसिक व शारिरीक कोणताही आजार झाला तर या सर्वांवर क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय ठरला आहे व ठरत आहे.

क्लेमेंटचें टानिक हें खरोखरीच मनुष्यमात्रास एक ईश्वरी देणगीच मिळालेली आहे हें घेतल्या बरोबरच आपला रोगनाशक अद्भुत प्रभाव दाखवूं लागतें. ह्या विषयीं घेणारांची साक्ष सर्वत्र व विश्वसनीय अशी आहे. ते ह्मणतात कीं, ह्याच्या प्रत्येक भागानें गुण येऊं लागतो. हें ज्ञानतंतूची जबरदस्त शक्ती वाढविणारें टॅनिक असून हें शरीरांतील सर्व अवयवांना व स्नायूंना ज्ञानतंतूच्या योगानें पूर्व स्थितीवर आणणारें शक्तिदायक सत्व पोंहाचवितें; इतकेंच नाहीं पण तीक्ष्ण रोग अथवा, मेहनत, अतिश्रम अथवा कित्येक कुकर्माच्या योगें शरीरप्रकृति अशक्त झाली असली, किंवा जोंवर ज्ञानतंतूची अशक्तता साधारण किंवा स्थनिक अशक्तता चालूं असेल तोंवर कोणत्याही कारणानें अशक्तता आलेली असली तरी हें औषध घेतल्यावर गुण आल्यावांचून रहाणार नाहीं. जोंपर्यंत क्षीणता व ज्ञानतंतूची अशक्तता हींच रोगाची कारणें असतील तों पर्यंत क्लेमेंटचें टानिक हाच एक उत्तम उपाय आहे.

रोग्यांनीं लक्षांत ठेवावें कीं क्लेमेंटचें टानिक हेंच एक खात्रीचें औषध आहे, सर्व गांध्याकडे व बाजारांत तें विकत मिळतें F. Moor Clements. ही सही पेटीच्या बुडाशीं व वरच्या भागीं पाहून त्याची खात्री करून घेतांनां सावधगीरी ठेवावी, आणि जे नकली औषधें विकतात त्यांच्या पासून घेऊं नये. 'क्लेमेंटचें टानिक 'नांवानें शोध करा, आणि तेंच अस्सल औषध घ्या. हाड, मज्जा, व स्नायु हीं यांनें बसतात, आणि रक्त व मेंदू यांनां हें फार मानवतें. हें घेतल्यानें प्रकृती सुदृढ. बळकट, ताकतदार, आणि जोमदार होतें आणि दुनियेंत या सारखी ईश्वरी देणगी दुसरी नाहीं.

इंडियांतील एजंट—केंप आणि को, ट्रेचर आणिको मुंबई, बालंटाईन को; स्मिथ, स्टानिस्ट्रिट को, बेनन को, कलकत्ता; डब्ल्यू इ. स्मीथ को, मद्रास; एन. एस. फरनानडो, कोलम्बो; आणि सर्व ठोकळ व किरकोळ गांध्याचीं दुकान.

F. M. Clements, Inventor Sydney, Australia.


## वर्षोत्सव व्याख्यान माला.

(आकोल्यास 'बाबूजी देशमुख नेटीव जनरल लायब्ररींत' दरसाल पावसाळ्यांत एक व्याख्यानमाला होत असते. तिला यंदा गेल्या २२ वे तारखेस रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर यांनीं सुरूवात केली.) व्याख्यान मालेची उपयुक्तता किती आहे. हें नव्यानें सांगण्याची विशेष जरूरी दिसत नाहीं. तिजविषयीं लायब्ररीचे सेक्रेटरी रा. रा. नारायण वामन हारकरे यांनीं सन १८९२ सालच्या रिपोर्टांत जी हकीकत कळविली आहे ती येणें प्रमाणें:—

"या अत्यंत उपयुक्तमालेचें या वर्षी पुनरुज्जीवन झालें आहे. ( कोणी कोणत्या विषयावर व्याख्यानें दिलीं हें वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेंच आहे. ) या व्याख्यात्या मध्यें मुनशी अजीजुद्दीन साहेब यांनीं व्याख्यान दिलें तें अपखुषीनें दिलें. सहज एके दिवशीं ते लायब्ररींत आले. सुदैवानें माझी त्यांची गांठ पडली. मालेस सुरुवात झाल्या बद्दल हकीकत त्यांस कळविली. व्याख्यानें कोणत्या विषयावर होणें अवश्य आहे हें त्यांनीं मला सांगून आपणही एक व्याख्यान देऊं असें ते ह्मणाले. असे ह्मणणारे गृहस्थ २।४ वर्षांचे मालेंत मला कोणी आढळले नाहींत. अंगीं विद्वत्ता असून चारचार वेळां खेपा घालून हो म्हणण्याची मारामार अशांस वरील उदाहरण ऐकून काय वाटेल तें वाटो.

गुदस्ताचे रिपोर्टांत लिहिल्या प्रमाणें लायब्ररीस मिळालेल्या रसायन शास्त्रप्रयोगोपकारणा वरील धूळ झटकण्याचा यत्न रा. रा. देवभानकर व सावरकर यांनीं करून पाहिला परंतु आपणा पुढें आणण्या सारखा सफल झाला नाहीं. पुढील वर्षीं आणखी कांहीं विद्वान मंडळी खटपट करून पाहतील तर बरीच मौज होईल.

या वर्षीं अत्यंत अभिनंदनीय गोष्ट घडली कीं आह्मास श्रोत्यांची वाण पडली नाहीं. गुदस्ता हकीकत जी आपणा पुढें ठेविली होती व रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांनीं कृपा करून आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केली, तिचा चांगलाच उपयोग झाला असें ह्मटल्या वांचून राहवत नाहीं. कित्येक व्याख्यात्यांना मात्र आपलें वचन वक्तशीर अगर मुळींच पुरें करण्याची सवड झाली नाहीं व शेवटची गांठ मारण्याचाही योग घडून आला नाहीं. याचें कारण त्यांस तयारीस जितका वेळ मिळावा तितका मिळाला नसेल हें खचित आहे.(परवा नाताळचे सुटींत मी व रा. रा. खंडकर खामगांवी गेलों होतों. तेथें रा. रा. अण्णा साहेब महाजनी यांची अनायासें भेट झाली. तेव्हां मालेची एव्हांपासून व्यवस्था करण्या विषयीं त्यांनीं सुचविलें आहे. खरोखर आतां पासून खटपट झाल्यास व्याख्यात्यांस मुबलक वेळ मिळून पुढील माला वर्णनीय होईल. त्यांनीं आणखी असेंही सुचविलें आहे कीं व्याख्यात्यां कडून व्याख्यानें लिहून काढवावींत तेणें करून कोणास हजर राहण्यास सवड न झाल्यास दुसऱ्या कडून ती वाचून घेतां येतील व मालेस खंड पडणार नाहीं. व संधी आल्यास छापवूनही घेतां येईल व मंडळीही ती काळजीनें तयार करतील. रा. रा. अण्णासाहेब यांचे सूचनें वरून रा. रा. गोविंदराव काणे वकील यांनीं मुद्दाम येथें येऊन एक सुगंध पुष्प आपल्या मालेंत गोंविलें आहे त्याचा परिमळ पुष्कळांनीं सेविलाच आहे तेव्हां त्या संबंधानें कांहीं न सांगतां त्यांचे विशेष आभार मानण्याची मात्र आपणाजवळ परवानगी मागतों.) पुढील वर्षीं तेथील आणखी कांहीं विद्वान गृहस्थांस आपण विनंती केली तर ते आनंदानें मान्य करून आपल्या अमोल ज्ञानाचा लाभ आपणास करून देण्यास माघार घेणार नाहींत हें मी खचीत सांगतों. खटपट करून पहावी अशी विनंती आहे. ही खटपट कोणी करावी व या संस्थेचा लायब्ररीशीं कांहीं संबंध आहे काय व असावा काय असा एक प्रश्न लायब्ररीच्या चालकांत निघाला होता. त्याचा ह्या प्रसंगीं निकाल लाऊन टाकणें वागणें होणार नाहीं. जर लायब्ररीशी संबंध जोडला तर तिचे चालकांस मालेच्या व्यवस्थेची खटपट करणें भाग होईल. ह्या माला ज्या कित्येक ठिकाणीं ग्रंथित करण्यांत येतात त्या अशाच कायमच्या संस्थेच्या आश्रयानें होतात व वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभाही उमरावती लायबरीच्या आश्रयानें चालत असे. शिवाय लायब्ररीचे व मालेचे उद्देश लोकशिक्षण एकच साधारण common असल्यामुळें या सन्मान्य संस्थे शिवाय बिचाऱ्या मालेनें दुसऱ्या कोणाचा आश्रय पहावा व आपणही तिचा कां अंगिकार करूं नये हें मला कळत नाहीं. येऊन जाऊन अडचण काय ती थोड्या अंगमेहनतीचीच कीं नाहीं. व एकदां काम करण्यास निघाल्यावर तिची उणीव लायब्ररीच्या चालकांनीं कां भासूं द्यावी. अलग संस्था बनविली अशी कल्पना केली तर सूचनापत्रक फिरविणें, इमारत व सामानाचा उपयोग होऊ देणें वगैरे हरएक गोष्टीसाठीं लायब्ररीच्या सेक्रेटरीस तोंड वेंगडावें लागणार. लायब्ररीशी जोडून टाकल्यास मेंबरासही कुरकुर करण्यास जागा रहाणार नाहीं. इत्यादि कारणाकरितां व पुढें असा प्रश्न कोणास उपस्थित करण्यास व अंगावरचें वोंगळें काढून टाकण्यास सवड मिळूं नये ह्मणून मालेची संस्था लायब्ररीशी संकल्पयुक्त संयुक्त करून टाकावी अशी विनंती आहे. या मालेच्या उपयुक्तते विषयीं गुदस्ता मी आपणाशीं पुष्कळ बुद्धिवाद केला व तो मी आपल्या अधिकारा बाहेर ही निरुपायानें केला होता हें मी विसरलों नाहीं आतां आपला जास्त वेळ न घेतां पुन्हा आपले चित्त आकर्षून या संस्थेच्या उत्कर्षार्थ आपण झटाल अशी आशा करितों."

## शिक्षण पद्धति

( एका अनुभवी शिक्षकाचा धडा )

नंबर ४

( २८ वे अंकावरून पुढें चालूं. )

गुरु—मागील खेपेस तुह्मांला विहिरी, त-

कीं यांत पाण्याचा पुरवठा कसा होतो हें सांगितलें. आज याच संबंधानें आपण आणखी बोलूं. पाणी जमिनींत जिरतें ह्मणून जें तुह्मांस सांगितलें, तें जातें कोठें?

विद्यार्थी— विहिरी, तळीं यांत जिरलेल्या पाण्या–पाण्या पासूनच पुरवठा होतो, ह्मणून तुह्मीच नाहीं का आह्मास सांगितलें, गुरुजी.

गुरु— होय तें खरें. पण तांब्याच्या भांड्यांत किंवा चुन्याच्या फरशीवर पाणी पुष्कळ वेळ ठेविलें तर तें जिरेल काय?

विद्यार्थी— कसें जिरेल; तांब्याच्या भांड्याला किंवा फरशीला पाणी जिरून जाण्यास मार्ग मुळींच नसतो. कोऱ्या मडक्यांतलें पाणी झिरपून कांहीं वेळानें कमी होतें; तसें तांब्याच्या भांड्यांतून झिरपावयाचें नाहीं.

दुसरा वि०—गुरुजी, भांड्यांतलें देखील पाणी कमी होतें असें मला वाटतें. मागें बाबा काशीस गेले होते, त्यांणीं येतांना एक लोटीभर गंगा आणिली होती. त्या लोटीचें तोंड अगदीं पक्कें केलें होतें. उपडी करून ही एक थेंब देखील खालीं पडत नसे. पण परवां आमच्या शेजारची यमूताई मेली तेव्हां तिच्या तोंडांत गंगा घालण्या करितां त्या लोटीचें तोंड उघडें केलें होतें. आणि आंत पाहतात तों अर्धी लोटी गंगा होती. बाकीचें पाणी काय झालें ह्मणून बाबांस विचारिलें तेव्हां ते ह्मणाले, आटून गेलें. गुरुजी, त्या पाण्याचें काय काय झालें?

गुरुजी— दम धरें सांगतों. चुलीवर आधण ठेविलें, ह्मणजे त्यांतलें पाणी कमी होतें, त्याचें काय होतें तें आधीं सांग पाहूं.

वि०—त्या पाण्याची वाफ होते आणि वर निघून जाते, त्या मुळें भांड्यांतलें पाणी कमी होतें.

गुरु— चुलीवरच्या भांड्यांतल्या पाण्याची जशी वाफ होते, आणि पाणी कमी होत जातें, त्याच प्रमाणें तुझ्या येथल्या गंगा जळींतल्या पाण्याची वाफ झाली आणि ती रिकामी पडली, हें उघड आहे.

वि०—पण गुरुजी, गंगाजळी चुलीवर कोठें ठेविली होती, ती तर देवघरांत असते. बाबा तिची रोज पूजा करितात.

गुरु— सांगतो ऐक. उष्णतेच्या योगानें पाण्याची वाफ होते. विस्तवाच्या आंगीं उष्णता आहे, ह्मणून चुलीवरचें भांडें तापून त्यांतलें पाणी तापतें आणि त्याची वाफ होते. वाफ ही वायू सारखी हलकी असल्या मुळें ती वर जाते. उष्णतेचें दुसरें कारण सूर्य होय. सूर्य हा आकाशांत निरंतर जळत राहणारा प्रचंड विस्तव आहे. त्याची उष्णता इतकी तीव्र आहे कीं, आपली ही जमीन जरी सूर्या पासून कोट्यावधि कोस दूर आहे, तरी ती दिवसास इतकी तापते कीं अनवाणी चालतांना आपल्या पायांस फोड येतात. उन्हाळ्यांत आपण घरांत जेथें ऊन नाहीं अशा ठिकाणीं बसलों, तरी आंगांतून घामाच्या धारा चालतात. याचें कारण सूर्यकिरणांनीं हवा तापून ती आपल्या आंगास लागते. असो या सूर्याच्या उष्णतेनें जमिनीवरील पुष्कळ पाण्याची वाफ होऊन वर ती हवेंत जाते. तुझ्या गंगाजळीला अशाच तऱ्हेनें उष्णता लागून आंतल्या पाण्याची वाफ झाली. तिचें तोंड जरी पक्कें केलें होतें, तरी वाफेचे अति सूक्ष्म कण जाण्या जोगीं छिद्रें राहिलीं होतीं, त्यांतून ती वाफ निघून गेली.

पुढें चालेल

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ३ शके १८१५

## पोलीस रिपोर्ट.

( सन १८९२ सालचा )

सन १८९२ सालचा पोलिस खात्याचा रिपोर्ट नेहमी प्रमाणें माहितीनें ओतप्रोत भरलेला आहे. गुदस्ताच्या पोलिस रिपोर्टांत मि. बुलक जुडिशिअल कामिशनर यांनीं आपला उत्तर हिंदुस्थानांतला अनुभव बराच चटकदार रितीनें निवेदन केला होता. यंदा तसला कांहीं भाग वर्णन करण्या सारखा नाहीं व नेटिव माजिस्ट्रेटावर कांहीं कोणी ताशेराही झोडलेला आढळला नाहीं. १८९१ सालीं मि. बुलक साहेबांनीं ज्या गोष्टी असमाधानकारक व शोचनीय ह्मणून स्पष्टपणें नोंदल्या त्याच गोष्टी यंदाच्या रिपोर्टांत विशेष खुलावटीनें व पृथक पृथक दिसून पडतात हें पाहून वाईट वाटतें. सर्व पोलिस रिपोर्टांतील सारभूत गोष्ट हीच कीं, अपराध उत्तरोतर वाढत आहेत आणि हे अपराध जीवित व मालमत्ता या उभयता संबंधानें भयंकर स्वरूपाचे आहेत. अपराध वाढत्या प्रमाणावर जसा आहे तसा पोलिसचा बंदोबस्त अधीक कडेकोटीचा व जोरदार नाहीं आणि न्याय कोडतांतील फौजदारी निवाड्यांत अपराध्यांवर उत्कृष्ट शाबिती होऊन त्यांस यथायोग्य शासन मिळत नाहीं.

पोलिस लोक जो गुन्हा बारंटा शिवाय आपल्या शोधांत घेऊं शकतात असे गुन्हे १८९२ त ५९८० घडले ह्मणजे त्याच्या मागील सालापेक्षां ६७१ वाढले. रिपोर्टाच्या वर्षीं धान्याची महर्गता मोठी होती ह्मणून लहानसहान अपराध अधीक घडले असें कर्नल लेन साहेबांचें ह्मणणें आहे. डाके, खून, दरवडे वगैरे गुन्हे करणारे इसम जाणून बुजून तसे वाईट गुन्हे करणें हाच धंदा आहे असें मानतात आणि सरकारी तुरुंगांत पडे पर्यंत त्यांस वरील अचाट गुन्हे टोळीटोळीनें करण्या खेरीज दुसरा रोजगार नसतो. पण पोटाला अन्न व आंगाला वस्त्र मिळालें नाहीं ह्मणजे जे लोक आपल्या देशबांधवावर रागाऊन अन्नवस्त्रा पुरतीच त्यांच्या वरी चोरी वगैरे करितात ते लोक वास्तविक भिण्या सारखे गुन्हेगार नाहींत असें आह्मी मानतों. लोकांच्या अन्नवस्त्राची सोय करून देणें सरकारचें काम आहे. लोक दिवसे दिवस गरीब व कंगाल होत चालले आहेत. एक साल शेती पिकली नाहीं तर दम धरण्या इतकें त्राण त्यांच्या पाशीं नाहीं एवढेंच नव्हे पण जरा धान्य महाग झालें तर त्यांच्यावर उपासमाराची पाळी येते. तेव्हां ज्या समाजांत कांहीं जण उपाशी मरतात त्यांनीं समाजाच्या चिरकालच्या सुरक्षितपणाची काळजी कां वहावी! आपण डुबलो तर सर्व दुनिया डुबली अशीच स्थिती लोकांस खरा दिसणार आहे. दिवस भर कष्ट केले किंवा मोलमजुरी पत्करली तर ओली कोरडी मीठभाकर आपल्या कुटुंबास मिळण्या इतकें निदान वेतन मिळण्याची आशा पाहिजे आणि ती आशा तुटली ह्मणजे लोक गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. उत्तरोत्तर पोलीस खात्याचा बंदोबस्त जोरदार व भक्कमपणें चालू असतां ही वर्षानुवर्ष गुन्हे वाढत आहेत ही गोष्ट लोकांचा दरिद्रीपणा व उपासमार। ध्वनित करिते. लोक श्रीमान व सुखी होत चालले आहेत हें विधान सरकारी दप्तरांतून आढळतें पण त्याची सत्यासत्यता पोलिस रिपोर्टावरून नीटपणें निकालास लागेल. १८९० व १८९१ सालीं दर रुपयास ज्वारी २३ पासून २५ शेर व गहूं १५ पासून १३ शेर होते त्या ठिकाणीं १८९२ त १८ शेर ज्वारी व ११। शेर गहूं मिळत होते. धान्याची अशी विलक्षण महर्गता होती त्या मानानें एकंदरीनें गुन्हे कमी झाले असें आह्मी ह्मणतो. पोलीसच्या बंदोबस्तानें व राजनिष्ठेनें अधीक सात्विक वृत्तीचे व बेकायदा न वागणारे असे लोक पुष्कळ आहेत. ते एका पक्षीं उपासमार व मरण कबूल करतील पण गुन्हा करणार नाहींत.

१८९२ सालीं एकंदर २९ खून झाले ही संख्या १८९१ तील संख्येपेक्षां २२ नें कमी आहे ही स्थिती चांगली होय. आणि खून होण्याचीं कारणें शोधून पाहतां हल्लीं खून घडतात त्या पासून इतर लोकांस मोठीशी भिती वाळगण्याचें कारण दिसत नाहीं.

कर्नल लेन साहेब दुःख प्रदर्शित करितात कीं १८९१ त ३४ डाके पडले व १८९२त ३९ पडले. लोकांच्या स्वास्थ्याला अपायकारक व भयंकर असा हा अपराध आहे आणि हा मागें हटत नाहीं. याचें पहिलें कारण असें कीं, कांहीं मुलतानी लोकांच्या पन्नास पन्नास अगर शंभर शंभर इसमांच्या टोळ्या आहेत. ते हैद्राबाद सरकारच्या हद्दींत जंगलांतून राहून वऱ्हाड प्रांताच्या लगतच्या भागात डाके घालतात आणि उपजीविका करितात. हैदराबाद पोलिसांनें यांच्या टोळींची थोडी बहुत दाणादाण केली आहे तरी त्यांचा अद्याप बीमोड झाला नाहीं. दुसरे डाकेखोर हैद्राबाद पलटणींतले कांहीं शिख लोक आहेत. हल्लीं हे स्वार नोकरीवर नाहींत. ते मोठे धीट, पटाईत व निर्धास्त असतात आणि दिवसा ढवळ्या डाका घालण्याची या ठकास बिलकुल भिती नाहीं. मि. स्टीफनसन डिटेक्टीव पोलिसचे अधिकारी यांनीं या लोकांस अलिकडे चांगले ताळ्यावर आणिलें आहे. कांहीं मुसलमान भिल्ल आहेत तेही डाकेखोरपणा चालवितात पण ते पोलिसच्या तडाख्यांत जसे सांपडतात तशा त्यांस भडाभड शिक्षा झाल्यावर मोठी दहशत बसेल. दरवडे १८९१ पेक्षां १ अधिक ह्मणजे ६१ पडले वणी जिल्ह्यांतील वंजारी लोक व उमरावती–इलिचपूर, मूर्तिजापूर– दर्यापूर, चिखली–खामगांव, धामणगांव– यवतमाळ, इत्यादि मुख्य मुख्य बैल गाडीच्या रस्त्यांच्या आजूबाजूनें राहणारे चोरटे लोक यांनीं हे बहुतेक दरवडे घातले आहेत. वंजारी लोकांवर सक्तीची देखरेख पाहिजे आणि बैलगाडीच्या रस्त्यावर ठिकठिकाणीं पोलिसचीं ठाणीं जबरदस्त पाहिजेत. या दोन व्यवस्था झाल्या ह्मणजे दरवडे कमी होण्याचा संभव आहे. प्रजेचें जीवित व मालमत्ता यांचा सुरक्षितपणा लयास नेणारे डांके, दरवडे, खुन वगैरे अपराध घातक आहेत. हे गुन्हे कमी न होण्यास कर्नल लेन यांनीं कारणमाला गोंविली आहे ती सर्वांनीं लक्षात ठेवण्या सारखी आहे:—

( १ ) प्रथम दर्शनीं कर्नल लेन यांस ही गोष्ट निःसंशय कळून येते कीं मोठमोठे गुन्हे करणाऱ्या वर्गांतील लोकांची आमच्या न्याय कोडतां विषयीं दहशत बहुतेक उडाली आहे आणि उलट त्यांस बळकट भरंवसा असतो कीं, शिक्षेच्या तडाक्यांतून सुटण्यास बहुत मार्ग आहेत. तेव्हां गुन्हा करून शिक्षेच्या शर्यतींत धाडसानें यश संपादणें कांहीं नुकसानीचें नाहीं. ( २ ) वंजारी व रोहिले आदिकरून गुन्हा करणाऱ्या लोकांच्या जातींवर जशी कडकडीत व निकराची देखरेख पाहिजे तशी सध्यां नाहीं ही मोठी उणीव आहे. या त्रासदायक व पीडाकारक वंजारी लोका पासून बचाव करणें ह्मणजे त्यांच्यावर करडी नजर पोलिसांची असून वाटेल तशी हुकमत चालली पाहिजे. ह्यांच्या संबंधानें पूर्वींचे बंदोबस्ताचे कानू पुन्हा अमलांत आले ह्मणजे पुष्कळ गुन्हे कमी होतील. पंजाब व अफगाण या भागाकडुन रोहिले लोक वऱ्हाडांत पुष्कळ येतात आणि त्यांचा भरणा फार वाढला आहे असें खुद्द इनस्पेक्टर जनरल यांच्या पाहण्यांत आहे. १८८१ सालच्या खानेसुमारींत रोहिले लोकांची संख्या पुरुष व बायका मिळून ४५७ होती ती १८९१ त ९०५ झाली. हे लोक वऱ्हाडांत आल्या कारणानें गुन्हे करणाऱ्यांमध्यें मोठीच भर पडली आणि या लोकांवर दाब ठेवणें अत्यंत कठीण काम झालें आहे. यांच्या पैकीं बरेच जण हैद्राबाद संस्थानच्या मुलखांत जात असत, पण हल्लीं त्यांच्या पासून जामीन घेतल्या शिवाय तिकडे राहण्यास परवानगी मिळत नाहीं. ह्मणून या लोकांनीं तो मुलुख सोडला व वऱ्हाडात वास्तव्य करण्यास आरंभिलें आहे. कांहीं गुन्ह्या संबंधानें जी माहिती लागली आहे तिजवरून हे लोक फार खुनसी, दरवडेखोर व लुटारू असावेत अशी खात्री होते. आणि ( ३ ) शेवटलें कारण असें आहे कीं वऱ्हाडांत गुन्हे करण्याच्या निमित्तानें जे लोक येतात त्यांची चाल चलणूक पूर्वपीठिका व चरितार्थ हीं संशयास कारण असतात आणि त्यांचा तपास पोलिसाकडून व्हावयास पाहिजे तसा होऊं शकत नाहीं. पोलिसांची पलटण छोटी आहे आणि खेडेगांवच्या पोलिसांची मदत पाहिजे तितकी पुरेशी मिळत नाहीं. ( पुढें चालेल. )

---

बडोद्यास ' सहविचारणी सभा ' या नांवाची एक संस्था थोरथोर विद्वानांनीं

स्थापली आहे. तिचे रा. रा. शंकर मोरो रानडे बी. ए. हे चिटणीस असून राव बहादूर यशवंत वासुदेव आठल्ये हे अग्रेसर आहेत. तिचा उद्देश मराठी भाषेंत ग्रंथलेखनाचा प्रसार करण्याचा आहे. या सभेच्या ग्रंथमालेंतलें पहिलें पुष्प 'श्री शिव छत्रपति' या नांवाची कादम्बरी आहे. सभेचे सभासद आज मितीस ७० गृहस्थ असून त्यांपैकीं प्रत्येकानें एखाद्या ग्रंथाचीं २५ पानें भरतील असा तरी निदान एक लेख वर्षाअखेर लिहिलाच पाहिजे असा या संस्थेचा नियम आहे. श्रीमंत गायकवाड सरकारचा आश्रय मराठी भाषेंत ग्रंथ रचण्यास मिळूं लागल्या पासून स्वल्प काळांत बरींच चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. राजाश्रयाचा प्रभाव भाषाभिवृद्धीवर कांहीं लोकोत्तर आहे आणि तो ढळढळीतपणें कांहीं वर्षांच्या अवकाशांत लोकांच्या दृष्टी समोर येईल अशी आह्मास पूर्ण उमेद आहे. 'सहविचारणी सभेचा' कित्ता ठिकठिकाणच्या मित्रमंडळ्यांनीं गिरविण्या सारखा आहे. या सभेच्या ग्रंथमालेंतलें पहिलें पुस्तक 'श्री शिवछत्रपती' हें गेल्या आठवड्यांत आह्माकडे आलें आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. ग्रंथकर्ते रा. रा. शिवराम गोविंद फाळके हे गृहस्थ आहेत. बंगाल्यातील विख्यात कादंबरीकार रमेशचंद्र दत्त सी. आय. इ. यांच्या 'जीवन प्रभात' या ग्रंथाची वरील ग्रंथ ही निराळी प्रतिकृतीच आहे. या कादंबरी संबंधानें जाहिरात अह्मी मागें प्रसिद्ध केली होती तरी देखील सदरहू पुस्तकाला वऱ्हाडांत कांहींच आश्रय मिळाला नाहीं हें पहून नवल वाटतें. ग्रंथ लेखनाची गोडी आहे असे लोक आमच्या प्रांतांत विरळा आढळतात इतकेंच नाहीं तर इकडे वाचनाची गोडीही लोकांस फार थोडी असें दिसून पडतें. वऱ्हाडांतला कोणी गृहस्थ एखादी दुसरी प्रत घेणारा आहे किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं आह्मी बारीक टाईपांत छापलेली १५ पृष्ठांची नामावळी धुंडाळली पण अखेर आनंद मानण्यास एकच गृहस्थ आढळेल. उमरावतीचे रा. रा. मारुती रंगो पाबेड यांनीं निदान एका प्रतीस उदार आश्रय दिला ही संतोषाची गोष्ट होय. अशी शोचनीय गोष्ट पुन्हा घडूं नये ह्मणून आह्मी मुद्दाम एवढें पाल्हाळानें लिहिलें आहे याचा कितपत उपयोग होतो हें पुढें कारणप्रसंगीं दिसून येईल.

# The Berar Samachar

**MONDAY JULY, 31, 1893**

The Sanitary report is one of those annual statements which are more useful as a guide for the future than as a retrospect of the working of the year under report. If one compares the Sanitary report for 1891 with the fresh report for the last year, he will clearly find therein that the suggestions and directions stated in the former report have been more or less systematically carried out, and plans are set in motion to make the Sanitary department a really organized and highly useful institution. It is a pleasure to note that the same vigorous tone of administration is kept up by the officiating Commissioner Doctor Swaine. Doctor Little's comments on the system of registration of vital statistics were heartily welcomed by the Resident and we learn from the report under review that Doctor Swaine has been able to show a successful reform in the registers of births and deaths. His amiable nature, careful inspection and organizing capacity could secure for him a sympathetic cooperation from the municipal boards and district officers having authority over the centres of registration. Still there are many defects and weak points in the system itself; and from the opinions of the district officers which Doctor Swaine has freely quoted, we can realise how hard and trying a task it is to instruct the village Patels and Patwaries in the alphabets of the system of registration. With all these difficulties the progress that is effected is certainly remarkable and does credit to the Sanitary Commissioner. We have not forgotten the vein of irony with which Colonel Mackenzie called the tabular statistics a mere 'jungle of figures'; a similar jungle we have to travel through in this report also, but we hold that all the data which pertain to the questions of sanitation cannot be otherwise. The little hints to truths and inferences that we can find in a weather report of voluminous figures are the only important means available to a meteorologist. He alone can tell us the value of these figures and similarly from the point of view of a sanitary expert the so—called jungle of figures must be a valuable aid. Among the main features of the report the map illustrating mortality from cholera is an interesting document. The tabulated sanitary estimates of villages and towns in each circle is the most instructive record and when complete it will systematize the sanitary works in the province and suggest plans adequate to the supply of funds in hand. We shall have to take up this report a second time but before we conclude we would like to quote the instructive remarks of Doctor Swaine on the working of the village Sanitary Boards:—

"In regard to village sanitation, in the majority of villages there is much room for improvement; many of them are as bad as they well can be, little or no attempt made to observe the sanitary rules in Book Circular No. XVI of 1880. These rules are so simple and suitable, that if they were thoroughly carried out there would be little else needed to put the villages in a good sanitary condition. It is entirely due to ignorance and apathy that these rules are disregarded. People who have been accustomed for centuries to live amidst insanitary and filthy surroundings do not look at these things in the same light as we do, and these surroundings are not considered insanitary and disease-producing by them. As education makes progress and the villagers become more enlightened and learn the benefits of sanitation, these rules will then be readily observed. In all the schools I have visited I have noticed that the Sanitary Primer is well taught and the boys understand the rudiments of sanitation. In time to come this will bear fruit and the village sanitation be benefited. In the mean time some pressure out to be brought to bear on the village authorities to carry out more strictly the sanitary rules laid down in the above Book Circular."

---

The largest rough diamond that has ever been found in Africa, weighing 970 carats, has just been reported in London. It was found in the Jagersfontein Mine, and is a blue-white stone. Tho Kohi—Noor at present weighs about 102½ carats. B. G.

## CORRESPONDENCE

Mangrul 27—7—93

Mangrul requires rain. If it does not rain within a week Cotton and Jawari crops will be destroyed, the cultivators and the poor will suffer much, and it is likely the grain prices will be enhanced.

The Moharam 10th. day and Ashadi Ekadasi being on the same day, a good number of leading members of the Mahomedan and Hindu communities were bound to keep public peace. The time when and the hours within which the Mahomedan and Hindoo processions were to start and move were fixed. Every thing went on smoothly. It is hoped the leading members of the town will not, in future, offer even a shadow of an opportunity to the Government to interfere into their private affairs. The best thing was for them to come to amicable terms without the assistance from the hands of the Government.

There is a murder case in Mangalsa a small village 2 miles off from Mangrul. If the information received be granted to be true the facts of the case are as follows:—On the last Saturday fire broke out in Magalsa at about 1 P. M. when almost all the persnos of the village were engaged in their fieldworks. When they learned of the breaking of the fire they came home to save their property. It is known that there was one Sadusing whose existance was a great nuisance to the village community. Some of them suspected that it was Sadusing who set their houses on fire They were possessed with a devilish idea. Being much provoked to see their property reduced to ashes they determined to bring the idea into action. What they did: they entered the house of Sadusing, caught hold of him, brought him out and began to beat him with all their might. The wife and son of Sadusing came in the way and entreated the inhuman demons to release Sadusing but to no purpose. They were about to fall victims but happily they found refuge in one Fakir's cottage. The persons blind with fury did not rest satisfied with beating Sadusing but when they saw him knocked down they threw him into the fire! The helpless Sadusing was a robust man. But how could he be a match for so many persons? He some how or other once got out of the fire but was again thrust in and fuels were thrown on his person to get it burnt down. Thus the heartless, merciless, and thoughtless men put an end to the life of Sadusing. Every one's mind will be thrilled with horror to know the above mentioned history under the benign and peaceful British Government.

Strange to say the Police received information next day at about 3 P. M. or so. The son of the deceased is an intelligent smart boy. He gave a clue of the facts leading to his father's death to the Police who, it is known arrested some 16 or 17 persons. The Police will use much discretion in arresting persons. The whole community being complicated in the case it is most difficult to procure evidence sufficient for prosecution. The Police investigation is not yet complete. If the information received turns out to be true the guilty persons will, it is desired, be severely dealt with by the judicial authorities.

---

## वऱ्हाड.

हवामान— पावसाचे थोडे थेंब काल आले. खरीपाचीं पिकें वाळून चाललीं. वारा सोसाट्याचा सुटतो, ढगें येतात, व पाऊस पडण्या पूर्वीचीं सर्व चिन्हें दिसतात तेव्हां लवकरच मेघवृष्टि होईल असा भरंवसा आहे. रोगराई ह्मणण्याजोगी विशेष नाहीं.

म्युनसिपालिटीचें दुर्लक्ष— नदींचें पाणी आटत चाललें तरी लोक तेंच दुर्मीळ पाणी गढूळ व घाण करितात. पिण्याचें पाणी म्युनसिपालिटीचा पहारा नसल्या मुळें असें झालें आहे पावसाचा नेम नाहीं तर पुन्हा पाणी तुंबविणें जरूर आहे असें वाटतें.

जीनवचतुष्क अथवा मनुष्यमात्राच्या जीवनाला आवश्यक हवा, पाणी, अन्न व वस्त्र या चार गोष्टीं विषयीं रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांनीं गेल्या २३ तारखेस पुष्कळ माहिती एकत्र करून सांगितली. आह्मास विशेष आनंद वाटतो कीं राजश्री भाऊसाहेब आपल्या शिक्षकपणाला अनुरूप वागले. कांहीं गोष्टी सामान्य व नित्यांतल्या असल्या मुळें त्यांची हेळसांड होते पण त्याच गोष्टी मनोरंजक रितीनें, दाखल्या सहित, व विस्तारपूर्वक व्याख्यात्यांनीं श्रोतृसमाजाच्या मनांत बिंबविल्या हें त्यांच्या शिकविण्याच्या हातोटीचें उत्तम व्यंजक आहे. अगदीं साधारण गोष्टीवरून आरोग्यशास्त्रांचीं मूळतत्वें त्यांनीं आपल्या भाषणांत उत्कृष्टपणें निरूपण केलीं. यंदाच्या वर्षोत्सव - व्याख्यान - मालेंतलें हें पाहिलें व्याख्यान होय.

गेल्या आषाढी एकादशीच्या सुमुहूर्तानंर येथील 'गोरक्षणी सभे' ची वार्षिक बैठक झाली. सेक्रेटरी रा. रा. जयकृष्ण बगाजी नाईक यांनीं गेल्या बारमाहीचा रिपोर्ट वाचला त्या वरून ७१२ रुपये जमे पैकीं ७०३ रुपये खर्च वजा जातां बाकी शिल्लक ९ असून गाई व वासरें मिळून २३ हयात आहेत आमच्या मतें हल्लीं 'गोरक्षण' होत आहे तें कूचकामाचें असून अडनांवाचेंच आहे. सभेंत ४०० रुपये वर्गणी जमली आणि संस्था चालवावी असें ठरलें ही गोष्ट राजश्री नाईकजी सारख्या थोर पुरुषांच्या वजनदारीचें व पुढारीपणाचें लक्षण आहे. श्री स्वामी आत्माराम हे मागें आले होते त्या वेळीं 'गोरक्षण' व्यापारी तत्वावर झालें पाहिजे. असें आह्मी दर्शविलें आहे आणि तोच अभिप्राय बदलण्यास आह्मास कांहीं निराळीं कारणें अद्याप दिसलीं नाहींत.

साभावाद प्रमाणें मोहरमचा सण निर्विघ्नपणें या आठवड्यांत शेवटास गेला. कांहीं डोल्यांचीं नक्षीदार कामें मोठीं प्रेक्षणीय होतीं. अकोल्यास मोठ्या आनंदाची गोष्ट कीं हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें दुफळी नसून एकोपा आहे. पोलीसचा बंदोबस्त चांगला असून या सणाचा उत्सव लोकांच्या ऐपती प्रमाणें, धार्मिक इर्षे प्रमाणें व अनुकूल साधना प्रमाणें साजरा झाला.

मि. इ. मार्शल एक्स्ट्रा असि. कमिशनर आकोला यांची बदली इलिचपुरास झाली आणि त्या अन्वयें ते येत्या आठवड्यांत इलिचपुरास दाखल होतील.

मि. सी. इ. बिहरुफ असि. कमिशनर शिकंदराबाद यांची बदली खामगांवास होणार असून तेथील एक्स्ट्रा असि. कमिशनर मि. माणिकजी हे रजेवरून परत आल्या नंतर आकोल्यास बदलले जाणार आहेत असें लोक बोलतात. आणि खामगांव कोर्टाचे दिवाणी अधिकार लोकांच्या अर्जावरून अधिक वाढले जाण्या संबंधानें घाटत आहे असेंही कळतें.

( पुरवणी पहा. )

एक हजारा कैदी काबूलच्या तुरुंगांतून पळून हिंदुस्थानांत आला आहे. तो सांगतो कीं, हजारा लोक शेवटपर्यंत लढणार त्या हजारा लोकांतली प्रत्येक बायकोही हातांत हत्यार घेऊन शत्रूवर चाल करून जात आहे व मुलांसह मरत आहे. अमिराच्या जरी १८ पलटणी त्या हजारा लोकांवर आल्या आहेत तरी हजारा लोकांस त्यांची मुळींच भिती वाटत नाहीं.

फ्रेंच लोकांच्या लढाऊ बोटी सायामच्या मेनम नदींत शिरते वेळीं त्या बोटी व सायामचे किल्ले यांच्या दरम्यान जी चकमक झाली त्यांत फ्रेंच लोकांचे ५ शिपायी ठार झाले व सायामचे मेले व जखमी झाले मिळून ३० जायां झाले.

बांकाक शहर हल्लीं हत्यारबंद झालें असून लोकांत मोठी चळवळ सुरू झाली आहे.

आमच्या बोटीवरील कमांडरांनीं तुमच्या किल्ल्यावर जी गोळी सुरू केली ती सुरू करण्यास त्यांस हुकूम नव्हता, तें त्यांचें करणें त्यांच्या वरिष्ठांच्या हुकुमाच्या विरुद्ध आहे असें फ्रांसाचा जो बांकाक येथील राजकीय वकील आहे त्याणें सायाम सरकारास कळविलें आहे.

फ्रेंच बोटी मेनमनदींत शिरत असतां सायाम सरकाराच्या किल्ल्यावरून त्यांच्यावर गोळ्या सुरू करणें हें १८५६ च्या तहाच्या विरुद्ध आहे असें सायामसरकारास कळविण्या विषयीं बाकांक येथील फ्रेंच वकिलास लिहून गेलें आहे.

अपर मेकांग वरील डेथन व टाकुम हे सायामचे किल्ले फ्रेंच लोकांनीं आपले ताब्यांत घेतले.

आपसांत समजून लढाई तहकूब करण्यांत येत असेल तर सायाम सरकारास आपली फौज परत नेण्यास तयार झालें आहे.

बाकांक येथें जे इंग्रज लोक आहेत त्यांच्या संरक्षणाची योग्य तितकी खबरदारी घेण्यांत आली आहे, आणि कारण पडल्यास जास्त लढाऊ गलबतें पाठविण्याचीही तयारी ठेविली आहे; सायाम स्वतंत्र असणें हें हिंदुस्थानास फार हितकारक आहे व त्याचा स्वतंत्रपणा कायम ठेवण्याची फ्रान्साची ही इच्छा आहे. असें पार्लमेंट सभेंत विचारल्या प्रश्नास उत्तर देतांना अंडर सेक्रेटरी यांणीं सांगितलें.

राजा मुरली मनोहर हे हल्लीं निझामचे अकौंटंट जनरल आहेत पण आतां त्यांच्या जागीं २००० रुपये पगाराचा एक साहेब यावयाचा आहे व मग राजा मुरली हे त्या साहेबाचे असिस्टंट व्हावयाचे आहेत. राजा मुरली मनोहर हे निझामच्या पदरचे पिढीजाद बडे गृहस्थ आहेत. हल्लीं साहेबांचा काळ आला आहे तेव्हां सर्व ठिकाणीं त्यांची भरती झालीच पाहिजे.

हैद्राबादच्या संस्थानांत उदयास आलेले नबाब मेहदी अली यांनीं हैद्राबादचा संबंध सोडून तेथून शेवटचें प्रयाण केलें व त्या वेळीं त्यांस पोंचविण्या करितां शेकडों लोक स्टेशनवर हजर झाले असून त्यांतून कित्येकांनीं नबाबांच्या जाण्याबद्दल डोळ्यांतून पाणीही काढलें असें सांगतात.

निझामच्या राज्यांतही पूर्व पश्चिम एक रेल्वे करण्यांत येत आहे व तिचा एक फाटा दुसऱ्या रेल्वेस मिळणार आहे. कशाच्याही कारणानें असलो तरी आतां संस्थानें आपल्या हद्दींत रेल्वे करूं लागलीं असें होतें त्याच्या योगानें विलायती व्यापाऱ्यांची चांगली सोय होईल यात कांहीं शंका नाहीं.

सरकारी रेल्वेवर तिसऱ्या क्लासाच्या टिकिटाबद्दल दर मैली दीड पै प्रमाणें आकार घेण्याचें सुरू करण्याचें घाटत आहे.

चमन रेल्वे किल्ला अबदुल्ला पासून नव्या जमनपर्यंत वाढविण्याचें ठरलें. खर्च १६९ लाख रुपये लागणार आहेत. वाटेनें कोजक खिंडींत एक भोगदाही आहे. रस्त्याची लांबी ३३ मैल आहे.

या देशांत अफूचा चालत आलेला व्यापार बंद करावा ह्मणून पार्लमेंटासमोर कित्येक गृहस्थांनीं सूचना आणल्या होत्या त्या बद्दल विचार चालला असतां ग्लाडस्टन साहेब यांचें भाषण जाहलें त्यांत त्यांनीं अफूचा व्यापार बंद करितां येत नाहीं व तो बंद करणें चांगलें होणारही नाहीं. ह्मणून सांगितलें त्याचें कारण त्यांनीं दिलें कीं अफूचा व्यापार बंद केल्या पासून हिंदुस्थान देशाचें मोठें नुकसान होणार आहे व शिवाय हिंदुस्थान सरकारानें येथील इतर संस्थानिका बरोबर अफू संबंधें केलेल्या तहांच्या शर्ती मोडाव्या लागणार आहेत व त्या मुळें त्या संस्थानिकास नुकसानी भरून द्यावी लागेल. या सर्वांचा बोजा विलायत सरकार पत करीत नाहीं. व हिंदुस्थान सरकारास हल्लींच्या स्थितींत पतकरण्याचें सामर्थ्य नाहीं. हिंदुस्थानची प्रजा गरीब स्थितींत असल्यामुळें त्यांच्यावर आधिक कर बसविणें रास्त होणार नाहीं. या वरून अफूच्या इतके दिवस चाटाघाट होत असलेल्या प्रश्नाचा निकाल जाहला. हिंदुस्थानातील अर्धपोटे प्रजेवर जास्ती कर बसवून त्यांस ठार मारणें व त्या ऐवजी चीन देशांतील प्रजेस व्यसना पासून सोडविण्याचा प्रयत्न करणें न्याय्य तत्वदृष्ट्या ठरत नाहीं. शिवाय चिनी लोक चीनमध्यें अफू तयार करून खाऊं लागल्यास त्यांस इंग्रज काय करणार! करितां हिंदुस्थानचा अफूचा व्यापार बंद करणें हें चीन लोकांस व्यसन पराङ्मुख करण्याचा खरा निश्चित उपाय नाहीं. अ. द.

अमेरिकेंतील सरकारी कचेरीची इमारत पडून त्या खालीं शेकडों लोक चेंगरून जाया झाल्याचें समजतें. अमेरिकेंतील सुखदुःख दोन्ही विलक्षणच.

रा. रा. बाबाजीराव पटवर्धन महाडकर ज्योतिषी यांच्या अंगचा अलौकिक गुण आहे हे चेहेऱ्यावरून जन्मकुंडली उतरून देतात ह्याजबद्दल आतां कोणाची खात्री झाली नसेल असें मुळींच वाटत नाहीं. चेहेऱ्या वरून पत्रिका तयार करून देणें हें काम खरोखरीच अति कठीण आहे यांत संदेह नाहीं. पण थोडथोड्या अभ्यासानें बाबाजीराव पटवर्धन यांनीं ह्याहीपेक्षां एक अलौकिक गुण संपादन केला आहे. असें आमचा एक मित्र आह्मास खात्रीपूर्वक कळवितो. तो गुण हाच कीं, बाबाजीराव हे एका मनुष्याचा चेहेरा पाहून त्याच्या चेहेऱ्यावरून त्याच्या आईची, त्याच्या बापाची, त्याच्या बहिणीची किंवा त्याच्या भावाचीही पत्रिका बरोबर करून देतात!! ही अघटित घटना बाबाजीराव अमेरिकेंतून किंवा इंग्लंडाहून शिकून आले नसून त्यांनीं ती येथच्या येथेंच प्रयत्नानें मिळविली आहे. आणि एवढ्या वरूनच आह्मी असें ह्मणतों कीं, मनुष्य प्राणी प्रयत्न करील तर साक्षात ईश्वर यांत संदेह नाहीं. मात्र हे उद्योग आमच्या सुधारकांच्या धर्तीवर रिकाम्या नायिका प्रमाणें नसावेत!

आमचे राजे इंग्रज व त्यांचा देश इंग्लंड या देशांत दरसाल २९ कोट रुपयांची दारू खपते! ह्मणजे दरमाणशी दरसाल सुमारें ९०रुपयांची मदिरा लागते! अशा व्यसनी देशांतील लोक आह्मां हिंदु लोकांस नीती शिकविणार. आमच्या सुधारकांस हे गुरु चांगले शोभतील यांत संदेह नाहिं!

अमेरिकेंत गोळी न लागणारे एक चिलखत निघालें आहे. भारती युद्धांतील कवच कुंडला पैकींच हें कवच समजावयाचें. पु. वै

ग्वाल्हेरचे तरुण शिंदेमहाराजांनीं आपल्या राजधानीजवळ लहान लहान रेल्वेचे रस्ते करण्याचें मनांत आणलें असून त्यांच्या सामान सुमानाची खरेदीही लौकरच होणार आहे. दोन फूट रुंदीच्या रेल्वेचा एक फांटा राजवाड्यापासून ११ मैलावर कलहट येथें जेणार व दुसरा रेल्वे स्टेशना जवळील मुशाफरखान्यापासून मुरारच्या छावणीपर्यंत तीन मैल लांबीचा तयार करणार, असें समजतें.

मेणबत्तीचा उपयोग पाहिल्यानें बाराव्या शतकांत होऊं लागला.

महाबळेश्वरच्या तिजोरींत व्यापारी वगैरे लोकांस नोटांचे पैसे मिळत नसत, ते देण्या विषयीं सरकारानें ठराव केला. ओरड झाली ह्मणून दाद लागली! क. त.

राष्ट्रीय सभेचे एक पूर्ण द्वेष्टे व तिच्या विरुद्ध कडक लेख लिहिणारे गृहस्थ मि. एडवर्ड जेन्किन्स हे अलिकडे युरोपिअन लोकांना राष्ट्रीयसभेला मदत करण्यासाठीं तिच्या पुढारी मंडळींत सामिल होण्याचा उपदेश करीत आहेत. ते ह्मणतात कीं ज्याचें भांडवल हिंदुस्थानांत गुंतलेलें आहे अशा प्रत्येक इंग्लिश गृहस्थानें, आपण कांग्रेसवाला बनून आपला ज्यास्त फायदा होण्यासारखा आहे कीं काय, या प्रश्नाचा विचार करूं लागावें. यांचें असें मत होण्याचें कारण हिंदुस्थानावर होम चार्जेसच पुष्कळ बोजा अन्यायानें लादण्यांत येतो हें असावें. या गृहस्थाच्या मतांत असला फेरबदल झाला यावरून राष्ट्रीयसभेचा यशप्रभाव झपाट्यानें वाढत जाण्याचें हें सुचिन्हच दिसत आहे. असें ह्मटलें पाहिजे.

हिंदुस्थानच्या शेतकी संबंधी विचार करण्यासाठीं एक कमिशन शिम्ला येथें येत्या अक्टोबरच्या २ तारिखेस भरणार आहे. या पासून काय इष्ट परिणाम होतील तें पहावें. सु. प.

सुलतानाच्या फौजेबरोबर मोरांको येथील लोक झुंजत आहेत. या प्रसंगात बऱ्याच लोकांचें रक्त जमिनीवर पडून मोठा आकांत उसळला ह्मणतात. असल्या प्रकारच्या हुलडी उत्पन्न होण्यास मुख्य कारण सुलतानाचें आत्महित. जे राजे प्रजेची पर्वा राखीत नाहींत आपले पोट जाळण्यावर लक्ष ठेवितात, त्यांचा असाच परिणाम होत असतो. म. मि.

थोडे दिवसांपूर्वीं न्यूयार्क शहरांत कांहीं राजकीय चळवळी संबंधानें आपलें मत प्रदर्शित करण्यासाठीं चारशें बाहेऱ्या मुक्यांची सभा भरली होती! या सर्वांच्या मतें क्लीव्हलंड यांस संस्थानांच्या मुख्य पार्लमेंटाचें अध्यक्षस्थान द्यावें असें होतें, आणि हें व्यक्त करून दाखविण्या साठींच ती सभा त्यांनीं भरविली. या सभेचें अध्यक्षस्थान त्यांच्यापैकींच एकाकडे होतें. आणि सर्व वक्ते (हा शद्ब येथें योजावा कसा याचें गुढच आहे!) बहिरे मुकेच होते! व्यासपीठावर उभे राहून त्यांच्या चेहऱ्याचे निरनिराळे अविर्भाव होत, व हातवारे ते करीत त्या वरून इतरांस त्यांचे विचार चांगले समजत. क्लीव्हलंड शिवाय दुसऱ्या कोणा विषयीं आपलें मत दाखवावयाचे वेळीं यांच्या चेहऱ्यावर अत्यंत तिरस्कार दिसून, ते इतर लोक पैशाचे लालची आहेत अशा अर्थाच्या खुणा करीत त्या अशा. भराभरा पैसा गोळा करण्याचा अविर्भाव दाखवून त्याच वेळीं ते फार तिरस्कार युक्त मुद्रा करीत व आपल्या खिशांत ते गोळा केलेले पैसे खचून भरताहेत असें दाखवीत. नंतर आपलें हात लांब करून छाती खूप पुढें करून डौलानें मान हलवून ऐटीनें बसत. याचा अर्थ असा कीं, क्लीव्हलंडखेरीज इतर लोक अन्यायानें पैसा उपटून आपले खीसे भरीत असतात आणि मग तळीराम गार झाल्यावर आपले हात पाय पसरून स्वस्थ खुर्चीवर बसतात व रिकामा डौल मात्र दाखवितात. ही सभा अगदीं एक मतानें चालून सर्व समारंभ फारच उत्सुकपणानें झाला. क.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या लेखानें कळविण्यांत येतें कीं मौजे नांदुरा खुर्द तालुके मलकापूर येथील दुकान नामें ‘ कस्तुरचंद आसाराम ’ हें व त्या दुकानची सर्व स्थावर जंगम इस्टेट ही एकंदर खालीं सही करणार यांच्या पूर्ण मालकीची आहे. तिजवर कोणाचा हक्क व अधिकार चालणार नाहीं. तेव्हां ज्या कोणास त्या दुकानाशीं देवघेव, व्यापार ठापार, गहाण विक्री वगैरे हरएक प्रकारचा व्यवहार करणें असेल तो माझ्या शिवाय अन्य कोणापाशीं होऊं न ये. आणि जर कोणी माझ्या पावती खेरीज दुकानावर कर्ज वगैरे परत करील तर ती रकम मला न पोंचल्या मुळें वसूल धरली जाणार नाहीं. माझ्या परवानगी वांचून जो व्यवहार होईल त्याची जबाबदारी माझ्या वर व माझ्या इस्टेटीवर नाहीं. आणि त्या बद्दल ज्याचा तोच जबाबदार राहून नफा नुकसनीस कारण होईल. कळावें तारीख १५ माहे जुलई सन १८९३ इसवी.

( सही )

चुनीलाल कस्तुरचंद मारवाडी

राहणार नांदुरा खुर्द

दस्तुर खुद्द.

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.